कादंबरीसंग्रह मासिकपुस्तकमालेपैकीं

माधवनिधन.

हें

(ऐतिहासिक नाटक)

अनंत नारायण भागवत

माधवराज्यारोहण, वसईचा मोहरा, पृथ्वीराज संयोगिता, पितृबं-
धमोचन भाग १ ला, सटवाई, इ. पुस्तकाचे कर्ते.

यांनीं लिहिलें.

तें

पांडुरंग बळवंत देवल

यांनीं

आपल्या कादंबरीसंग्रहाच्या "श्री भागवत" छा० छापिलें.

सन १९०० इसवी

किंमत दहा आणे.

प्रस्तावना.

मराठ्यांच्या इतिहासापैकीं ज्या भागावर मीं सध्यांचें नाटक लिहिलें आहे, त्याच भागावर एक दोन वर्षांपूर्वी विविधज्ञानविस्तारांतून एक नाटक ' सवाई माधवरावाचा मृत्यू ' या नांवाचें एका विद्वान गृहस्थानें लिहून प्रसिद्ध केलें. माझ्या मनांतून याच विषयावर नाटक लिहावयाचें फार दिवसांपासून होतें, पण दुसऱ्या व्यवसायामुळें तें यावेळपर्यंत तसेंच राहिलें. त्यांतून विविधज्ञानविस्तारांतून जेव्हां त्याच विषयावर एक नाटक प्रसिद्ध होऊं लागलें, तेव्हां आपलेंही दुसरें नाटक त्याच विषयावरच, लागलेच सूरू करावें अशी मला त्यावेळीं अवश्यकता वाटली नाहीं, ह्मणून तें काम तसेंच मागासलें. विविधज्ञानविस्तारांतून प्रसिद्ध झालेलें नाटक वांचून जें काय त्याजविषयीं माझें मत झालें तें, आणि या विषयावर नाटक कसें लिहावें याबद्दलची माझी पूर्वीची कल्पना, या दोन्हीं गोष्टीला पुन्हां जागृति येऊन, त्या जागृतीचें हें सांप्रतचें नाटक फळ होय !

काल्पनिक नाटक अगर कादंबरी लिहिण्यापेक्षां ऐतिहासिक नाटक आणि कादंबरी लिहिणें जास्त अवघड आहे असें मला वाटतें. ऐतिहासिक पुस्तकाची मर्यादा आंखलेली असते. नाटकाच्या अगर कादंबरीच्या संविधानकाकरितां इतिहासापैकीं जो भाग घेतला असेल, त्या भागाच्या बाहेर ग्रंथकाराला मुळींच जातां येत नाहीं. त्या भागाच्या पूर्ततेकरितां त्यानें जी काय थोडीबहुत त्यांत भर घालून आपली कारागिरी दाखवावयाची असेल ती दाखवावी. आपल्या कल्पनेला वाटेल तशा भराऱ्या मारूं देण्याला त्याला अधिकार नाहीं. त्यांतून इतिहासाला, किंवा ऐतिहासिक पात्रांना भलतेंच स्वरूप देऊन सर्व गोष्टीला बाध येईल, व इतिहासाचें महत्व त्या योगानें कमी होईल असें त्यानें करितां कामा नये. काल्पनिक ग्रंथाची मात्र गोष्ट तशी नाहीं. त्या ठिकाणीं ग्रंथकाराला आपल्या कल्पनासृष्टींत स्वच्छंदपणें विहार करण्यास बरीच मोकळीक असते. अशी जरी गोष्ट आहे तरी ऐतिहासिक नाटक अगर

कादंबरी लिहिणाराला आपला विषय अगर संविधानक चांगलें चटकदार आणि मनोरंजक होण्याला कांहीं थोड्याशा गोष्टी आपल्या पदरच्या घालण्यास मोकळीक दिलेली आहे. त्या किती प्रमाणानें त्यांत घालाव्या, अथवा त्या घातल्या असतां मुख्य गोष्ट आणि दुसरी गोष्ट या अगदीं विलग दिसाव्या; एवढ्याबद्दल खबरदारी घेतली म्हणजे बस्स झालें, असें साधारण मत आहे. इतकीही मोकळीक जर ग्रंथकाराला मिळणार नाहीं तर तें ऐतिहासिक नाटक अगर कादंबरी होणार नाहीं. निव्वळ इतिहास होईल, अथवा भलतेंच कांहीं तरी होईल.

सवाईमाधवरावांच्या मृत्यूला कारण सवाईमाधवरावाचा केवळ अविचार, अथवा नानांचा त्यांच्यावरचा सक्त पाहरा, किंवा विविधज्ञानविस्तारांतून प्रसिद्ध झालेल्या ' सवाईमाधवरावाचा मृत्यू ' या पुस्तकांत माधवरावाच्या मृत्यूला व वेडेपणाला जें कारण दाखविलें आहे, यापैकीं एकेकच केवळ कारण आहे असें नाहीं. रा. भानूनीं आपल्या ' नाना आणि महादजी ' या निबंधांत माधवरावाच्या मृत्यूचा सर्व दोष माधवरावाच्याच माथीं मारून त्याला अगदीं अविचाराचा पुतळा बनविला आहे. इंग्लीशग्रंथकारांनीं त्यांच्या मृत्यूचा सर्व दोष नानांनीं त्याच्यावर कडक पहारा ठेवला म्हणून सर्वस्वी त्याच्यावर लादला आहे. यापैकीं एकेकच त्यांच्या मृत्यूला खरोखर कारण आहे असें नाहीं. याबद्दल रा. खरे यांनीं आपल्या 'नाना फडणवीसांच्या चरित्रांत' जें कारण दिलें आहे तेंच बहुतेक अंशीं खरें आहे असें मला वाटतें. नाना कोणत्या हेतूनीं आपल्यावर देखरेख ठेवतात, त्यांच्या मनांतून आपल्याला स्वतंत्रतेनें वागूं देऊं नये, वागूं दिलें असतां आपलें वजन राहील कीं नाहीं, पूर्वींपासून जसें आपण कुलमुखत्यारीनें कारभार करतों तसाच पुढेंही आजन्मपर्यंत करावा अशी त्यांना खरोखर इच्छा आहे किंवा ते आपल्या कल्याणाकरितांच सर्व गोष्टी करीत आहेत; या गोष्टी माधवरावाला कळल्या नाहींत; कांहीं गोष्टी मुखत्यारीनें करण्याला आपणाला अधिकार आहे, या सर्व राज्याचे आपण मालक आहोंत, अशी दृढ समजूत झालेल्या आणि खरोखर तशी स्थिती असलेल्या मनुष्यानें ज्या गोष्टीचा

हेका धरला त्या, आणि त्याच्या मर्जीविरुद्ध जर आपण एखादी गोष्ट केली, त्याला लहानपणीं जसें आपण वागविलें तसें आतां तरुणपणांतही वागवूं व त्यानें वागलें पाहिजे; आपण जें करतों, तें त्याच्या कल्याणाकरितांच करतों असें समजून जर पूर्वपद्धतीप्रमाणेंच वर्तन ठेवलें तर तें सवाई माधवरावासारख्या तरुण, पाणीदार आणि हुशार राज्याधिकाऱ्याला कितपत रुचेल, याचा नानांनीं विचार केला नाहीं, अथवा नागनाथाच्या कारस्थानानें क्रोधवश झाल्यामुळें या गोष्टी त्यांच्या मनांत आल्या नाहींत; असा परस्परांचा परस्पराविषयींच्या हेतूबद्दल गैरसमज होऊन त्यांच्यामध्यें तेंडे पडत चालले, आणि त्या गैरसमजाचा परिणाम माधवरावानें केलेली आत्महत्या होय. दोघांनीं जर थोडथोडा विचार केला असतां, तर असा दुर्धर प्रसंग कदाचित् न येतां; ह्मणजे दोषाचें ओझें थोडथोडें दोघांवर येतें. एकेकट्याच्याच डोक्यावर सर्व भार देणें बरोबर होणार नाहीं. राजा तरुण, दिवाण जुना केलासवरलेला, दिवाणाला आपल्या अनुभवजन्य ज्ञानाची ऐट, आणि तरुण राजपुत्राला आपल्या मालकपणाची ताजी येत चाललेली गुर्मी; तेव्हां दोघांचे फार दिवस न जुळून असा कांहीं तरी भलताच प्रसंग होतो, याचा अनुभव सर्वकाळीं, सर्व देशांत आणि सर्व ठिकाणीं सारखाच दृष्टीस पडतो. असो.

एकमेकांच्या हेतूबद्दल एकमेकांचा गैरसमज आणि त्याचा परिणाम; ही या नाटकाची मूळ कल्पना आहे. त्यांत मग बाजीरावाचें कारस्थान, नानाची माधवरावाच्या प्रत्येक गोष्टीवर, हालचालीवर, आणि बारीकसारिक कृत्यावर सक्त देखरेख; त्यामुळें त्यांना उत्पन्न होणारा वैताग, नागनाथाचा बेइमानपणा, बाजीरावाचे गुणानुवाद त्यांच्या कानीं पडल्यामुळें त्यांची भेट घेण्याची माधवरावाला उत्पन्न झालेली उत्सुकता, नानाचा त्याला प्रतिबंध, आपल्या गुणी समजलेल्या अशा आप्ताबद्दलचें साहाजिक उत्पन्न झालेलें प्रेम हीं कारणें अंगभूत आहेत. या सर्व गोष्टी पेशव्यांची बखर चांगली चाळली ह्मणजे खऱ्या आहेत असें अनुभवास येईल. फक्त बलवंतराव नागनाथाची बायको सत्यभामा तिनें केलेला आततायीपणा मात्र ग्रंथकाराच्या कल्पना सृष्टींतला आहे.

बलवंतराव नागनाथाची नेमणूक, बाजीराव, चिमणाजीआप्पा, अमृतराव वगैरे मंडळी ज्यावेळीं खर्ड्यांच्या लढाईच्यापूर्वी आनंदवल्लीहून आणून जास्त बंदोबस्तानें नानांनीं शिवनेरी किल्यावर ठेविली, त्यावेळीं तेथील अधिकाऱ्याच्या जागेवर त्यांनीं केली होती; ह्मणजे बाजीराव नागनाथाच्या ताब्यांत होता. त्यावेळीं बाजीरावाचें वय सवाईमाधवरावाच्या वया इतकें किंवा त्यापेक्षां किंचित् लहान होतें; त्याला आपल्या स्थितीची वारंवार आठवण होणें, त्यांत आप्पाच्या बोलण्यानें जास्त भर पडून नानाबद्दल त्याच्या मनांत जास्त द्वेष उत्पन्न होऊन त्यानें माधवरावाचें मन आपल्याकडे ओढून घेण्याची, व त्यामुळें आपला बंदीवास नाहींसा करण्याची खटपट करणें, या सर्व गोष्टी साहाजिक आहेत. बाजीराव आपल्याशीं मोकळेपणानें वागतो, आपण पर्यायानें त्याचे नोकर असून तो आपल्याकडे येण्यास देखील चुकत नाहीं, यामुळें, आणि त्याच्या बायकोनें त्याच्या पुढील वैभवाचें रेखाटलेल्या चित्रामुळें त्याचें मन बाजीरावाकडे वळून, माधवरावाकडे त्याचीं पत्रें गुप्तपणें पोंहचविण्याचें काम जर त्यानें पतकरलें तर त्यांत कांहीं नवल नाहीं. बलवंतराव नागनाथाचें कारस्थान, चुगलखोर कोंडाजीमार्फत बाहेर पडल्यावर नानांनीं त्याला दिलेली शिक्षा पाहून, माधवरावाला वाईट वाटणें, त्यानें पत्रें पोंहचविलीं ह्मणून मोठा राजद्रोहाचा त्यानें गुन्हा केला नाहीं, आणि जर तो गुन्हेगार नाहीं तर त्याला एवढी भयंकर शिक्षा होणें रास्त नाहीं, असें माधवरावाच्या मनानें घेऊन त्यानें त्याचा पक्ष घेणें आणि नानांनीं त्याची शिफारस न ऐकणें, यांचा परिणाम त्या दोघांची लहानशी झडलेली चकमक होय. आपण राज्याचे मालक असून आपल्या संमतीनें जी गोष्ट झाली तिच्याबद्दल विनाकारण दुसऱ्याला शिक्षा झाली असतां त्याला आपल्या हातून कांहींच मदत झाली नाहीं असें पाहून, माधवरावाला आपल्या अधिकाराचा संशय येऊन, त्याच विचारानें त्याचें डोकें भणभणून गेलें, व नानाविषयीं त्याच्या मनांत तिरस्कार उत्पन्न झाला. एकदां एका विचारानें डोकें भरलें ह्मणजे मग दुसऱ्या गोष्टीचा विचार होणें कठीण आहे. मग दुसऱ्या गोष्टी नेहमीं उलटच दिसूं लागतात.

आपल्या पतीनें माधवरावाच्या संमतीनें बाजीरावाचीं पत्रें व जिन्नस एकमेकांकडे पोंहचविलीं, यांत मोठेसें कांहीं केलें नसून त्याला जन्मभर कैद भोगण्याची शिक्षा नानांनीं दिली असतां, सत्यभामेसारख्या दृढनिश्चयी बायकोनें आपल्या पतीच्या सुटकेकरितां थेट मालकापर्यंत दाद मागूं नये ! ज्या माधवराव पेशव्याच्या कामाकरितां आपला पती बंदीवासांत पडला त्याची हरतऱ्हेनें भेट घेऊन, त्याला तिनें सर्व गोष्टी समजून सांगितल्या आणि त्याच्या हातून जेव्हां कांहीं उपयोग होत नाहीं असें तिनें पाहिलें, तेव्हां नाना खरे मालक, किंवा तुह्मी खरे मालक असें माधवरावाला स्पष्ट विचारून लाजविलें; त्याचेंही जेव्हां उत्तर मिळेना, तेव्हां शेवटीं निराश होऊन आपला प्राणही देण्यास तिनें तयार होऊं नये तर काय करावें ?

माधवरावानें सकाळीं वैद्य हात पाहून गेल्यानंतर तीन चार घटका दिवसास माडीवरून उडी टाकिली असें बखरींत लिहिलें आहे. वैतागलेल्या मनुष्याला आपल्या जिवाचा जरी कंटाळा आला असला, त्याला आपण प्राण द्यावा असें जरी पूर्वी दोन चार वेळ वाटलें असलें, तरी उद्यां तीन घटका दिवसास आपणाला उडी टाकावयाची आहे असें तो मुळींच ठरवून ठेवीत नाहीं. मनुष्य स्वस्थ बसलेला असून कांहींएक कारण नसतां, उठून तरवार अथवा पिस्तुल मारून घेईल, अथवा उडी टाकील असें क्वचित होतें. मनुष्याच्या मनोवृत्ती जागृत होऊन प्रबल झाल्या ह्मणजे, त्या त्वेषांतच अशी आत्महत्येसारखी गोष्ट घडून जाते. एरवी असें होणें जरा दुरापस्तच. मनाची आधींपासून तशीच प्रवृत्ती व्हावी लागते ही मुख्य गोष्ट. पुढचें कृत्य होण्याला दुसरें कारण हें निव्वळ निमित्य होय. तोफ डागून, कानावर दारू ठेविल्यानंतर मग रंजूकाचा जसा उपयोग होतो, त्याचप्रमाणें ही गोष्ट आहे. तोफेंत दारुगोळा जर पूर्वी घातलेला नाहीं, तर नुसती रंजूक कांहीं उपयोगी पडत नाहीं, एवढ्याचकरितां सत्यभामेचा आणि माधवरावाचा प्रवेश आधीं घालून मग माधवरावानें उडी टाकिली असें केलें आहे. तो जो प्रसंग घातला आहे त्या प्रसंगीं सत्यभामेनें देखील निराशेंत तेथून उडी टाकून प्राण देणें, आणि तें पाहून माधवरावानें उडी टाकणें हें जास्त चांगलें

झालें असतें हें खरें, पण इतिहासांत तशी गोष्ट कोठें झालेली नाहीं, आणि सत्यभामेनें आत्महत्या केल्यामुळें माधवरावानें आत्महत्या केली असा लोकांचा ग्रह होऊन याला इतिहासांत आधार काय, ह्मणून मागून प्रश्न निघतील तें होऊं नये ह्मणून तसें केलें नाहीं. बलवंतराव नागनाथाला बाजीरावाच्या कारस्थानांत मदत करण्याला उद्युक्त करण्यास, आणि माधवरावाच्या पूर्वींच प्रबल झालेल्या मनोविकारांत भर घालण्यास या पात्राची योजना केली आहे. मैना, कोंडाजी आणि सत्यभामा हीं पात्रें काल्पनिक आहेत. बाकीचीं सर्व पात्रें ऐतिहासिक आहेत.

नाटकाच्या संविधानकासंबंधानें भलताच ग्रह होऊं नये, व उगीच प्रश्न ऐतिहासिक मुद्यासंबंधानें निघूं नयेत, आणि स्वतां ग्रंथकाराचे मुद्दे काय आहेत हें स्पष्टपणें कळावें ह्मणून ही एवढी प्रस्तावना लिहिणें भाग पडलें.

खर्ड्याची लढाई झाल्यानंतर सवाईमाधवरावाच्या मृत्यूपर्यंतचा नाटकाचा काळ ह्मणजे सुमारे सहासात महिन्याचा धरला आहे. नाटकांतील बहुतेक गोष्टी बखरींतूनच घेतल्या आहेत.

इतक्या मुद्याच्या गोष्टी सांगून ही लांबलेली प्रस्तावना पुरी करतो.

मु० पुणें, ता०
१।२।१९०० }

अनंत नारायण भागवत,
ग्रंथकार.

दुरस्ती:—नाटकपात्रांच्या यादींत " बाजीराव " पेशव्यांचा चुलतभाऊ असें आहे तेथें " चुलता " असें वाचावें.

नाटकांतील पात्रें.

माधवराव	श्रीमंत पेशवेसरकार.
बाजीराव	पेशव्यांचा चुलत भाऊ.
चिमणाजीआप्पा	बाजीरावाचा धाकटा भाऊ.
नाना फडणविस	कारभारी.
बाबूराव फडके	हरीपंत तात्याचा मुलगा.
मोरोपंत भावे दाजीबा आपटे	श्रीमंतांजवळचे कारकून.
बलवंतराव नागनाथ.....	शिवनेरी किल्याचा कामगार.
वैजनाथभट्ट भागवत.....	एक भिक्षुक ब्राह्मण.
कोंडाजी	कामाठी.
यशोदा	माधवरावाची स्त्री.
सत्यभामा	बलवंतराव नागनाथाची स्त्री.
मैना	दासी.

वैद्य, पुजारी, शिपाई वगैरे.

माधवनिधन.

अंक १ ला

प्रवेश पहिला.

स्थळ—शिवनेरी किल्ल्यांतील बाजीरावाचा दिवाणखाना.

पात्रें—बाजीराव एकटा आपल्याशीं विचार करीत बसला आहे.

बाजीराव—(आपल्याशीं) अरेरे, काय ही आमची स्थिति ! ज्या आमच्या दादांनीं एका भरारी बरोबर भीमथडीच्या घोड्यांना सिंधूनदीचं पाणी पाजलं; "पानपतच्या लढाईत जय मिळाला, मराठ्यांची चांगली खोड मोडली, शेकडों वीरांची कत्तल केली, लक्षावधी सैन्य मातीस मिळविलं;" ह्मणून विजयगर्वानें फुगून गेलेल्या गिलच्यांना अटकेपार घालवून दिलं, व आपणाला शौर्याच्या कामांत प्रती बाजीराव असें सर्वांकडून ह्मणवून, मराठ्यांचा दरारा सर्व हिंदुस्थानभर थोडक्याच दिवसांत बसविला; त्याच रघुनाथराव दादांचे पुत्र, मी बाजीराव व आप्पा, आज जन्मापासून आमच्या हाताखालच्या चाकराचे बंदीवान होऊन, तो घालील तो तुकडा खाऊन व देईल तें वस्त्र पांघरून या किल्ल्यांत आयुष्याचा एकेक दिवस मोजीत पडलों आहोंत. अँ. जर लढाईत पाडाव होऊन आपल्या शत्रूचा बंदिवान होऊन, अशा रितीची कैद भोगण्याचं आमच्या नशिबी आलं असतं, तर आह्माला त्याचं यत्किंचित् सुद्धां दुःख वाटलं नसतं, ती तशी कैद आह्मी जन्मभरपर्यंत मोठ्या आनंदानं सोशिली असती; कारण तींत कांहीं तरी पुरुषार्थ होता, व लोकांना आमच्या स्थितीबद्दल कांहीं तरी करुणा आली असती; किंवा आपल्याला दैव प्रतिकूळ असल्यामुळें अशी स्थिती आली, असें समाधान

मानून घेण्याला तरी जागा होती; पण सध्यांची आमची स्थिती त्याहून किती तरी भिन्न आहे! कोणत्याही आमच्या शत्रूचे आह्मी शत्रू नाहीं, आह्मी कोणत्याही लढाईंत पाडाव झालों नाहीं, व तसं आमचें कोणाशींही प्रत्यक्ष वैर नाहीं, कांहीं नाहीं; पण त्या नान्या फडणविसाचे, ह्मणजे पेशव्यांच्या चाकराच्या एका कारकुनाचे, आह्मी रघुनाथराव दादासाहेबांचे पुत्र ह्मणून यःकश्चित् कैद्यापेक्षां देखील कैदी होऊन राहिलों आहोंत. भल्या मोठ्या हातापायांत वजनदार बिड्या घातलेला, व सर्व दिवसभर सक्त मजूरी करणाऱ्या कैद्यालासुद्धां जी थोडीशी स्वतंत्रता असते, ती देखील आह्माला नाहीं. किल्ल्याच्या बाहेर कशाला, या वाड्याच्या देखील बाहेर फिरण्याला आह्माला आमच्या चाकराच्या चाकराची परवानगी लागते!! कोणाशीं बोलायचं झालं, तरी देखील आह्माला ह्मणजे पेशव्यांच्या वंशजांना—ज्यांचा साऱ्या हिंदुस्थानभर हुकूम चालतो त्यांना—त्यांना—यःकश्चित येथील पागेदाराचा हुकूम लागतो. परक्याशीं बोलण्याला जशी आह्माला परवानगी नाहीं, तशी (इकडे तिकडे पाहून) आह्माला आमच्या मनाशीं देखील मोठ्यानें बोलण्याची परवानगी नाहीं. कारण आमच्या तोंडांतून रागाच्या आवेशांत भलतेंच कांहीं बाहेर पडलं तर, त्याचा परिणाम काय होईल याची आह्माला क्षणोक्षणीं भीति असते. आमची अशी दशा करण्याला त्या थेरड्याला सबळ कारण काय, तर आह्मीं रघुनाथराव दादांचे व आनंदीबाईचे पुत्र, त्यांचे वंशज, आणि नानासाहेब पेशव्याचे नाहीं एवढेंच. (दांत ओंठ चावतो) अरेरे नान्या, थेरड्या, काय करूं रे. तुझी देखील अशीच स्थिती करीन. [थांबून] पण केव्हां, पुढें ना! छे, छे, मी अगदीं वेडा. जें आपण उद्यां करूं ह्मणून ह्मणतों, तें खरं होणार असें ह्मणणें ह्मणजे केवढी चूक! सध्यां जें होत आहे तेंच खरें; आणि ह्मणूनच सध्यां मी त्या थेरड्या नानाफडणविसाचा बंदीवान आहे हेंच खरं. सध्यां मला नुसतं हात पाय आपटण्याखेरीज, व मनांतल्या मनांत संतापण्याखेरीज दुसरं काय करतां येतं आहे. कांहीं नाहीं. नशिबावर हवाला ठेवून स्वस्थच्च बसलं पाहिजे.

[इतक्यांत हातांत चाबूक घेतलेला असा चिमणाजीआप्पा रडत रडत येतो.]

चिमणाजीआप्पा—(रडत रडत) बाबासाहेब—बाबासाहेब—मी किनई आज किल्ल्याच्या बाहेर—अं—अं--अं—

बाजीराव--ये, ये, आप्पा—ये—बाळ तूं रडतोस कां ? [त्याला जवळ घेतो.] तूं घोड्यावर बसून बाहेर फेरफटका करायला गेला होतास ना ? मग काय झालं ! घोड्यावरून पडलास होय ! पाहूं कुठं लागलं तें.

आप्पा—बाबासाहेब, मी घोड्यावरून पडलों नाहीं कांहीं. मला आतां चांगलं बसतां येतं. मी आतां वाटेल तसा घोडा भरधांव टाकतों. एका हातांत माझा लहान भाला घेऊन सुद्धां—अं—अं—

बाजीराव—[त्याच्या तोंडावरून हात फिरवून] अरे वा, तर मग तूं मोठा घोड्यावर बसणारा पटाईत झालास ह्मणायचा ! बरें पण आप्पा तूं रडतोस कां ?

आप्पा—मी किनई बाबासाहेब, आज किल्ल्याच्या बाहेर घोड्यावर बसून फिरायला जाणार होतों, किल्ल्याच्या बाहेर जों पडतों, तों आपला रोजचा राणोजी स्वार आमच्या बरोबर असतो तो ह्मणाला, आप्पासाहेब, किल्ल्याच्या बाहेर जायला आपल्याला हुकूम नाहीं. बाहेर किनई बाबासाहेब मोठी मौज होती, ती माझ्या मनांतून फार पहावयाची होती; मी तसाच जात होतों, तों त्यानं माझा घोडा धरून मागं फिराविला. बाबासाहेब आमची मौज गेली. अं—अं--अं--आतां आह्मी काय करावं. त्या राणोजीनं कां माझा घोडा परतवला ? किल्ल्याबाहेर जायचा हुकूम नाहीं, असं तो ह्मणाला. तेव्हां किल्ल्याबाहेर जायला आह्माला कोणाचाही हुकूम पाहिजे. बाबासाहेब तुह्मी हुकूम दिला होता होय. अं—अं--आमची गंमत गेली अं--अं—आह्मी उद्यां जाणार ! अं--अं.

बाजीराव—(आपल्याशीं रागानें) भगवा झेंडा व नागवी समशेर हातांत घेऊन सर्व हिंदुस्थानभर भराऱ्या मारणाऱ्या रघुनाथराव दादासाहेबांच्या या लहानशा छबकड्यांना, किल्ल्याबाहेर नुसता घोड्यावरचा फेरफटका करण्यास सुद्धां जातां येऊं नये ना ! कोण हा बंदीवास ! आणि कसलें हें

आमचं दुर्दैव. [उघड] होय बाळ आप्पा, मी त्याला हुकूम दिला होता. घोडा बाहेर निघून बेफाम होऊन गेल्यावर तुला आवरेनासा झाला, त्यानं तुला पाडलं, ह्मणजे मग कसं करायचं; ह्मणून मी त्याला तुला बाहेर न जाऊं देण्यास सांगितलं होतं. उद्यां तूं आणि मी दोघेजण बरोबरच जाऊं अं: ! रडूं नकोस अं: !

आप्पा—बाबासाहेब, खरं ना पण ! पहा मग मी आपला घोडा तुमच्या बरोबर भरधांव फेंकतों कीं नाहीं तें ! मी आपला घोडा तुमच्यापुढें घालवीन. चला, तुमची आमची शर्यत! मी जर उद्यां तुमच्यापुढं घोडा भरधांव काढला तर मग तुह्मी मला काय बक्षिस द्याल ! सांगा.

बाजी—देऊं थोडासा खाऊ !

आप्पा—खाऊ नको जा आह्माला ! मी तुमचा तो सांरगा घोडा घेईन. अं—अं—अं.

बाजी—बरं बोवा, आह्मी तुह्माला आपला सांरगा घोडा देऊं, मग तर झालं ना !

आप्पा—पण तुह्मी किल्ल्याच्या बाहेर माझ्याबरोबर आलं पाहिजे. इथं जागा लहान आहे. मोठें चांगलें पटांगण नाहीं, आणि बाहेर जशी घोडा फिरविण्याची मौज आहे तशी किल्ल्यांत नाहीं. आह्मी आनंदवल्लीहून येथें आल्यापासून कधींच किल्ल्याच्या बाहेर गेलों नाहीं. इथं अगदीं कोंडल्यासारखं वाटतं. बाबासाहेब तुह्मी देखील कधीं बाहेर गेला नाहीं. गेला होता कां कधीं ?

बाजीराव—(आपल्याशीं) आपल्यापाठीमागें तो नाना फडणवीस शनिग्रह हात धुवून लागला आहे, तो कुठं आपल्याला स्वस्थ बसूं देतो आहे. त्याचेच हे सर्व खेळ चालले आहेत. त्याचे खेळ सध्यां तुला कळत नाहींत हें फार चांगलें आहे, नाहींतर संतापानं सध्यां जसा मी आंतल्या आंत जळत आहे, तसं मग तुला होईल, आणि तुझी खरी स्थिती तुला कळूं लागली ह्मणजे मग तुला हे खेळ मुळींच सुचणार नाहींत.

आप्पा––मग उद्यां खचित चलाल ना ! मी उद्यां सकाळीं रोजच्यापेक्षां लवकर उठून, तुह्मालाच पहा उठवायला येईन.

बाजीराव––येईन बरं बाळ ! खास येईन. जा, आतां हा पोषाक उतरा, संध्या करा, आणि जेवा. फेरफटका करून आल्यामुळें तुला फार भूक लागली असेल, जा.

आप्पा––तुम्ही बरोबर असल्यावर मग पाहीन तो राणोजी मला कसा बाहेर जायला नाहीं ह्मणतो तें. उद्यां मग गंमत––मौज––चंमत. अंः [उड्या मारीत व चाबूक फडकावित निघून जातो.]

बाजीराव––(तो गेलासें पाहून) 'न जाणो आपल्यामागें पुण्यास यांनीं कांहीं घोंटाळा केला तर,' या संशयानें त्या थेरड्यानं खरड्याच्या लढाईला जाण्यापूर्वीं आह्माला आनंदवल्लीहून आणून या ठिकाणीं ठेविलं, व आमचा पूर्वींपेक्षांही जास्त कडक बंदोबस्त केला; कीं, आह्माला कुठंही इकडे तिकडे फिरकतां येऊं नये. ती गोष्ट आज या आप्पालाही थोडीशी समजली. रघुनाथराव दादासाहेबांच्या वंशजांना या किल्ल्याबाहेर फिरण्याला यःकश्चित पागेदाराचा हुकूम पाहिजे अंः ! हुकूम ! चाकरानं धन्यावर हुकूम चालवावा, बाहेरच्या भुट्टेचोरांनीं आमच्या घरांत घुसून, आमचें लुबाडून घेऊन उलटा आमच्यावर त्यांनीं कडक अंमल गाजवावा, अशीच सध्यां उलटी वेळ आली आहे. त्या आप्पा पोराचें तें रडवं तोंड पाहिल्याबरोबर पोटांत कसं ढवळून आलं. त्याच्या रडण्याचं कारण समजल्याबरोबर अंगाची अगदीं आग होऊन गेली. पण काय करणार कांहीं इलाज़ नाहीं. [स्वस्थ बसून] नानाच्या बंदीखान्यांतच आह्मी कुजून कुजून मरणार अंः ? त्यांतून मोकळं सुटून आम्ही आपला प्रभाव, व आम्ही बाजीरावसाहेब, पेशव्यांचे वंशज आहोंत, असं आह्माला सगळ्या जगाला दाखवितां येणार नाहीं काय ? हो, येईल, पण केव्हां, जेव्हां आम्ही या कारागृहांतून सुटूं तेव्हां; आणि तें––तें तर नाना किंवा आम्ही दोघेही जोंपर्यंत जिवंत आहोंत तोंपर्यंत होणं अगदीं अशक्य. मग शक्य काय ? आमच्या कपाळीं बंदीवास हेंच खरं ! असं असून वैजनाथभट भागवत यांनीं माझी पत्रिका पाहून मला सांगितलं

आहे कीं, आपल्या कपाळीं राज्यपद आहे ह्मणून. सध्यां तर मी कैदखान्यांत आहे. श्रीमंत सवाईमाधवराव, पेशव्यांच्या मसनदीवर विराजमान होऊन आज वीस वर्षें राज्य हांकीत आहेत. तेव्हां पेशवाईची गादी मला मिळणं हें जितकं सध्यां शक्य आहे, तितकंच माझी येथून सुटका होणं हेंही शक्य आहे. माझ्या नशिबीं बंदीवास कायमचा आहे हेंच खास ! पण नुसतं माशा मारीत बसणं बरोबर नाहीं. नशीब पंगु आहे. त्याला आपण प्रयत्नानं चालविलं पाहिजे. नशिबावर नुसता हवाला देऊन स्वस्थ बसणारे लोक फार करून फसतात असें ह्मणतात, तेव्हां आतां हात पाय हालवून काय होतं तें पाहिलं पाहिजे. माधवरावांचा आमच्याकडे ओढा कितपत लागत चालला आहे, त्यांचं मन आमच्याविषयीं कसं होत चाललं आहे; वगैरे गोष्टी युक्तीनं मला काढून घेतल्या पाहिजेत; आणि तेवढ्याकरितां फराळ झाल्यानंतर मला त्या बलवंतराव नागनाथाची प्रथम भेट घेतली पाहिजे. पाहूं काय होतें तें. (जातो.)

प्रवेश दुसरा.

स्थळ—बलवंतराव नागनाथाची खोली.

पात्रें—बलवंतराव नागनाथ आणि त्यांची स्त्री सत्यभामा.

सत्यभामा—अगबाई, इतकी रात्र झाली तरी आज झोंप कशी येत नाहीं. फराळ झाल्याबरोबर आंथरुणाला पाठ लावण्याचाच कायतो अवकाश असतो, लागलीच गाढ झोंप लागते, आणि आज कां बरं असं या कुशीचं त्या कुशीवर तळमळणं चाललं आहे. कांहींतरी मनांत घोळत असलं पाहिजे. त्याशिवाय असं कधींच होत नाहीं. मध्यरात्र उलटून गेली तरी झोंप लागत नाहीं, असं आपल्या मनांत आज काय मोठं घोळतं आहे. तें मला सांगितलं पाहिजे.

बलवंतराव—कांहीं नाहीं ग ! उगीच आपला पडलों आहे.

सत्यभामा—हें पहा, किती जरी माझ्याशीं उडवा उडवी केली तरी, हें तापलेलं डोकं, (त्याच्या डोक्याला हात लावते.) ही भ्रांतिष्टासारखी नजर, या कपाळावरच्या आंठ्या, हा त्रासिक झालेला चेहरा, आणि स्वस्थ झोंप न आल्यामुळें हें ऊन झालेलं अंग, इकडच्या मनाची स्थिती कळवितात. या गोष्टी कांहीं आपल्याला खास लपवितां येणार नाहींत. त्याच आपलं चित्त आज स्वस्थ नाहीं हें दाखवित आहेत. मग ही माझ्याशीं कां बरं चाळवा चाळवी ! आपल्या मनांत काय घोळत आहे, हें जर आपण मला सांगितलं तर, त्याला मला जर कांहीं उपाय सुचला तर मी सांगेन. तो माझा उपाय जर आवडला तर घ्यावा, नाहींतर द्यावा आपला सोडून ! आणखी हेंच खरं कीं, विचार करकरून डोकं भणभणून गेलेल्या मनुष्याला आपल्या मनाचं समाधान होईल असें विचार निदान त्याला त्यावेळीं तरी सूचत नाहींत; आणि सूचले तरी तें आवडत नाहींत; त्यामुळें मनाचं समाधान होत नाहीं, आणि मग ही अशी तळमळ लागते. फार करून श्रीमंत बाजीरावसाहेब पेशवे आज पुन्हां आपल्याकडे आपणहून आले होते, त्यांनीं ज्या गोष्टी आपल्याला सांगितल्या, त्याबद्दल आपण आज विचार करीत आहांत, असें आपलं मला वाटतं.. बाकी खरं काय तें आपलं आपल्यालाच माहित. पण फार करून जर खरं सांगणं झालं तर माझा तर्क कांहीं खोटा होणार नाहीं, असें मला वाटतं.

बलवंतराव—(हांसून) हें तूं कशावरून ताडलंस ! ही लोकांच्या मनांतून गुह्य काढून घेण्याची कला तूं केव्हां शिकलीस !

सत्यभामा—त्यांत कला कसली. इतक्या सहवासानं आपल्या मनुष्याचा जर आपल्याला स्वभाव कळला नाहीं, तर मग काय राहिलं ? आणखी आज असं मन अस्वस्थ होण्याला त्या गोष्टीशिवाय दुसऱ्या कोणत्याच गोष्टी झाल्या नाहींत. आणि त्यालाही ह्मणजे फार वेळ झाला असं नाहीं. तेव्हां त्याच फार करून असाव्या, असा मीं आपला तर्क बांधला. एकूण माझा तर्क खरा झाला तर !

बलवंत—होय, त्याच गोष्टी माझ्या मनांत घोळत आहेत; काय करावं

हें मला सुचत नाहीं, माझ्या मनाचा अगदीं गोंधळ उडून गेला आहे, आणि त्याचमुळें मला आज स्वस्थ झोंप येत नाहीं. ज्याअर्थी तूं सर्व ऐकलं आहेस, त्याअर्थी आतां तूंच मीं काय करावं तें सांग ! इकडे श्रीमंत बाजीरावसाहेबांची भीड तुटत नाहीं, आणि तिकडे नानांचा विश्वासघात करवत नाहीं. मोठी पंचाईत येऊन पडली आहे. खरं--ह्मटलं—तर—

सत्यभामा--या एवढ्याशा गोष्टींचं आपल्याला एवढं मोठं गूढ काय पडलं, हें बाई मला कळत नाहीं. श्रीमंत बाजीरावसाहेब पेशवे आज पुन्हां आपल्या घरीं चालून आले, त्यांनीं आपली विनवणी केली, मोकळ्या मनानं आपल्या सर्व गोष्टी आपल्याजवळ सांगितल्या, आपल्याला एवढा मान दिला, आणखी त्यांनीं काय बरं करावं ? सध्यां जरी ते बंदीवासांत आहेत, तरी कसे केले तरी ते श्रीमंत दादासहेब पेशव्यांचे पुत्र ना ? आणि श्रीमंत सवाई माधवरावसाहेब पेशव्यांचे चुलते. केव्हां तरी ते एक झाल्याशिवाय राहणार नाहींत. मग थोडक्याकरितां त्यांची मर्जी आपण कां मोडावी. अनायासं चांगुलपणा व मोठेपणा मिळतो आहे तो हातचा कां दवडावा. यामुळें केव्हां तरी आपला भागोदय होईल खास ! आणि जोशानं देखील असंच सांगितलं आहे.

बलवंत—कोणी, वैजनाथभटजीनीं कां ? आणि त्यांनीं तुला काय सांगितलं आहे.

सत्यभामा--काय ह्मणजे, कीं यंदा ग्रह चांगले आहेत, राजयोग उत्तम आहे. दरबारांत मोठी बढती मिळणार !

बलवंत—हें त्यांनीं तुझ्या पत्रिकेवरून सांगितलं कीं माझ्या ? मी दुसऱ्या जोशाला जेव्हां वर्षफळ काढण्याकरितां पत्रिका दाखविली होती, तेव्हां त्यानं मला ‘ राजयोग चांगला आहे, पण थोडेसें ग्रह अनिष्ट आणि पीडा देणारे आहेत ’ असं सांगितलं होतं; आणि तूं तर सगळंच चांगलं ह्मणतेस. तेव्हां खरं कोणचं, हें कीं तें ?

सत्यभामा--खरं, मी सांगतें हें खरं !

बलवंत—आणि आमचं खोटं कशावरून ?

सत्यभामा—कारण मला सांगितल्याप्रमाणें योगायोग जुळून येतात ह्मणून ! त्याशिवाय श्रीमंत बाजीरावसाहेब पेशवे आपल्याकडे चालून आले असते कां ?

बलवंत—(आपल्याशीं) ही ह्मणते तेंही कांहीं खोटं नाहीं ! (उघड) असो, तुला सांगितलेलं खरं कीं मला सांगितलेलं खरं, याबद्दल विचार मुळींच करूं नये. जें होईल तें खरं ह्मणून स्वस्थ बसावं झालें.

सत्यभामा—मला सांगितलेलं कधींच खोटं व्हावयाचं नाहीं. कारण आमच्याइतका आपला कोणावर विश्वासच नसतो. देवधर्माची व विश्वासाची बाजू आमची, आणि उलाढालीची आपली. श्रीमंताच्या बोलण्यांत आपल्याविषयीं किती प्रेम व कळकळ दिसत होती. दैवयोगानं त्यांचे चांगले दिवस आल्यावर ते आपल्याकरितां काय करणार नाहींत ? प्रसंगीं ते आपणाला, ज्या नानांनीं आपली येथें पागेदारीच्या जागेवर नेमणूक केली आहे, त्यांच्याच जागीं नेऊन कशावरून नाहीं बसविणार? चुलत्या पुतण्याचें चांगलं जमल्यावर काय होणार नाहीं ? शिवाय आपण पूर्वीं दादासाहेबांच्या पागेंत नव्हता कां ? मग त्यांच्या चिरंजिवाचं ह्मणणं ऐकायला काय हरकत आहे.

बलवंत—पण यामुळें नानांचा विश्वासघात केल्यासारखं नाहीं कां होत ? त्याचा विचार केला पाहिजे. नानांचा माझ्यावर पूर्ण विश्वास आहे; व त्यांनीं मला नीट बंदोबस्तानं रहा, त्यांच्यावर चांगली नजर ठेव, असें वारंवार बजावून सांगितलं आहे.

सत्यभामा—नाना आणि आपण उभयतांही पेशव्यांचे चाकर ! ते सर्व पेशवाईचा कारभार करतात आणि आपण शिवनेरी किल्ल्याचा करता. ते एका धन्याची चाकरी बजावतात, आणि आपणाला पर्यायानं दोन्ही धन्याची चाकरी अनायासें बजाविता येते. एवढंच आपणां उभयतांत अंतर ! आज जरी ते निराळे आहेत, तरी ते पुढें मागें एक होणारच. दोन्ही धन्यांची जर उत्तम रितीनं चांगली चाकरी बजाविली तर दोन्हीकडून चांगला फायदा नाहीं कां व्हावयाचा ? खास होईल. आपण गरिबांनीं दुसऱ्या इतर गोष्टीपेक्षां आपल्या स्वतांच्या फायद्याकडे जास्त लक्ष द्यायला नको कां ?

बलवंत—तूं ह्मणतेस तें खरं,—पण—त्यांनीं आपणावर जो विश्वास टाकला, त्याप्रमाणें आपण चाललों नाहीं, असें आपलं मन आपल्याला मागून नाहीं कां सांगणार?

सत्यभामा—दुसरा जर आपला फायदा पाहतो आहे, तर आपण आपला कां पाहूं नये! मी ह्मणते कीं, नानांनीं आपणावर पूर्ण विश्वास ठेवला, मोठी नाजूक कामगिरी सांगितली, यापेक्षां जास्त दिलं काय? कांहीं त्याबद्दल जास्त नेमणूक कां दिली? नुसता ह्मणे पूर्ण विश्वास ठेवला, नाजूक कामगिरी सांगितली, आणि गळ्यांतला अगदीं ताईत असं मानलं; पण त्याचा कांहीं उपयोग आहे कां? कांहीं नाहीं! उलट ही आपल्याला नाजूक कामगिरी सांगून त्यांनीं आपलं नुकसान केलं आणि स्वतांचा मात्र फायदा करून घेतला. परवाच्या खरड्याच्या लढाईत, जर आपण आपली पागा घेऊन गेला असता, तर सर्वांबरोबर आपल्यालाही इनाम मिळालं नसतं कां? आपण तरवार गाजविली नसती कां? त्यामुळें आपला नांव-लौकिक झाला नसता कां! आपली दरबारांत प्रतिष्ठा वाढली नसती कां! आपण आपल्या पराक्रमानं पूर्वीपेक्षां जास्त आपण श्रीमंताच्या नजरेखालीं नसता कां आला! हे सर्व फायदे नानांनीं आपले बुडविले बरं! विश्वासूक, इमानदार असं नुसतं तोंडानं ह्मणून इथं आपल्याला मेंढ्या राखायला ठेवलं! दांत, व नखं काढून घेऊन, हात पाय बांधून, पिंजऱ्यांत कोंडलेल्या वाघाची राखण ती काय करायची? आणि त्याला एवढा मोठा शूर असा पागेचा अधिकारी तरी कशाला पाहिजे. माझ्यासारखी एखाद्या पागेदाराची बायकोसुद्धां तें काम सहज करील. आपल्याला आतां एक दोन दिवसांत पुण्यास जायायचंच आहे, तेव्हां पहावी पाहिजे तर माझ्याकडे ती कामगिरी सोंपवून, मी ती बजाविते कीं नाहीं तें, आणि घ्यावी आपली खात्री करून! विश्वासूकपणाबद्दल, नाजूक कामगिरी उत्तम रितीनं बजावल्याबद्दल, ते जर आपल्याला अगदीं गळ्यांतला ताईत ह्मणूत समजतात; तर सर्वांबरोबर आपल्याला कां नाहीं नानांनीं इनाम पाठवून दिलं, अथवा आपली नेमणूक वाढविली! थोडक्यांत आपलं मोठं काम कसं करून घ्यावं, हें त्यांना जर समजतं; तर

तें आपल्यालाच कां समजूं नये ? नानासारख्या कोट्याधीशांना देखील जर आणखी पैसे मिळवावेसें वाटतात, आपला लौकिक सर्व जगभर व्हावा अशी जर त्यांची इच्छा आहे, तर तशी इच्छा आपण कां करूं नये ? नांव–लौकिक व चार पैसे मिळविण्याची इच्छा नाहीं, मोठेपणीं मिळविण्याची हौस नाहीं, कांहीं नाहीं; मग आपला सर्वसंग परित्याग करावा आणि स्वस्थ देवाचं नांव तरी घेत बसावं. नुसत्या विश्वासूकपणाला, आणि इनामदारीला करायचं काय ? त्यांत कांहीं नाहीं. नानाचा इमानदार चाकर होण्याची इच्छा धरण्यापेक्षां प्रती, '**नाना**' होण्याची इच्छा जर धरली तर त्यांत कांहीं तरी अर्थ आहे, बरं कां ? कदाचित् आपल्याला विश्वासूक पागेदारच होऊन राहणं बरं वाटत असेल, पण मला नुसत्या पागेदारणीपेक्षांही जास्त मोठें व्हावं असं वाटतं !

बलवंतराव—(आपल्याशीं) खरंच नाना जर मजवर इतका विश्वास ठेवतात व मला आपला असं समजतात; मग त्यांनीं मला आपला असं झटल्याचं चीज कां बरं करूं नये ? आणि तें करणं त्यांना कांहीं अशक्य नव्हतं. तें सहज होणारं काम जर त्यांच्या हातून झालं नाहीं, तर मग तें आपल्याला चाहतात असं कसं ह्मणावं ? एखादी गोष्ट आपल्या मनुष्यासंबंधानं करावयाची एखाद्याच्या मनांत असली, ह्मणजे मग त्याला त्याचं विस्मरण होत नसतं, आणि तें झालं कीं, मग त्याला आपली खरी कळकळच नाहीं असं ह्मणायला काय हरकत आहे ? त्यांतून नानांना माझं विस्मरण व्हावं असं मुळींच नाहीं. रघुनाथराव दादासाहेबांचं कुटुंब लक्षांत आलं कीं, बलवंतराव नागनाथ त्यांच्यापुढें उभा राहिलाच पाहिजे. चांगल्या कामगिरीबद्दल भर दरबारांत जर मान झाला नाहीं, आणि लोकांना आपण माहित झालों नाहीं; तर मग ती चांगली कामगिरी बजावल्याचं चीज तें होणार केव्हां ? खऱ्या वेतनाच्या बरोबरीचीच दरबारांतल्या मोठ्या मानाची योग्यता आहे. यावरून ही ह्मणतें त्या गोष्टी कांहीं खोट्या नाहींत.

सत्यभामा—मी ह्मणतें तें खरं असं आपल्याला वाटतं कां ? बरं श्रीमंत बाजीरावसाहेब पेशव्याचं आपण एखादं काम केलं ह्मणजे त्यांत नानांना

ह्मणजे विश्वासघात होतो असं कांहीं नाहीं. आपण त्यांची भीड तोडली नाहीं ह्मणजे, वेळ प्रसंगीं त्यांनाही आपली भीड तोडवणार नाहीं. ते श्रीमंत आहेत, मोठे आहेत, राज्याचे सवाईमाधवरावाप्रमाणें मालकही आहेत, त्यांचं काम करण्याला वाटेल तो मनुष्य तयार होईल; पण आपण आज त्यांच्या मनाप्रमाणें केलं नाहीं ह्मणजे, आपण मात्र आज एक आपल्या फायद्याची आलेली उत्तम संधी घालविली असं होईल. ते श्रीमंत बाजीराव-साहेब पेशवे ह्मणजे जन्मभरपर्यंत कैदेंतच राहतील, असं मुळींच नाहीं. बरं, नाना ह्मणजे आपल्याला जन्मभरपर्यंत याच कामगिरीवर ठेवतील असंही नाहीं. दुसरी एखादी याहून जास्त नाजूक कामगिरी आली आणि तिकडे त्यांनीं आपली योजना केली, ह्मणजे मग ही सोन्यासारखी वेळ आपण आपल्या हातानं फुकट घालविली असं नाहीं कां होणार? एवढ्याकरितां ह्मणते.

बलवंत—एवढ्यावेळपर्यंत मी बराच घोंटाळ्यांत पडलों होतों. तुझ्या या सांगण्यानं त्या घोंटाळ्यांतून निघण्याला कांहीं तरी तोड निघेल, असं मला आतां वाटूं लागलं आहे.

सत्यभामा—तोड निघेल नव्हे, ती काढलीच पाहिजे. थोडासा आपला मनावर ताबा चालविला पाहिजे. असं होईल कां, तसं करूं कां, असं केलं तर लोक काय ह्मणतील, तसं केलं तर आपलं मन आपल्याला काय ह्मणेल; या गोष्टीकडे फारसं लक्ष देऊन उपयोगीं नाहीं. थोडंसं मन घट्ट केलं पाहिजे. मनाचा कनवाळूपणा थोडा कमी केला पाहिजे. धोपट मार्गानं जावं, पण आपल्या डाव्या उजव्या बाजूला काय चाललं आहे हें अगदीं पाहूं नये असें नाहीं. मी ह्मणते, ज्यांचा तुमच्यावर एवढा विश्वास आहे, व ज्यांना तुह्मी देव समजतां, त्यांचाच कित्ता तुह्मी कां बरं गिरवीत नाहीं. ह्मणजे वेळ प्रसंगीं त्यांनाच निरुत्तर करण्याला ठीक पडेल. शिवाय आपल्या अंगीं त्यांच्यापेक्षां एक गुण जास्त आहे.

बलवंत—तो कोणचा?

सत्यभामा—तोफेचा आवाज झाला कीं, नाना अगदीं गर्भगळीत होऊन जातात. लढाई प्रत्यक्ष पाहण्याला त्यांना मुळींच नको, लढाईच्या जागेपासून

ते फार लांब असतात, व असले प्रसंग ते नेहमीं टाळतात; असें लोक ह्मणतात, आणि इतकं जर त्यांच्या अंगीं धैर्य नाहीं. व त्यांचं मन कोंवळं आहे; मग सर्व गोष्टींत त्यांचं मन तसं कोंवळ कां असूं नये? पण तसं त्यांचं सर्व गोष्टींत आणि आपल्या फायद्याच्या गोष्टींत खास नाहीं. त्यावेळेला तर तें तोफेच्या शेकडों गोळ्यांनीं फुटणार नाहीं, अशा भयंकर काळ्या दगडाच्या तटापेक्षां देखील भक्कम आहे. मग आपल्यासारखा वीर, जो लढाईला जाण्याला नेहमीं तयार असतो, मृत्यूची ज्याला भीति वाटत नाहीं, ज्याचं धैर्य अभंग; त्याचं मन आपल्या धन्याच्या किंवा ज्यानें आपल्यावर विश्वास ठेवला त्याच्या मर्जीविरुद्ध एवढीशी गोष्ट करण्यास कचरावं, हें किती चमत्कारिक? हें आपल्यासारख्या शूराला शोभतच नाहीं. त्यांतून बाजीराव साहेबांचं नुसतं पत्र श्रीमंतास नानाच्या न कळत द्यावयाचं व तोंडीं निरोप सांगून ते जें ह्मणतील तें उलट घेऊन यांना कळवायचं, यापेक्षां कांहीं नाहीं. त्याकरितां एवढा विचार, एवढी झोपमोड, आणि एवढी त्याबद्दल तोड काढण्याची खटपट!! मीं तर त्याबद्दल केव्हांच तोड काढिली आहे.

बलवंत—कोणची बरं ती?

सत्यभामा—कोणची ह्मणजे, 'होय' ह्मणायचं आणि लागलींच मोकळं व्हावयाचं!

बलवंत--बरं तर तुझ्याच ह्मणण्याप्रमाणें करूं.

सत्यभामा—करूं ह्मणून आशिर्वाद कशाला? मी सांगितल्याप्रमाणें करण्याचा निश्चय करून एकदां अनुभव घेऊन पहावा पाहिजे तर! निश्चय केला ह्मणजे मग पहायची होती कशी तत्काळ गाढ झोंप लागते ती! (तीन प्रहराचा गजर होतो.)

बळवंत—अगं, आपल्या बोलण्याच्या गडबडींत तीन प्रहर रात्र उलटून गेली. झाला माझा निश्चय. सकाळीं मला बाजीरावसाहेबाबरोबर फेरफटक्याला जायचं आहे, तेव्हां मला लवकरच उठव. तूंही थोडीशी झोंप घे.

सत्यभामा—आपल्याला स्वस्थ झोंप लागली ह्मणजे मलाही लागेल. (ती त्याला थोपटते, त्याला झोंप लागते.) इकडे नाना फडणवीस ह्मणजे जसे देव

वाटतात, पण जो देव नवसाला पावत नाहीं, तो मेला देव कसला ! धोंडाच तो ! अशा देवाच्या ठिकाणीं भाव ठेवायचा कशाला ? नुसतं त्याच्यापुढं कपाळ घासून घट्टे मात्र पडायचे ! त्यापेक्षां जे देव नवसाला पावतात, किंवा पावतील असं आपल्याला वाटतं, त्या देवाची सेवा केलेली काय बरं वाईट ! पण इकडच्यासारख्या एकमार्गी भोळवट आणि शूर वीराच्या मनांत या गोष्टी मुळींच येत नाहींत, आणि त्यामुळेंच हे असले लोक नांव–लौकिकाला चढत नाहींत व श्रीमंतही होत नाहींत. झालेला निश्चय स्वारीचा जर टळला नाहीं तर बरंच काम होईल असं वाटतं. (ती निजते.)

प्रवेश तिसरा.

स्थळ—किल्ल्यांतील बगीचामधील मंडप.

पात्रें—बाजीराव आणि वैजनाथभट येतात.

बाजीराव—वैजनाथभटजी, तुमचं भविष्य जर खरं झालं, आणि मी कधीं काळीं पेशव्यांच्या गादीवर बसलों, तर तुह्माला मी आपल्या बरोबरीचा करून सोडीन. अहो, त्या गादीवर चढतांना तुमचा असा हात धरून, तुह्माला मी प्रथम आपल्या उजव्या हाताला तुमच्या गादीवर बसवीन आणि मग मी आपल्या बसेन. या माझ्यां वचनाचं मला कधींच विस्मरण होणार नाहीं ही माझी पूर्ण खात्री आहे; पण कदाचित् झालं तर तुह्मी मला आजच्या दिवसाचं आणि या बागेंतील वचनाचं स्मरण द्या. आणि त्या बरोबर ही आंगठी खूण ह्मणून दाखवा, ह्मणजे तुमचं काम झालंच ह्मणून समजा. (आंगठी त्याच्या हातांत घालतो.) पण पुढची आपली सर्व मनोराज्याची इमारत सध्यांच्या तुमच्या पुण्यास गेल्यानंतरच्या कर्तबगारीवर आहे. तो पाया जितका खोल व भक्कम केला जाईल तितका तो करा. तुह्मी माधवरावाचे आतांचे सासरे जे गोखले त्यांच्याच गांवचे असल्यामुळें, इतराप्रमाणें तुह्माला माधवरावाची भेट घेण्याला फारशी अडचण पडणार

नाहीं. त्यांतून बलवंतराव नागनाथास मी तुमच्याबद्दल सांगून ठेवलंच आहे. तेही तुमची भेट करून देतील. वेळ साधून आमची स्थिती त्यांच्या कानावर जाईल व त्याचं मन आमच्याकडे ओढेल असं प्रथम करा. त्यांत थोडसं यश येण्याचा रंग दिसला ह्मणजे मग आपल्याला पुढें काय करावयाचें तें ठरवूं. जमल्यास बलवंतरावाबरोबरच परत या, अगर दोन चार दिवसांनीं मागून या. मात्र इतकं पक्कं लक्षांत ठेवा कीं, आपला पहिला फांसा जसा पडेल, त्यावर पुढचा सर्व डाव अवलंबून आहे.

वैजनाथ—माझं भविष्य खोटं होईल याची तर मला मुळींच भिती नाहीं. माझं भविष्य कसलं, जसं श्रीमंताच्या पत्रिकेंत आहे तसं मी गणित करून सांगितलं; यांत जास्त कांहीं केलं नाहीं. माझ्या वाणीला परमेश्वराच्या मनांतून जर यश द्यावयाचं असेल तर तो देईल. पण जर माझं भविष्य खोटं झालं, आणि आपण या वर्षी बंदिवासांतून मोकळे झाला नाहीं, तर पुन्हां हातांत पत्रिकाच धरणार नाहीं. श्रीमंत पंतप्रधान माधवरावसाहेब यांच्या भेटींत जसं घडेल, तसं मी श्रीमंतास कळवीन. बरं, त्या अनुष्ठानासंबंधानें व प्रयोगासंबंधानं पुण्याहून आह्मी परत आल्यावरच ठरवायचं ना?

बाजीराव—होय, तुह्मी परत आल्यावरच त्याचं ठरवूं व लागलाच श्रावण शुद्धांत त्याला आरंभही करूं.

वैजनाथ—हो, श्रावणांतच त्याला आरंभ करणं बरं?

बाजीराव—प्रयोग सिद्ध व्हावयाला किती दिवस लागतील?

वैजनाथ—त्याला, अजमासें अठरा दिवस लागतील.

बाजीराव—प्रयोग सिद्ध झाल्यानंतर मग पुन्हां एकदां तुह्मास पुण्यास जावं लागेल.

वैजनाथ—जाऊं, त्याला काय हरकत आहे. कोणीकडून श्रीमंताचं काम झालं ह्मणजे झालं. शिवाय श्रावणांतील दक्षणा व्हावयाचीच आहे, त्याच वेळेला गेलं ह्मणजे एका कामांत दोन कामें अनायासेंच होतील.

(इतक्यांत बलवंतराव नागनाथ आणि चिमणाजी आप्पा येतात.)

बाजीराव—हे पहा बलवंतराव नागनाथ, येथील पागेदार आणि आमच्या वरचे रखवालदार आले. या बलवंतराव असे.

बलवंत—छे, श्रीमंतांनीं असं ह्मणूं नये! श्रीमंतांवर रखवाली करणारा कोण आहे! आह्मी आपल्या पायाचे चाकर आहोंत. ज्या नोकरीबद्दल आज्ञा होईल ती बजावण्याचं आमचं काम आहे. चाकर झालं ह्मणजे निरुपायास्तव कित्येक गोष्टी कराव्या लागतात; त्याला नाईलाज आहे.

बाजीराव—(त्याचा हात धरून) बलवंतराव, तुमची येथें नेमणूक झाल्यापासून तुह्मी आमची वर्तणूक पहातच आहां; आह्माला किल्ल्याबाहेर सुद्धां जाण्याची परवानगी नसावी, असं आह्मी त्या कारभारी साहेबांचं काय बरं घोडं मारलं आहे? माझं असो, पण हा आप्पा, भलत्यावेळीं भलतांच हट्ट घेऊन बसतो, आणि तो हट्ट आतां आपल्या हातून पुरवला जात नाहीं, ह्मणून अत्यंत वाईट वाटतं. दादांचा व आईचा तो इतका प्यार असे कीं, ते त्याला एक क्षणभर सुद्धां खालीं ठेवीत नसत. त्याच्याकडे पाहिलं, आणि त्यानं ह्मटलेलं आपल्या हातून झालं नाहीं, ह्मणजे मग आह्माला आमच्या बंदीवासाच्या व परतंत्रपणाच्या असह्य वेदना होऊं लागतात. त्याच्याकडं पाहून पोटांत कळवळतं, आणि आह्मी असं काय केलं आहे; याबद्दल वाईट वाटून कांहीं एक सुचेनासं होतं. कालच त्या राणोजीनं किल्ल्याबाहेर जायला आपल्याला हुकूम नाहीं, असं ह्मणून त्याचा घोडा फिरविल्याबरोबर त्याला इतकं वाईट वाटलं, आणि तो इतला मजजवळ येऊन रडला कीं, त्याची समजूत कांहीं केल्या लवकर होईना. त्याला अद्याप फारसं कळत नाहीं ह्मणून बरं आहे, नाहीं तर त्याच्या स्थितीबद्दल त्यालाही मजप्रमाणेंच वाईट वाटून अत्यंत दुःख झालं असतं! कालपासून पुण्याला केव्हां चलणार, मी जाणार; असाच हट्ट घेऊन बसला आहे. कांयं करावं त्याच्या हट्टापुढें. सध्यां आपली खरी स्थिती सांगून कांहीं उपयोग आहे कां? गोड गोड बोलून, चाळवून, दुसरीकडे त्याचं मन वळवून त्याला त्या गोष्टीचा विसर पाडावा लागतो. कैद्या-पेक्षांही आम्ही कैदी आहोंत, ही अमची स्थिती ह्मगजे श्रीमंत माधवरावाच्या हुकूमानं झाली आहे असं

मला वाटत नाहीं. याचा मुख्य चालक निराळाच आहे. बरं ही अशी आमची स्थिती खरोखर त्यांच्याच हुकूमानं झाली कीं, काय याबद्दल एकदां आपल्या मनाची शहानिशा करून घ्यावी, आणि मग आपल्या दैवावर हवाला ठेवून स्वस्थ बसावं, ह्मणून तुह्माला ही विनंति केली आहे.

बलवंतराव—श्रीमंत, मला–आपल्या चाकराला–विनंती करायची ! छे, असं आपण मुळीं ह्मणूं नये! हुकूम करावा. आपलं काम मी खास करतों, त्याबद्दल श्रीमंतांनीं बेफिकीर असावं ! फक्त आपलं पत्र श्रीमंत पंतप्रधान माधवरावसाहेबास गुप्त रितीनं द्यायच एवढच ना ?

बाजीराव—हो, सध्यां एवढंच काम आहे ! काय कराल तें खरं. आमची सर्व भिस्त तुमच्यावर आहे.

बलवंत—श्रीमंताच्या कामाकरितां, पुण्याचं एखादं काम काढून मी उद्यांच पुण्यास रवाना होतों.

आप्पा—कोण, पागेदार, आपण पुण्यास जाणार ? बाबासाहेब, मी जाऊं कांहो यांच्याबरोबर पुण्यास ! आह्मी पुणं कधींच पाहिलं नाहीं. तिथं मोठी मौज मौज आहे, असं आपले गणू, सद्या, नाऱ्या हुजरे सांगतात. अं–अं.

बाजीराव—पाहिलांतना याचा हट्ट ! आतां या पोराला काय सांगावं ? यावेळपर्यंत आपल्या चाबकाशीं खेळत होता, तोंपर्यंत त्याला कांहीं त्याची आठवण नव्हती. तुमच्या तोंडून पुण्याचं नांव निघण्याचा काय तो आवकाश ! तें ऐकिल्याबरोबर त्याला त्याची आठवण झाली. बाळ, आप्पा—सध्यां किनई पाऊस पडतो आहे, बरोबर चांगला बंदोबस्त नाहीं, ह्मणून सध्यां नको, आपण मग पुढें केव्हां तरी जाऊं.

आप्पा—हे पागेदार आहेत तर खरे आमच्या बरोबर ? नाहीं–आम्ही–जाणार–पुण्याला–अं–अं.

बाजीराव—(त्याला जवळ घेऊन) बाळ आप्पा, असा हट्ट करूं नये !

बलवंत—हें पहा आप्पासाहेब, मी पुढें जातों, आपल्या स्वारीचा नीट बंदोबस्त करतों, मग श्रीमंताचा हुकूम घेऊन मोठ्या थाटानं स्वार शिबंदी

बरोबर घेऊन नेण्याकरितां येतों, मग आपण जाऊं! आपली स्वारी श्रीमंत पंतप्रधान पेशवेसरकारच्या बरोबरीची होईल अशी काढूं! सध्यां नको!

आप्पा--बरं तर सध्यां नको! बाबासाहेब, आपण दसऱ्याला पुण्याला जाऊं! तुह्मीही यालना; त्या दिवशीं मात्र मी ऐकणार नाहीं नाहींतर आतां जसं तुह्मी मला नको ह्मणतां तसं तेव्हांही ह्मणाल. (बाजीरावाच्या गळ्या पडतो) बाबासाहेब, बाबासाहेब, खरंच चलालना? न्यालना मला आपल्या बरोबर! मी तिथं जाऊन श्रीमंत पंतप्रधानास मला घोड्यावर कसं बसतां येतं, भाला कसा फेंकता येतो, बाण कसा सोडता येतो, सर्व त्यांना दाखवीन अं:! आणि मग काल जशी मी तुमच्याशीं शर्यत लावून तुह्माला मागं टाकलं, तशी पंतप्रधानाशीं शर्यत लावीन. त्यांच्यापुढें आपला घोडा भरधांव काढीन, त्यांना मागं टाकीन, आणि शर्यत जिंकून त्यांच्या बरोबरीनं गादीवर बसेन आणि पेशवा होईन. बाबासाहेब, तुह्मी देखील घोडे फिरवायला आमच्या बरोबर याल ना?

बाजीराव—पाहिलांतना कसा बोलतो तें! हो येऊं बरं, सर्व करूं!

बलवंत--हो, आप्पासाहेब, तुह्मी तोंपर्यंत बाबासाहेबाजवळ घोड्यावर बसून बोथाटी फिरविण्याचा चांगला अभ्यास करा. श्रीमंत पंतप्रधान देखील घोड्यावर बसण्यांत बाके आहेत.

आप्पा—मी देखील नाहीं कांहो बाबासाहेब! बाकां!

बाजीराव--छे, तूं नाहींस बाकां.

आप्पा--मी आतांशा घोड्यावरून पडतो कां?

बाजी--पडला नाहींस ह्मणून काय झालं! पण तूं कांहीं बांका नाहींस.

आप्पा--नाहीं, मी आहे जा!

बाजी--आहेस, पण तो कुठं दिसत नाहींस तो! चांगला सरळ आहेस! तूं कुठं बांका, वांकलेला असा आहेस कां?

आप्पा--मी कां ह्मातारा आहे? हे पागेदार आहेत वांकलेले.

बलवंत--या यांच्या लीला पाहून श्रीमंतास किती तरी आनंद होईल!

वैजनाथ—सिंहाचा बच्या तो, तो आपला गुण कधीं सोडणार नाहीं.

बाजीराव--तसा सुयोग जेव्हां येईल तेव्हां खरा! बरं, उद्यांच जाण्याचा तुमचा विचार झाला कां?

बलवंतराव--फार करून उद्यांचाच ठरेल!

बाजीराव--तसा तुमचा बेत नक्की झाला ह्मणजे मला पंतप्रधानास देण्याचं पत्र लिहून तयार करण्यास ठीक पडेल!

आप्पा--बाबासाहेब तुह्मी श्रीमंत पंतप्रधानास पत्र पाठविणार! मीं देऊं कां त्यांना पाहण्याकरितां आपली बारिक अक्षराची पुस्ती पाठवून?

बाजी--हो दे दे!

आप्पा--आणूं आतां! आणतों अं:! (असें ह्मणून उड्या मारीत जातो.)

बाजी--ज्या त्या कामाची त्याला केवढी हौस!

बलवंत--श्रीमंतांनीं लिहून तयार करावं! मी सकाळीं जातांना भेटून जाईन.

बाजीराव--हो, जातांना या वैजनाथभटजीसही घेऊन जा! यांची व पंतप्रधानांची भेट करून द्या. हे त्यांच्या श्वशुराच्या गांवचेच आहेत मोठे विश्वासूक, विद्वान्, जोतीषशास्त्रांत निपूण असें आहेत. तुमच्याही परिचयाचे असतीलच!

बलवंत--हो, माझा यांचा नुकताच परिचय झाला आहे.

वैजनाथ--रावसाहेबांची आणि त्यांच्या कुटुंबाची मी पत्रिका पाहिली आहे. योग सर्वोत्कृष्ट आहे. दोघांची अत्यंत प्रीति आहे. जोडा मोठा नामी. गण मैत्री उत्तम! आणि ह्मणूनच परमेश्वरानें असा नेमानेम केला. प्रभूची योजना अन्यथा थोडीच व्हावयाची आहे. जसे हे तशाच बाई देखील रूपवान, गुणवान् आणि भाविक आहेत. योजना अति अति उत्तम! रावसाहेबांचा राजयोग मोठा चांगला आहे.

बाजीराव--बरें मी फराळ झाल्यावर तें लिहून तयार करतों. भटजी, जा तुह्मीही आपल्या तयारीला लागा.

वैजनाथ--आज्ञा श्रीमंतांची! (तो जातो.)

बाजी--या संबंधानें कोणालाही मागमूस लागून देऊं नका. माधवरावाचें

मन आमच्याविषयीं कसं आहे, त्यांचा आमच्याकडे कितपत ओढा आहे; हें यावरून पहिल्यानं पहावयाचं आहे; आणि त्याप्रमाणें मग पुढं! तुमच्याविषयींही मी आतां त्यांना लिहितोंच, पण तुह्मी हें पक्कें लक्षांत ठेवा कीं, असाही एखादा दिवस येईल कीं त्या दिवशीं तो आणि मी एक होऊन तुह्माला प्रती **नाना**, नाना, ह्मणजे मुख्य मंत्री बनवूं ! अहो एकाच रक्तमांसापासून झालेले हे आमचे दोघांचे देह, आणि जीव केव्हां तरी एक होणारच! आणि ते एकदां एक झाले ह्मणजे मग असे तुमच्या नानासारखे शेंकडो मुत्सद्दी एक झाले तरी ते त्यांच्यानें अलग करवणार नाहींत. आह्मी ज्याला नाना करूं तो नाना होईल. नदीच्या ओघाचे प्रवाह असल्या बांधानें कां कायमचे बांधले जातात. पूर आला ह्मणजे ते बांद फोडून लागलेच एकमेकाला मिळतात, आलंना तुमच्या लक्षांत. त्याप्रमाणें वागा.

बलवंत—आलें, पूर्ण लक्षांत आलें! त्याचप्रमाणें करतों. आज्ञा असावी. [जातात.]

प्रवेश ४.

स्थळ—शिवनेरी किल्ल्यांतील बलवंतराव नागनाथांचा वाडा.

पात्रें—सत्यभामा येते.

सत्यभामा—[आपल्याशीं]. या दोन दिवसांत तर स्वारीचा निश्चय बदलला नाहीं, तेव्हां आतां तो फार करून तसाच टिकेल असं वाटतं; आणि तो तसाच टिकला पाहिजे. या असल्या धोपट मार्गानं जाणाऱ्या सरळ माणसांना कुठं कुठं वळणं येतात, त्या त्या वेळीं त्यांना जागं केलं पाहिजे. तेवढं चुकलं, कीं चुकला यांचा रस्ता. तेव्हां अजून थोडीशीं नानांची भेट झाल्यावर काय होतं त्यांची भिती आहे. पुण्याहून परत आल्यावर जर निश्चय सध्यां आहे असाच कायम राहिला, तर मग काम झालं ह्मणून ह्मणायला कांहीं एक हरकत नाहीं. सध्यां मला बरोबर जातां येत नाहीं, नाहीं तर मी तेथपर्यंतही गेलें असते, आणि स्वारीचा निश्चय लटपटण्याची वेळ येती

तर तसं होऊं दिलं नसतं. सध्यां स्वारीला एकटंच जाऊं द्यावं. पुढें पाहतां येईल. (बाजूला पाहून) ती पहा स्वारी श्रीमंत बाजीरावसाहेब पेशव्यांचा निरोप घेऊन आली बरं! चेहऱ्यावर तर उत्साह, आनंद आणि हासणं दिसत आहे.

(इतक्यांत बलवंतराव नागनाथ पुण्यास जाण्याच्या तयारीनें येतो.)

बलवंत–(आश्चर्यानें आणि हांसत हांसत) अरे वा; तूं तर आमची वाट पहातच दारांत अजून उभी आहेस म्हणायची!

सत्यभामा–इकडचा उत्साह, इकडचा आनंद, इकडचा जय झालेला पाहून मला जितका मनापासून आनंद होईल, तितका दुसऱ्या कोणाला होईल कां? त्याचा अर्धा वाटा आपल्याबरोबर घेण्याकरितां मला वाट पहातच बसलं पाहिजे. आपल्या मनांतून द्यायचा नसेल, पण मी तो घेतल्याशिवाय कधींच राहयाची नाहीं बरं कां? (त्याच्याजवळ जाऊन त्याचा हात धरते.)

बलवंत—तुमचं तुम्हाला घ्यायला कोणाची आडकांठी आहे. बरं आहे, येतो आम्ही, बाहेर माणसं खोळंबून उभी आहेत. मागचा नीट बंदोबस्त ठेवा, आम्ही लवकरच परत येऊं. पण दोन चार दिवसांनीं स्वारा हातीं इकडील सर्व कुशल वर्तमान कळवीत जा. तुम्ही परवां म्हणाला होता कीं, माझ्यासारखी बायको देखील शिवनेरी किल्ल्याचा बंदोबस्त ठेवील, त्या परीक्षेची आतांच वेळ आहे. पाहूं कशा कसोटीला उतरता तें!

सत्यभामा—तें सर्व परत आल्यावर कळेलच.

बलवंत—जा आतां आपण! मागची काळजी आपल्याला आहेच!

सत्यभामा—आपण मागची मुळींच काळजी करूं नये. सर्व लक्ष आतां पुढें ठेवावं. निश्चय मात्र ढळूं देऊं नये बरं कां? तें लक्षांत राहीलच म्हणा, पण उगीच सुचवितें.

बलवंत—(जातां जातां) किल्ल्याच्या दरवाजाच्या सर्व किल्ल्या संध्याकाळीं तूं आपल्याजवळ आणून ठेवीत जा; आणि रोज सकाळच्या प्रहरीं जमादार वर्दी देण्याकरितां जेव्हां येत जाईल, तेव्हां त्याच्या स्वाधीन करीत

जा. नेहमींप्रमाणें हे पहा मला आजही शुभ शकून होत आहेत, त्यावरून मीं हातीं घेतलेल्या कामांत मला खास यश येईल असं वाटतं.

सत्यभामा—कोल्हापूरची अंबाबाई तसंच करो.

(दोघे निघून जातात.)

अंक २ रा

प्रवेश पहिला.

स्थळ—शनवारच्या वाड्यांतील चौक.

पात्रें—कोंडाजी कामाठी हातांत केरसुणी घेऊन, तोंडानें गाणं ह्मणत केर काढीत आहे.

कोंडाजी—(गाणें)

बघनार, बघनार, होय बेजार, करी ही चार, अशी
ही मैना, मारुनि इष्कीचे बाण करी दैना ! ॥ १ ॥
फांकडी, लावि लाडिगुडी, घालि फुगडी, अशी ही मैना,
मारुनी इष्कीचे बाण करी दैना ॥ २ ॥

(इतक्यांत मैना मोलकरीण येते.)

मैना —(त्याच्या डोक्यांत लहानशी थप्पड मारून) काम कारितां करतां हें तोंडानं काय चाललं आहे. कुठली असली मैना आणली आहेस.

कोंडाजी—(वर पाहून) अग वा ग वा ! तूं कवा आलीस? तरी म्हटलं या पठ्याला डोक्यांत असं नाजूक हातानं मारनार कोन हाय ! इचिभन मैना, मैना ! दुसरं कुणी असतं, आणि त्यानं मला असं मारलं असतं, म्हणजे दावला असता त्याला माझा हिसका ! पण बघतुया तो मैना ! मैना, मैना तुला सदर परवानगी ! मार, मार, पन मैना डोळं नग मारूं ! आन डोळं मारायचं असलं तर पाट कवा लावनार ते कबूल कर पहिल्यानदां !

मैना—मेल्या तुझ्याशीं रे पाट लावायचा! मोठा मेला मदनाचा पुतळा पडला किनई. असल्या कामाठ्याशीं कोण पाट लावायला बसलं आहे! माझ्या खेटराशीं लाव मेल्या पाट! म्हणजे रोज कामाठ्याचं काम करतां करतां तुझं आंग दुखून आलं, कंबर मोडली म्हणजे मग चांगली माझ्या लाथांनीं रगड रगड रगडून घ्यायला सांपडल.

कोंडाजी—पाट लावला म्हणजे, बायकुच झालीस, आन बायकुच झालीस म्हणजे, भाकर कराया हुवी, पानी भरायला हव, माझं आंग रगडाया हव, रोज पाय दाबलं पाहिजे, समदं केलं पाहिजे, त्यांत इकतंस जर चुकलं तर कोंडाजीची लाथ बसली बघ बककन पेकटांत! मग तुला अशी गुलजार गुलाबाच्या फुलावानी घरांत ठेवीन कीं, समदं जन पहातच राहतील! पन मग तुला अशी कोंबड्यावानीं इकडं तकडं धांवू नाहीं देनार! बरं कां?

मैना—अरे मेल्या तुझ्याशीं पाट लावायला तयार आहे कोण? तूं मेल्या चार रुपड्याचा कामाठी, केर काढणारा! तुझ्याजवळ आहे काय?

कोंडाजी—काय म्हणजे, बघ कीं मी कसा ताकदवाला आहे तो, माझ्या बानं आन आईनं मिळून तीन संभर रुपयं टिवलंत, रुपय. त्याचं तुला, गोट करीन, वाकी करील, सरी करीन, तोडं करीन, जोडवी करीन, दंडांतलं बाजूबंद करीन, मोठी झपकेदार नथ करीन, आन लफेदार लुगडंबी घेईन.

मैना—सगळं मेल्या त्या तीनशे रुपयांत करणारना तूं? ए बोकडा, असं कोणाजवळ बोलूं तरी नकोस! नाहीं तर या कामाठ्याजवळ इतके रुपये कुठून आले म्हणून वहिमानं तुला चोर म्हणून पकडून चावडीवर बसवून ठेवतील आणि चांगले चाबूक मारतील.

कोंडाजी—कोणा लोकाची मा व्याली मला चोर म्हनन्याची. येऊं दे त्याला माझ्या म्होरं म्हणजे एक्या हिसक्याबरोबर त्याचं थोबाडच फिरवून देईन! हें तूंच म्हनालीस म्हणून गप्प बसलों, नाहीं तर दावला असता कचका! म्हनं चोर म्हनतील! कां इचभन चोर म्हनतील? कुनी मला पकडलं काय? पकडलं तर खरं म्हनन, नाहीं तर मारीन या पायांतलीं

खेटरं! मी कमवीत नाहीं, कां माझ्या बान कमावलं न्हाई, कां माझ्या आईन कमावलं, नाहीं? माझ्या बानं कमावलं, माझ्या आईनं कमावलं, आन मी बी गडी कमावतो आहे कां नाहीं? म्हणं चोरलं! मग मैना कवा कवा पाट लावनार? सांग कीं, तुझं बी दिस फुकट जातात, आन माझं बी जात्यात. दोन वर्सापासून तुझ्या पाठीमागं लागलोया, तवाच पाट लावला असतास ह्मणजे या दोन वर्सांत दोन पोरं नसतीं झालीं. लवकर पोरं झाली ह्मणजी ह्मातारपणीं तुझ्या आन माझ्या हातापायाला उपयोगीं न्हाई पडनार?

मैना—पहा मेला पोराकरितां कसा हापापला आहे तो! मेल्या तूं बोलून चालून कामाठी, केर काढणारा, तूं कां श्रीमंताजवळचा हुजऱ्या, जासूद, नाईक, जमादार, कां शूर शिपाई आहेस तर तुझ्या बरोबर पाट लावूं?

कोंडाजी—मी कामाठी, राह्यलं. आनि तूं ग कोनच्या राजाची रानी? मसनांतल्या झोटिंगाची व्हय! इचभन मला कामाठी ह्मनते! मी जसा कामाठी आहे तशी तूं नाहींसकां बटीक! तुझी आजी बटीक होती, आई बटीक होती, आन तूं बटीकच आहेस! पन पाट लावल्यावर तुला जर पोरगी बिरगी झाली तर तिला मात्र बटिक नाहीं करूं देनार! इचभनं बटकी झाल्या ह्मनजे धा मानसांत राहून चटोर होत्यात. मग तुझ्यावानी हाकडं बघ; तकडं बघ; हाकड धांव तकड धांव, ह्यो नको; त्यो पाहिजे; असं करायला लागत्यात! एका जागीं कधींच त्यांचा पाय टिकत नाहीं.

मैना—केर काढतां काढतां, अंगावर केर किती उडाला आहे, शेणानं चौक सारवता सारवता अंगाला शेणाची तरी कोण घाण येते आहे! ओ! (ओकारी देते व थुंकते) नको मेला असला कामाठी.

कोंडाजी—तुझ्या अंगाला अशी अत्तरच फासलंय नव्हं! काय सटवाई बोलतीया! बाईसाहेबाजवळ राहिलया, ह्मणून लई दिमाख लावतीस व्हय! ठावं आहेस कीं दोन वर्सांमागं याच्या त्याच्या घरीं दळाण दळीत होतीस ती! हाताचं घट्टं अजून गेलं नसतील! तुला जासूद, हुजऱ्या, शूर शिपाई नवरा होवा व्हय? कामाटी नग?

मैना—अरे माझ्या बरोबरीचा पाहिजे !

कोंडाजी—आन मी तुझ्या बरोबरीचा नव्हे कां ? बघ कीं ठेंगणा असलों तरी बी तुझ्याहून चार बोटं उच्च आहे [तिच्या जवळ जाऊन तिच्या बरोबरीनें उभा राहतो.]

मैना—[त्याला दूर ढकलून देऊन] मेल्या उंचीनं नव्हे, माझ्या योग्यतेप्रमाणें पाहिजे. कामाठ्याशीं पाट लावलेला ऐकला ह्मणजे माझ्या दुसऱ्या सोबतीणी मेल्या तोंड काढून देणार नाहींत.

कोंडाजी--बरं त्ये राहिलं ! मी जर मोठा जासूद, हुजऱ्या, शिपाई बच्च्या झालों, तर मग तर लावशीलना माझ्याशीं पाट ?

मैना—तूं आतां शिपाई बच्यारे कसा होणार ? तुझा बाप मरून गेला आणि आईही मरून गेली, आणि ते सुद्धां कामाठीच होते. ह्यातारपणीं तुझ्या बापाला कांहीं शिपाई होता आलं नसतं.

कोंडाजी—अग सटवे तसं नव्हे. मी शिपाई गडी नाहीं कां होनार? मग काय, बोल बोल, लावशीलना माझ्याशीं पाट ! [तिचा हात धरतो.]

मैना—तूं आधीं हो तर खरा ! मग पाहतां येईल. चल सोड हात ! त्या पहा बाईसाहेब तिकडे जाताहेत, त्यांनीं पाहिलं तर काय ह्मणतील ! जाऊं दे मला ! (हाताला हिसडा देऊन जाते.)

कोंडाजी—(आपल्याशीं) आपल्यालाही ह्या चौक झाडण्याचा आतां कट्टाळा आला, आपण सोडनार हें काम. नग इचिभन अक्सी केरांत आणि पोतेऱ्यांत राहनं. ही मैना लई फटाकडी आहे. बोलती बी गोड, आन उडतीबी लई. हिला धरली पाहिजे. नाहीं तर दुसरा पोपट हिला उडवील ! कांहीं तरी करून बामनावानी, हाकडचं तकडं, तकडचं हाकडं, कुत्रचात्रं पाय मांजरावर, मांजराचा पाय कुतऱ्यावर करूनशेनी जासूद, नाहीं तर हुजऱ्याच झालं पाहिजे. शिपाई होनं नग. फुकाट एखाद दिवसीं ढेकनावानी मेलं ह्मणजे मैना गेली आन सगळच गेलं ! ! [जातो.]

प्रवेश दुसरा.

स्थळ—शनवारच्या वाड्यांतील आरसे महाला पुढचा दिवाणखाना.

पात्रें—दाजीबा आपटे आणि मोरोपंत भावे येतात.

दाजीबा—कां मोरोपंत, त्या बुढ्या निजामाला असं वाटलं होतं कीं, सध्यां पेशवाईंत कांहीं रामच राहिला नाहीं; पेशवाईंत कोणीच कर्ता, मुत्सद्दी, शूर वीर आणि बाणेदार पुरुषच राहिला नाहीं, आणि ह्मणूनच त्यानं आणि त्याच्या त्या मस्त दिवाणानं आमच्या श्रीमंतांची आणि नानांचीं सोंगं तमाशांत आणलीं होतीं. त्या मशिरउन्मुलुखास ह्मणावं कीं, लेका तूं तर आमच्या धन्याचीं सोंगंच तुझ्या तमाशांतल्याच दरबारांत आणून तीं सर्व मानकरी लोकांस दाखविलीस; पण तुझं प्रत्यक्ष सोंग आतां पेशव्यांचे चाकर दारोदार हिंडवून पुण्यांतील लहान मोठ्या सर्व बायकांपोरांसही दाखवीत आहेत ! ! श्रीमंतांचा पुण्यप्रतापच तो !

मोरोपंत—श्रीमंतांचा पुण्यप्रताप तर खराच, पण नानांची कर्तबगारी कांहीं कमी नाहीं. श्रीमंत नारायणराव पेशव्यांचा वध झाल्यापासून या मराठी राज्यावर, या आपल्या पेशवाईवर गृहकलहामुळें केवढालीं अक्कल गुंग करून टाकणारीं तुफानं आलीं; त्या सर्व तुफानांतून हें महाराष्ट्र राज्यरूपी तारूं धैर्यानं तडीस नेऊन लावणारे खरे नाविक एक **नानाच** ! पेशव्यांचा वैभव रवी उदयचलावर आणून सर्व हिंदुस्थानांतील लोकांचे डोळे दिपवून टाकणारे प्रति अरुण एक **नानाच** ! यांत कांहीं शंका नाहीं. दादासाहेबांचं बंड, फिरंग्यांचे डावपेंच, निजामाचीं कारस्थानं, टिपूच्या गुरकावण्या; इतक्या सर्वांना जागच्याजागीं जिरवून, खरड्याच्या लढाईच्या वेळीं सर्व मराठे वीरांस एका निशाणाखालीं आणण्याची अजब युक्ति अशी **नानांचीच** ! इतकी कुलंगडीं मागें असून, "जवळ जवळ एक लक्ष सैन्य घेऊन पुणें जाळून टाकून त्याची राख पेशवे, त्याचे मंत्री नाना, आणि त्यांचे ब्राह्मण सरदार, यांना अंगाला फांसायला लावून हातांत तुंबा देऊन काशीस रवाना करीन, आणि मराठे वीरांस शेतं नांगरायला व मेंढ्या चारायला लावीन." अशी ग-

र्जना करीत येणाऱ्या निजामाची खोड मोडण्याची विलक्षण अक्कल **नानां-चीच** ! इतरांची तर अशा प्रसंगीं अक्कल गुंगच व्हावयाची ! सध्यां जी दिन दुनिया रात्रंदिवस " यशवंत फडणीस नाना, यशवंत फडणीस नाना," म्हणून त्यांचे पोवाडे गात आहे, तें अगदीं यथार्थ आहे. राज्याला मंत्री असावा तर असाच असावा !

दाजीबा—यांत काय संशय ! श्रीमंताचं देखील लहान वय असून केवढं धैर्य, केवढा उत्साह, काय चातुर्य, केवढा अभिमान. भागानगरचे वकील गोविंदराव काळे, आणि गोविंदराव मामा पिंगळे यांनीं निजामाच्या दर-बारांत केलेली प्रतिज्ञा ऐकून लागलीच स्वारीनीं " तयारी करा " म्हणून हुकूम सोडला.

मोरोपंत—लहानपणापासून आपल्या देखरेखीखालीं आणि मोठ्या का-ळजीनं जोपासना करून नानांनीं वाढविलेल्या झाडाचें फळ गोड असायचेंच !

दाजीबा—जसं नानांचं पोटच्या पुत्राप्रमाणें श्रीमंताच्या ठिकाणीं प्रेम आहे, तशीच श्रीमंतांचीही नानांच्या ठिकाणीं अत्यंत भक्ति आहे.

मोरोपंत—नानांची श्रीमंतांशीं तशीच वर्तणूक आहे. पाटिलबोवाचा कावा नानांच्या आणि तात्यांच्या जितका लवकर लक्षांत आला, तितका दुसऱ्या कोणाच्याही लवकर आला नाहीं.

दाजीबा—श्रीमंतांच्याही तो तितकाच लवकर लक्षांत आला; नाहीं तर या वेळपर्यंत ब्राम्हणशाई लयाला जाऊन शिंदेशाई केव्हांच झाली असती.

मोरोपंत—कोणाचे कसे डावपेंच आहेत, कोण कसा आहे, कोणाचा कोणच्या वेळीं उपयोग होईल, कोण कोणच्या लायकीचा मनुष्य आहे, को-ण कोणचं काम चांगलं करील; वगैरे प्रत्येक मनुष्याची पारख नानांना जितकी आहे, तितकी दुसऱ्याला क्वचित् असेल.

(इतक्यांत बलवंतराव नागनाथ व वैजनाथभट्ट येतात.)

हें पहा (त्यांच्याकडे पाहून) त्याचं प्रत्यक्ष उदाहरण. या बलवंत-राव नागनाथांची ज्या कामीं त्यांनीं योजना केली आहे, त्या कामावर दुस-ऱ्या एखाद्या लेचापेचा पागेदाराची जर तेथें नेमणूक झाली असती, तर

कामाचा तेव्हांच बोजवारा वाजला असता. या बलवंतराव या, कां सर्व खुशाल ?

दाजीबा—काम झालं वाटतं. शिवनेरीस परत जाण्याची तयारी दिसतें ?

मोरोपंत—राव, येथें येतां केव्हां, जातां केव्हां; तुह्मी तर कांहींच आह्माला पत्ता लागून देत नाहीं. मांडलं आहे काय तुह्मी. राव, नुसत्या भेटींतून देखील आह्मी गेलों कां हो ? बरं बोवा !

बलवंतराव—अहो, मला बोलून तर द्याल कीं नाहीं ! सर्वच तुह्मी बोलूं नका.

दाजीबा—नाहीं पण जाणार केव्हां ? आतां कां संध्याकाळीं ?

बलवंत—आतांही नाहीं आणि संध्याकाळींही नाहीं.

मोरोपंत—तर मग रात्रीं जाणार असतील !

बलवंत—नाहीं, आतां नाहीं, संध्याकाळीं नाहीं, आणि आज रात्रींही नाहीं. उद्यां रात्रीं जाणार आहे.

दाजीबा—त्याचंच नांव तें ! आज नाहीं उद्यां ! राव, इतकी जर तुह्माला जाण्याची निकड असते, तर येथें येतांही कशाला ? व आह्माला नुसतं भेटता तरी कशाला ? चला चालते व्हा !

बलवंत—अहो, श्रीमंत माधवाचं दर्शन घ्यायचं झालं, ह्मणजे दोघा जयविजय द्वारपालांचं आधीं दर्शन घ्यायला नको कां ?

मोरोपंत—ह्मणून आमचं दर्शन घ्यायचं ! बाकी मनापासून कांहीं नाहीं इच्छा !

बलवंत—ह्मणा बोवा काय वाटेल तें ह्मणा ! फार, दिवसाच्या व लहाणपणच्या स्नेहांची गांठ पडली, ह्मणजे मग तेथें कांहींच चालत नाहीं. ते जें मग बोलतील तें ऐकून घेणं भाग आहे. तरी बरं, कीं प्रत्येक वेळेला तुह्माला भेटल्याशिवाय जात नाहीं ह्मणून. बरं आहे, नाहीं तर तुह्मी आमच्यावर काय कहर उसळून दिला असतां, आणि आमची काय दशा केली असतीत तें प्रभु जाणे !

दाजीबा—बरं पण आलेत केव्हां ?

बलवंत—काल आलों! आल्याबरोबर नानांची भेट घेतली, आजही घेतली काम उरकून घेतलं, आणि आज ह्मटलं आल्यासारखं श्रीमंताची भेट घ्यावी, यांचीही भेट करवून द्यावी, आपली उभयतांची भेट घ्यावी, आणि उद्यां मग आपल्या चाकरीवर परत जावं, असा विचार करून आलों. तुम्ही कसचं भेटतां, तुह्मी तर सध्यां श्रीमंतांना जय मिळाला ह्मणून आनंदोत्सवांत दंग! तुम्हाला आमची आठवण कसची होते. भल्या गृहस्थानो, यजमान विसरले म्हणून तुम्ही देखील आम्हाला विसरावंना! ही तुमची आमची मैत्री!

दाजीबा—बरं, बरं, म्हणे आनंदोत्सवांत दंग! (हलकेच) हे कोण?

बलवंत—हे विजयदुर्गाहून आले आहेत, श्रीमंताच्या श्वशुराकडचे आहेत. भेट घ्यायची आहे, व कांहीं श्रावण मासासंबंधानं जुळलं तर पहावं ह्मणून आले आहेत. मोठे ज्योतिषी असून विद्वान आहेत.

मोरो०—ठीक.

बलवंत—श्रीमंताची स्वारी काय करीत आहे?

दाजीबा—बाबूराव फडक्याजवळ बोलत बसली आहे. अंमळ थांबा, वर्दी धाडा आणि मग जा! आम्ही जातों कचेरींत. पण उद्यां जायच्या आधीं मात्र कृपा करून भेटा.

बलवंत—ठीक आहे.

(सर्व जातात.)

प्रवेश तिसरा.

स्थळ—शनवारच्या वाड्यांतील आरसेमहाल.

पात्रें—श्रीमंत सवाई माधवराव आणि बाबूराव फडके बोलत बसले आहेत.

(पडद्यांत गोंधळी लोक पोवाडा म्हणत आहेत.)

माधव—बाबूराव, मला वाटतं या आपल्या लोकांना वेड लागलं आहे. एकसारखं रात्रंदिवस पोवाडे गावें, अशी आपल्या लोकांनीं या खड्र्याच्या

लढाईंत मर्दुमकी केली, असं मला तर कांहीं बोवा वाटत नाहीं. आपल्या फुशारकीचे व बहादुरीचे आपणच पोवाडे गाण्याबद्दल, निजामाच्या वेडेपणाचे जर आपण पोवाडे गायले तर मला वाटतें तें याहून बरं! तूं आघाडीवरच होतास, पहिला हल्ला तुझ्यावरच पडला होता, तेव्हां तूंच सांग बरं, शत्रुचा जोर कितपत होता तें! आह्मी तर तंबूंतच बसलों होतों ह्मणा. तुमच्याकडून जशी बातमी यायची, त्याप्रमाणें आमचा तंबू पुढें किंवा मागें सरायचा! माझ्या काकांनीं आणि आजोबांनीं राक्षसभूवन, उदगीर, वगैरे ठिकाणीं घनघोर लढाया मारून, जशी निजामाची आणि हैदरनाईकाची, आणि सावनूरच्या नबाबाची, मारे मारून रग जिरविली, तशी कांहीं ही खर्ड्याची लढाई झाली नाहीं. तशी, तशी लढाई व्हायला पाहिजे होती, व माझ्या मनांतून तुझा सर्वांबरोबर आघाडीवर यावं असं होतं, पण तसं कांहींच झालं नाहीं. झालं कां? खरं सांग, उगीच माझ्या तोंडासारखं बोलूं नकोस? आपला जय झाला म्हणून, आपले वाजवीपेक्षां ज्यास्त गोडवे गाणं कांहीं बरें नाहीं.

बाबूराव—निजामाचा जोर कांहीं कमी नव्हता. त्यांचा आपसांतल्या-आपसांत घोंटाळा झाल्यामुळें त्यांची जास्त फजिती झाली! तो घोंटाळा जर झाला नसता, तर आपल्याला इतका लवकर जय मिळाला नसता हें खास! पाणी हातचें गेलं, गढींत शिरून आपल्याला कोंडून घेतलं, धांदल उडाली, यामुळें निजामाला अपजय आला. कांहींना कांहीं तरी होऊन गर्वाचं घर खालीं व्हावयाचेंच! जो दुसऱ्याची नक्कल आपल्या घरीं बसून करतो, त्याची नकल मग अशीच घरोघर होते. या लढाईवांचून कांहीं आडलं होतं कां? दरबारांत बसून तमाशा केला, तेव्हां त्याचा सर्व जगभर तमाशा झाला. पण मोठ्यांच्या तमाशाकरितां गरीब विचारे शूर शिपाई मात्र रणांगणांत फुकट बळी पडले. छान झाली, निजामाची चांगली खोड मोडली. तो पुनः असले तमाशे कधीं करायचा नाहीं.

माधव—त्याच्या वेडेपणाच्या कृतीबद्दल त्याला चांगलं शासन मिळालं हें कांहीं गैर झालं नाहीं, पण माझ्या मनाप्रमाणें जशी लढाई व्हायला

पाहिजे होती, तशी कांहीं बोवा झाली नांहीं. आपल्या पटवर्धन वीरांपैकीं विठ्ठलराव मात्र अमोल हिरा या लढाईंत हारपला. त्याला दोन तीन जखमा किती जबर लागल्या होत्या, त्या तूं पाहिल्याच होत्या. अरे, तो अर्धा शुद्धींत, अर्धा गैरशुद्धींत होता तरी जेव्हां थोडासा सावध होई, त्यावेळीं सुद्धां 'मारा, झोडा, पुढें सरा, मी कुठें आहे, माझे लोक कुठें आहेत,' असेंच बडबडत होता. लढाईचें त्याला कोण स्फुरण चढलं होतं. खरा शूराचा बच्चा तो यांत कांहीं शंका नाहीं. खऱ्या वीराला योग्य असेंच त्याला धारातीर्थीं मरण आलं. त्याच्या मृत्यूमुळें भाऊंना फार दुःख झालं आहे. मरण यावें तर तें असेंच धारातीर्थीं यावं. नाहीं तर घरांत आंथरूणावर पडून, सहा सहा महिने कुजत पडलेच आहेत; असलं मरणं ह्मणजे तें कुत्र्याचं मरणं! तो जर जगता तर खरोखर एक अप्रतिम नांव घेण्याजोगा वीर झाला असतां.

बाबूराव—यांत काय संशय! पटवर्धन मंडळींतला तो एक मोहरा होता. शिवाय स्वभावानं किती चांगला, किती मनमिळाऊ, किती बोलका आणि केवढा धाडसी! ज्या त्या कामांत आपण पुढें व्हावयाची त्याला फार हौस होती.

माधव—(उसासा टाकून.) जेव्हां जेव्हां मला त्याचं स्मरण होतं, तेव्हां तेव्हां मला बराच वेळपर्यंत कांहीं एक सुचेनासं होतं. तो जर जगता तर तो खास सवाई भाऊ झाला असता.

बाबूराव—खचित झाला असता!

माधव—बरें, बाबूराव, जे शिपाई लढाईंत पडले व जखमी झाले त्यांच्या बद्दलची काय व्यवस्था केली आहे?

बाबूराव—सर्वांची हजिरी घेऊन, जे लढाईंत पडले असतील, त्यांच्या वारसास वेतन करून देण्याचं, जो कोणी सरकारची नौकरी करण्यास तयार असेल, त्याला त्या जागीं कायम करण्याचं, व जखमी झालेल्यास पोटगी देण्याचं वगैरे काम रोज कचेरींत नानांच्या समोर चालत असतं, आणि ते-

वळ्या करितांच मला कचेरींत लवकर जायचं आहे, तेव्हां मला आज्ञा असावी. नाना माझी वाट पहात असतील.

(इतक्यांत हुजऱ्या येऊन बलवंतराव नागनाथ आल्याची वर्दी देतो.)

माधव—तुमची हजिरी झाली ह्मणजे मग एक आंकडा मला कळवा.

बाबूराव—लवकरच कळवितों.

माधव—घरीं जातांना इकडे येऊन मला भेटून जा.

बाबूराव—आज्ञा.

(तो जातो; व बलवंतराव नागनाथ आणि वैजनाथभट्ट येतात व नमस्कार करून बसतात.)

माधव—कां पागेदार, केव्हां आलांत शिवनेरीहून ?

बलवंत—सरकार, काल आलों. सरकारी काम होतं तें आज उरकून घेतलं, आणि ह्मटलं दोन तीन महिने झालें सरकार चरणाचं दर्शन घ्यावं आणि मग परत जावं, अशा इराद्यानं दर्शनाला आलों.

माधव—कशी काय तिकडील खबरबात ? आमचे बाबासाहेब, आप्पासाहेब, सर्व कुशल आहेत ना ?

बलवंत—हो, सर्व कुशल आहेत; आणि त्यांनीं हें श्रीमंतांस गुप्त रितीनं देण्याकरितां (इकडे तिकडे पाहून लखोटा काढून त्यांच्या हातीं देतो) दिलं आहे, व "आमच्यावर कृपा असावी" अशी त्यांनीं श्रीमंताजवळ—

माधव—बोला, बोला, कांहीं हरकत नाहीं. (लखोटा घेतो.)

बलवंत—हें सर्व गुप्त रितीनं व्हावं, आपल्याशिवाय दुसऱ्या कोणासही कळूं नये, अशी त्यांची इच्छा आहे.

माधव—असें काय ? बाबासाहेबांच्या मर्जीप्रमाणेंच सर्व होईल. काय ह्मणतात बाबासाहेब !

बलवंत—त्यांचं दुसरं-कांहीं-ह्मणणं नाहीं. फक्त "श्रीमंताची आमच्यावर कृपा असावी, व कुशल वर्तमान वरचेवर कळवीत जावं," अशी त्यांची श्रीमंताजवळ विनंती आहे.

माधव—(हांसून) काय ? बाबासाहेब मला विनंती करतात !

बलवंत—याचं उत्तर—श्रीमंतांनीं—दिल्यास मी तें घेऊन जाईन. श्रीमंताजवळ मी बाबासाहेबांचे व आप्पासाहेबांचे किती गुण वर्णन करावे? जितके करावे तितके थोडेच आहेत. घोड्यावर बसण्यांत, भाला फेंकण्यांत, तीरंदाजी करण्यांत, बोलण्यांत, रूपांत वगैरे सर्व गोष्टींत ते प्रती थोरले रावसाहेब बाजीरावसाहेबच आहेत. पाहिजे असेल तर या भटजींसच विचारावं.

माधव—[त्यांच्याकडे पहातो व त्यांचें बोलणें लक्षपूर्वक ऐकतो.] असं काय?

वैजनाथ—बाबासाहेबांची इभ्रत केवढी, रुबाब कसला. शिवाय ते ब्रह्मकर्मांत, शास्त्रांत, वेदांतांतही तसेंच निपूण आहेत. ते ब्रह्मकर्मांत आणि क्षात्रकर्मांत निपूण असल्यानं मला वाटतं कीं, सांप्रतकाळीं ते परशुरामच आहेत. धाकटे आप्पासाहेब तरी लहान वय असून श्रीमंताचे आजे जे आप्पासाहेब, मागें होऊन गेले तेच आहेत. त्या उभयतां बंधूंच्या अप्रतीम गुणावरून श्रीमंत थोरले रावसाहेब जे बाजीरावसाहेब व आप्पासाहेब यांची, त्यांच्या पूर्वजन्मीं क्षात्रधर्माबद्दलची हौस पुरी झाली नाहीं, ह्मणून पुन्हां ते अवतीर्ण झाले आहेत, असें सर्व लोक ह्मणतात.

माधव—(आनंदीत मुद्रेनें) पेशव्यांच्या कुलांतील पुढच्या पुरुषांचं, आपल्या मागील पूर्वजांचा कित्ता वळवून त्यांच्याप्रमाणेंच व्हावयाचं, असं व्रतच आहे. बरं पण पागेदार, हे भटजी कोण?

बलवंत—हे भटजी, विजयदुर्गाकडचे श्रीमंतांचे श्वशूर जे गोखले त्यांच्याकडून आले आहेत. शिवनेरीस होते. मोठे ज्योतीषी असून विद्वान् आहेत. श्रावणमास आला आहे, पुण्यास जाण्याबद्दल व श्रीमंतांचं दर्शन व्हावं ह्मणून बाबासाहेबापाशीं त्यांनीं विनंति केली, तेव्हां त्यांच्या आज्ञेवरून मी त्यांस येतांना श्रीमंतांच्या दर्शनाकरितां बरोबर घेऊन आलों.

माधव—ठीक आहे. बलवंतराव तुह्मी परत जाणार केव्हां?

बलवंत—मी उद्यां संध्याकाळीं जाण्याचा बेत केला आहे.

माधव—बरं तर मला पुन्हां उद्यां संध्याकाळीं जाण्याचे आधीं येऊन भेटा, ह्मणजे मग तुह्माला जें काय मला सांगायचें असेल तें सांगेन; आणि यांच्याबद्दलही काय करायचं तें करीन.

बलवंत—श्रीमंतांच्या आज्ञेप्रमाणें करीन. हें–सर्व–गुप्त रितीनं–व्हावं–अशी त्यांची इच्छा आहे.

माधव–बाबासाहेबांच्या ह्मणण्याप्रमाणें सर्व होईल. (ते दोघे नमस्कार करून जातात.) (आपल्याशीं) दादासाहेबांच्या आणि आजीबाईच्या कारस्थानामुळें माझे बाबा, गारद्यांच्या हातून मृत्यू पावले, असें सगळे लोक ह्मणतात आणि तेवढ्या करितां त्यांचें नांव निघालें कीं, अद्यापपर्यंत सर्व जण तिरस्कारानें नाक मुरडतात, व मी देखील आजपर्यंत तसेंच करीत होतो. पण बाबासाहेबांनीं एका पत्रांत या सर्व गोष्टींचा खुलासा करून टाकल्यामुळें, बाबासाहेबाबद्दल मला जो प्रथम राग येत असे, तो विनाकारण होता अशी माझी खात्री झाली. ज्या गोष्टी माझ्या व बाबासाहेबांच्या जन्मापूर्वी झाल्या, त्या गोष्टीबद्दल आह्मी परस्परांनीं परस्पराशीं द्वेष करावा आणि तो देखील पूर्वीच्या ऐकीव गोष्टीवर, हें किती अनुचित्. त्यांतून बाबासाहेबांसारख्या प्रेमळ मनुष्याचा द्वेष विनाकारण करणें हें तर फार अयोग्य. त्यांच्या मनाला देखील याबद्दल फारच वाईट वाटत असेल त्यांच्याशिवाय माझे जवळचे आप्त दुसरे कोण आहेत. ती गोष्ट त्या हरामखोर गारद्यांनीं केली, कीं आजोबा आजीबाईकडून झाली, हें खरें कांहींच कळत नाहीं. बाबासाहेबांसारखे प्रेमळ मनुष्य सांपडणें कठीण आहे! हेंच पहाना, त्यांनीं मला किती गौरवून लिहीलं आहे, तेंच तें पत्र एकदां दोनदां वाचून माझी तृप्ती होत नाहीं, शंभरदां वाचावेंसें वाटतें. (पत्र पुन्हां काढतो व पुन्हां ठेवतो) रात्रीं निजण्याचे वेळीं एकांतीं वाचूं. सध्यां मंडळी येण्याची गडबड आहे, तेव्हां आतां काढूं नये व वाचूं नये हेंच बरें. (पेटींत बंद करतो.) जातो.

प्रवेश ४ था.

स्थळ—श्रीमंत सवाईमाधवरावाच्या महालाबाहेरचं दालन.

पात्रें—कोंडाजी दालनांतील बैठक घालीत आहे.

कोंडाजी—(आपल्याशीं) मी कालपून बघतुया, त्यो शिवनेरी किल्यावरचा पागेदार बामन, आन त्येचा बरोबरीनं त्यो दुसरा बामन शिरीमंताकडे जात्याती, येत्याती, येत्याती जात्याती, आंत बाहिर, असं त्यांनीं कालपून धा वखत केलं असंल. शिरीमंताजवल जाऊनशानी वढाळ बसत्यात; गुलगुल गोष्टी करत्यात, तवा इचिभन् ह्ये आहे तरी काय कारीस्थान; येचा तपास काढला पाहिजे. आतां जवा जवा यो बामन शिरीमंताजवल येत जाईल, तवा तवा काई बी काम काढून मला हातच काम करीत राह्यलं पाहिजे, त्याबगर हें लचांड काय आहे त्ये उमगायचं नाहीं. हातानं काम करून कान आन् डोळं समदं मला तकडच लावलं पाहिजे. हे समदं हेरूनशानी त्येची खबार द्यावी नानासाहिबासनी; ह्मणजे कवा न कवा तरी आपलं उखाळ पांढरं होईल. त्यासनी ह्ये समदं हेरून सांगितलं ह्मणजे त्ये माझी पाठ थोपाटत्याल, मला मोठा इमानदार ह्मनत्याल, मला बक्षिस देत्याल, आन मला दुसरं काम बी देत्याल. मला दुसरं काम मिळालं ह्मनजे मग मी कोंड्या कामाटी न्हाई राहनार. कोंडाजीराव बनून जाईन. मग बघु, बघु तर खरं ती फुटान्यावानी आक्सी उडनारी मैना मला कशी क्यार पोत्यारं करनारा कोंड्या कामाटी म्हनते ती ! ह्यो कोंडाजी त्या मैनेकरितां काय वाटंल त्ये करील; जासूद होईल, हुजऱ्या होईल, वाटंल त्यो होईल; पन त्या माझ्या अस्तुरीला हातची जाऊं देनार नाहीं, आन् तिच्याशीं पाट लावल्याबगर कधीं बी राहनार न्हाही. इचभन् ती हय बी लई फटाकडी, आन टपटपा उडती बी लई. आक्सी मुरक्यातच. पन ह्ये समदं काम युक्तीनं केलं पाहिजे; आन् आपला कावा कुनासनी कलून देऊन उपयोगी नाहीं. त्यो त्यो पहा, त्यो कालचा पागेदार शिरीमंताजवळ पुन्हा बिगी बिगी चालला हाय. तिथं मुर्दाडावानी काम करत राहून समदं हेरलं पाहिजे. (जातो.)

प्रवेश ५ वा.

स्थळ—श्रीमंत सवाई माधवरावाचा महाल.

पात्रें—श्रीमंत सवाई माधवरावपेशवे बसले आहेत.

माधव—(पत्र लिहून पुरें करतो आणि पेटींतून बाजीरावाचें पत्र काढून वाचतो.) काय लिहितात बाबासाहेब आजच्या या—पत्रांत—

"विशेष. ज्या आपल्या प्रतापवंत पूर्वजांच्या गादीवर आपण बसला आहांत त्या गादीला शोभा आणणाऱ्या, तिचा प्रभाव जास्त वाढविणाऱ्या आणि आपल्या शौर्यशाली पूर्वजांच्या वंशजाना शोभणाऱ्या, अशा अनेक गुणगणांनीं आपण मंडीत आहांत. आपले सद्गुण सर्व आबालवृद्धांच्या तोंडून ऐकून आह्माला जो आनंद होत आहे, तो पत्रीं लेखन करण्यास आम्हीं अगदीं असमर्थ आहोंत. आपले गुणानुवाद आणि आपण नुकतांच आपल्या प्रबल शत्रूवर मिळविलेला जय ऐकून, आपलें प्रत्यक्ष दर्शन घेऊन आम्हीं केव्हां आपणाला कृतार्थ मानूं व या उत्सुक झालेल्या आमच्या नयनचकोरांची तृप्तता करून घेऊं, असें आह्माला झालं आहे. तो प्रत्यक्ष दर्शनाचा सुदीन जेव्हां कधीं उगवेल तो उगवो; सध्यां तर तसें होण्याची उभयतांसही आशा नाहींच, पण मनोमन साक्षीनें आणि पत्रोत्तरानें भेट घेण्यास कांहीं हरकत श्रीमंताकडून तरी असेल असें वाटत नाहीं. आपलीं मनें जर एक आहेत, तर त्याला दुसऱ्याच्या प्रतिबंधानें कांहीं व्हावयाचें नाहीं. आपल्या उभयतांच्या जन्मांतरीच्या झालेल्या गोष्टी मनांत ठेवूं नयेत. त्याबद्दल मला किती वाईट वाटतें हें पत्रीं लिहितां येत नाहीं. त्याचा माझ्याकडे काय अपराध कीं, त्यामुळें मी आपला, असें होण्यास अगदीं अपात्र व्हावें. असो, आमच्यावर कृपादृष्टी असावी, वरचेवर कुशल यांच्याबरोबर कळवीत जाणें, हीच विनंती आहे."

हें मला किती गौरवानं लिहिलं आहे. मला किती मोठेपणा दिला आहे. माझे किती गुण गायले आहेत. बाबासाहेब माझ्या मनांत त्याबद्दल कांहीं एक नाहीं. बरोबरच आहे, मोठ्यांचें अंतःकरण आणि दृष्टी हीं दोन्ही मोठीं-

च असतात. त्यांना दुसरे लोक आणि दुसऱ्याचे गुण कितीही लहान असले, तरी ते मोठेच वाटतात. बाबासाहेब, पत्रांतून वारंवार जितकें आपण माझं वर्णन करतां, तितका खरोखरच मी नाहीं. (थोडें थांबून) बरं, त्यांचं मला जसं पत्र आलं आहे तसंच, त्यांच्याच पत्राच्या तोंडीचं माझंही पत्र त्यांना गेलं पाहिजे. पाहूं बरं तें तसं लिहिलं गेलं आहे कीं नाहीं ! [पत्र घेऊन पुन्हां वाचतो.] पाहिलं, आप्पासाहेबांना त्यांच्या पुस्तीबद्दल, आणि आशिर्वादाबद्दल लिहायला मी अगदीं विसरलों. आतां तें ताजाकलम घालून लिहावं, किंवा त्यांना निराळीच चिठ्ठी लिहावी ? (विचार केल्यासारखें करून) बाबासाहेबाचं पत्र पुरं केलं आहे, तेव्हां आतां त्यांना ताजाकलम घालून लिहिणं बरं नव्हे ! त्यावरून मला त्यांची आठवण प्रथम झाली नाहीं, असेंही दिसणार; तेव्हां तसं नको. त्यांना निराळीच चिठ्ठी लिहावी हेंच बरें ! (रुमाल सोडून चिठ्ठी लिहितो.) [चिठ्ठी संपवून लखोटा बंद करतो.] आतां ठीक झालं. [इतक्यांत बळवंतराव नागनाथ येतो व श्रीमंतास नमस्कार करतो.] या पागेदारसाहेब या, बसा. झाली कां तयारी ?

बळवंतराव—(हात जोडून) बरोबरच्या मंडळीस तयार होण्यास सांगून, मी हा तयार होऊन श्रीमंतांच्या हुकुमाप्रमाणें श्रीमंतांची आज्ञा घेण्याकरितां इकडे आलों. श्रीमंतांची आज्ञा घेतली कीं, तसाच परभारें शिवनेनेरीस रवाना होणार. आतां निघालों ह्मणजे सकाळपर्यंत सहज जाऊन पोंहचेन.

माधव—ही पहा आमच्याकडूनही तयारी आहे. (लखोटा त्याच्या जवळ देतो.) मला जें काय लिहावयाचं होतं, तें मीं सर्व पत्रांत लिहिलंच आहे. फक्त बाबासाहेबांस माझा शिरसाष्टांग नमस्कार सांगून माझा असा निरोप कळवा कीं, " आमची कृपा काय असावयाची आहे, वडिलांचा आह्माला आशिर्वाद असावा ह्मणजे झालं. " आप्पासाहेबांना माझा आशिर्वाद कळवा, आणि त्यांना ही माझी लहानपणची हिऱ्याच्या मुठीची तरवार मी नजर देत आहे ती द्या; आणि त्यांना असंही कळवा कीं, त्यांच्याकरितां हिंदुस्थानांतून एक लहानशा सुंदर सारंग्या बटाची जोडी व नेपाळांतून एक

लहानसा हत्ती मी मागविला आहे, ते आले ह्मणजे पाठवून देईन, असें सांगा. विसरूं नका.

बलवंत—मुळींच विसरणार नाहीं. (उठतो) घेतों आज्ञा !

माधव—हो, भटजीबद्दल मीं तजवीज केली आहे, आणि त्यांनीं तुमच्याबद्दल जें लिहिलं आहे, तें माझ्या पूर्णपणें लक्षांत राहील. वेळ आली ह्मणजे मी तुह्माला विसरणार नाहीं. सध्यां माझी खूण ह्मणून ही तुमच्या जवळ असूं द्या. [त्याला बोटांतली आंगठी काढून देतो.]

बलवंत—[ती मोठ्या आदरानें घेऊन, आनंदयुक्त मुद्रेनें] याही दासावर कृपा असावी, यांशिवाय श्रीमंतांच्या चरणाजवळ कांहींएक मागणं नाहीं. [नमस्कार करून जातां जातां आपल्याशीं,] येतांना जें मला शुभ शकून झाले, त्याचं फल तर तात्काळ मिळालं ! थोडसं धैर्य धरल्याशिवाय, थोडसं साहस केल्याशिवाय आणि थोडा दृढ निश्चय केल्याशिवाय कोणचंही काम होत नाहीं, व कोणचाही मनुष्य पुढें येत नाहीं, हें तिचं ह्मणणं अगदीं बरोबर आहे. या वेळपर्यंत कसं होईल काय होईल, नानांच्या अगर दुसऱ्या कोणाच्या दृष्टोत्पत्तीस हें माझं करण येतं कीं काय ? श्रीमंतांस हें आवडेल कीं नाहीं; या शेंकडो कल्पनांनीं माझ्या मनाचा अगदीं गोंधळ करून सोडला होता. श्रीमंतांकडून उत्तेजन मिळत चालल्यामुळें मला आतां श्रीमंत बाजीरावसाहेब पेशव्याचें काम, हरतऱ्हेनें करण्यास जास्तच हिंमत आली आहे. आणि त्यामुळें माझ्या भावी उदयाची व ऐश्वर्याची प्रचंड आणि सुंदर इमारत आतां माझ्या डोळ्यापुढें मूर्तिमंत उभी असलेली दिसत आहे. जरा सावधगिरीनें काम केलं पाहिजे. या कामाचा आरंभ जसा गोड झाला तसा त्याचा शेवटही गोड होवो ह्मणजे झालं. (जातो.)

माधव—(आनंदानें) अहाहा, खर्ड्याच्या लढाईंत निजामाची चांगली खोड मोडून चाळीस लक्षांचा मुलुख पेशव्यांना मिळाल्यामुळें महाराष्ट्रांतील सर्व आबालवृद्धांना जेवढा आनंद झाला असेल, त्या सर्वांच्या आनंदापेक्षां, शतपटीनें जास्त आनंद, आज मला बाबासाहेबांचें हें पत्र आल्यामुळें होत आहे. निजामानं लिहून दिलेल्या तहनाम्यापेक्षां या पत्राची किंमत फार

फार अधिक आहे. त्या तहनाम्यानं कांहीं माझ्या आनंद समुद्राला भरती आली नाहीं, पण याच्यामुळें तर तो अगदीं उचंबळून सोडला आहे; आणि जितक्या वेळ मी हें पत्र वाचतों, तितक्या वेळ तो जसा उचंबळून सोडतो; तसं त्या तहनाम्यानं कांहीं होत नाहीं. या पत्रानें व या चिमुकल्या हातानें लिहिलेल्या सुंदर पुस्तीनें, माझ्या मनांत आजपर्यंत जें नव्हतें तें आप्तस्वकीयासंबंधाचें प्रेम उत्पन्न करून दिलें. ऊ.प.ळा कोणी आप्तस्वकीय, मग तो कितीही लांब असो, त्याला आपण आजन्मांत कधीं पाहिलं असो अगर नसो, पण त्याच्या संबंधानं आपण कधीं काळीं बरं वाईट ऐकलं, तर त्याच्याबद्दल आनंदाचा अगर दुःखाचा उमाळा तात्काळ फुटणं; याला कारण स्वकीयासंबंधाचं आंधळं प्रेम, याशिवाय दुसरं काय आहे! त्या प्रेमाला ह्मणजे अमुकच कारण पाहिजे असं कांहीं नाहीं. बाबासाहेबांनीं जरी मला कधींहीं पाहिलं नाहीं, तरी त्यांच्या मनांत मजबद्दल किती प्रेम आहे. ते मला किती तरी चाहतात! खरोखरच ते फार प्रेमळ असले पाहिजेत. आपल्याच माणसांना आपल्याबद्दल जितका आनंद आणि दुःख होईल, तितका दुसऱ्याला होत नाहीं. शरीराच्या सर्व अवयवांचा जरी परस्पराशीं कांहीं एक संबंध नाहीं, तरी त्याच्यापैकीं कोणत्याही अवयवांला अगर शरीराच्या कोणत्याही भागाला एवढीशी इजा झाली ह्मणजे जसा जीव तात्काळ कासावीस होतो, त्याला जसा मग डावा उजवा हा भेदाभेद माहित नसतो; त्याचप्रमाणें एकाच वंशांत उत्पन्न झालेल्याच्या आप्तस्वकीयांच्या प्रेमाची गोष्ट आहे. या पत्रानें त्यांची माझी आज प्रत्यक्ष भेट करून दिली असं मला वाटत आहे. मीं त्यांचा पत्रानें समाचार घेतल्यामुळें आज कशी मला सुखाची झोंप येईल! आतां नेहमीं त्यांच्याशीं पत्रव्यवहार ठेवायचा हाच निश्चय! (जातो.)

अंक दुसरा समाप्त.

अंक तिसरा.

प्रवेश पहिला.

स्थळ—शिवनेरी किल्ल्यांतील शिवाई देवीचें देऊळ.

पात्रें—जटा वाढलेला, कपाळीं कुंकवाचा पट्टा फासलेला, पुढें देवीच्या पुजेचें सामान मांडलेलें आहे आणि आसनावर गोमुखींत हात घालून जप करीत असा वैजनाथभट बसला आहे.

वैजनाथभट—(आपल्याशीं) मी घरांतून भिक्षुकीच्या उद्देशानं निघल्यासारखं यंदा मला भिक्षुकी चांगली मिळाली ह्मणायची ! श्रीमंत माधवराव पेशव्याचं, बाजीराव आणि बलवंतराव नागनाथ यांच्या वगीनं दर्शन होऊन, श्रावणमासच्या रमण्यांतही आमची संभावना चांगली झाली, आणि बाजीरावाची व चिमणाजी आप्पाची श्रीमंतासमोर स्तुती केल्यामुळें थोडीशी ओळखही पडली असें ह्मणायला हरकत नाहीं. त्यापेक्षां हें बाजीरावाचं संधान तर फारच नामी हातीं लागलं. ज्योतिष आणि मंत्रतंत्र, त्यांत वशिकरणाचेंही वगैरे प्रयोग येत आहेत, असं सांगितल्यामुळें तो तर अगदीं माझ्या भजनींच लागल्यासारखा झाला आहे. त्याचा माझ्यावर पूर्ण विश्वास बसला आहे; तो मला आतां या जन्मांत कधींच विसरणार नाहीं ही माझी पूर्ण खात्री आहे. तो माझ्या नादीं लागल्यामुळें मला त्याच्यापासून आजपर्यंत प्राप्तीही बरींच झाली. हें प्रयोग सिद्ध करण्याचं अनुष्ठान संपल्यानंतर मेहनतीबद्दल रोजच्या दोन मोहरा, याप्रमाणें वीस दिवसांच्या चाळीस मोहरा मिळण्याला कांहीं एक हरकत नाहीं; त्याशिवाय बोवाची बिदागी होईल ती निराळीच ! इतकं सर्व मला थोडसं ज्योतिष, थोडासा जादूतोणा, थोडासा वेद, थोडीशी वैद्यक्रिया वगैरे सर्व गोष्टी थोडथोड्या येतात ह्मणून ! नाहींतर नुसता वैदिक, नैयायिक, अथवा मोठा वैय्याकरणी झालों असतों तर कांहीं एक उपयोग झाला नसता. हीं घबाडें त्यांनीं कांहीं हातीं आलीं नसती. पाहिजे तर सभेंत बसून समोरच्याशीं पाणिनी, पातंजली यांचीं सूत्रं; न्याय,

तर्क याचे सिद्धांत; संहिता ब्राह्मण, क्रम, जटा वगैरे गोष्टींचा काथ्याकूट खुशाल करीत बसा; त्यापासून तत्वार्थ ह्मणाल तर नुसत्या कंठशोषाखेरीज कांहीं एक नाहीं. कोणी कसलाही पाखांडी आणि वेदांती असला; कोणी स्त्री कितीही धार्मिक असली तरी पुरूष ज्योतिषाच्या, आणि बायको जादुटोणाच्या फासांत सांपडल्याशिवाय राहत नाहींच. कारण प्रत्येकाला आपलं पुढचं चांगलं समजून घेण्याची अत्यंत इच्छा असते. आमचे बाजीरावसाहेब तर दोन्हींच्याही फासांत सांपडलें आहेत! आतां त्यांना मी वाटेल तेव्हां आणि तेथें जरी यायला सांगितलं तरी ते येतील. आज प्रयोगसिद्ध व्हावयाचा आहे. आपण तेथें हजर असलं पाहिजे; ह्मणून मीं त्यांना सांगितलं होतं, तेव्हां ते आतां येथें आल्याशिवाय कधीं राहणार नाहींत. (पाहून) हो, तो कंदील इकडे येतो आहे, त्यावरून त्यांचीच स्वारी येत असावी. धूपदीप जाळून बहुतेक तयारी करून ठेवावी, आणि आपण कांहीं वेळ मौनव्रत धरावं. मध्यरात्र उलटून गेल्यानंतर मीं त्यांना येण्यास सांगितलं होतं. (वैजनाथभट निखाऱ्यावर धूप जाळतो, कापूर लावतो, फुलें वाहतो, पुन्हां गोमुखींत हात घालून मौनव्रत धरून गोमुखी वारंवार वाजवीत, डोळे मिटून जप करीत बसतो, इतक्यांत बाजीराव येतो, व त्याला नमस्कार करून बसतो.)

बाजीराव—(आपल्याशीं) मला भटजींनीं सांगितलेल्या वेळेलाच मी आलों. जर एवढा हा माझा माधवरावाला वशिकरणाचा प्रयोग सिद्ध झाला, आणि माधवराव माझ्या ताब्यांत आला, मी सांगेन तें तो करूं लागला, ह्मणजे मग त्या थेरड्या नाना फडणविसाची खोड मोडण्याला किती अवकाश? त्यानें, त्यानेंच आमच्या दादांना आणि आईला नानातऱ्हेचीं कारस्थानें करून मरेपर्यंत कैदेंत ठेवून छळलें, आणि आम्हां त्यांच्या मुलांना सुद्धां तो आज वीस वर्षें सारखा दुष्ट ग्रहाप्रमाणें अजून छळतो आहे, आणखी पुढें किती वर्षें छळणार कोण जाणे! सर्व ग्रहांत महा तामसी, देवादिकांनासुद्धां त्राहि त्राहि करून सोडणारा आणि सर्व जगाला पीडा देणारा शनी ग्रह कोणालाही साडे सात वर्षांवर पीडा देत नाहीं, पण हा, रघुनाथराव दादासाहेबांच्या वंशाची पाठ नाना फडणविस, महाग्रह जन्मोजन्म सोडीत नाहीं!!

शत्रुला दंड करायला अंगांत सामर्थ्य नसलं, साम दामाच्या गोष्टींचा उपयोग होईनासा झाला ह्मणजे मग भेद केल्याशिवाय गत्यंतर नसतं. आज वीस दिवस झाले, वैजनाथभटजीसारख्या कडकडीत ब्राह्मणानें केलेलें अनुष्ठान कधींच निष्फळ व्हावयाचं नाहीं, अशी माझी मनदेवता मला सांगते. भटजी मला एक निधानच सांपडलं आहे यांत बिलकूल शंका नाहीं. (त्याच्याकडे पाहून) त्यांनीं आतां डोळे उघडले आणि गोमुखी खालीं ठेविली, त्यावरून त्यांचा जप पुरा झाला असें वाटतें. आतां ते माझ्याशीं बोलतील. (वैजनाथभट तसें करतो; बाजीराव त्यास पुन्हां उठून नमस्कार करतो.)

वैजनाथ—[हातानें बसण्यास सांगून, पुन्हां धूप कापूर वगैरे जाळून फुलें वगैरे वाहतो, व ताईत मंतरतो] स्वारी आतांच आली वाटतं.

बाजीराव—हो, झाली सुमारें अर्धघटका मला येऊन ?

वैजनाथ—आजचा अनुष्ठानाचा शेवटचा दिवस आहे, समाप्तीही व्हावयाची आहे, त्यावेळीं यजमानांनीं सांनिध्य असलं पाहिजे ह्मणून श्रीमंतांना इतक्या रात्रीं येण्याचे श्रम देणं भाग पडलं.

बाजीराव—त्यांत श्रम कसले ! कांहीं नाहीं. सर्व सिद्ध झालंना ?

वैजनाथ—त्याची तर मुळींच शंका नको ! आमच्या गुरूची कृपाच तशी आहे. हातीं घेतलेल्या कामांत अपयश ह्मणून कधीं यायचें नाहीं.

बाजीराव—आपण जसे योग्य, तसें आपले गुरुही योग्यच असले पाहिजेत; त्या मोठ्याच विभूती ! यांत काय संशय !

वैजनाथ—(ताईत आणि फुलें बाजीरावाच्या हातीं देतो.) हा ताईत श्रीमंतांच्या जवळ असला किंवा त्यांनीं याला हात लावला ह्मणजे आपलं काम झालं ह्मणून समजावं. एवढं काम झाल्यानंतर त्याचा प्रत्ययही आपल्याला हळू हळू यायला लागेल.

बाजीराव—प्रत्यय आला ह्मणजे झालं ! त्यानें नेहमीं माझं ह्मणणं ऐकावं, मी नेहमीं जवळ असावं असं त्याला वाटावं, रात्रंदिवस त्याला माझा निदिध्यास लागावा, याशिवाय मला दुसरं कांहीं एक नको.

वैजनाथ—श्रीमंतांची जशी इच्छा आहे त्याचप्रमाणें सर्व होईल. नेहमीं

बाजीरावसाहेब डोळ्यापुढें असावेत, असंच श्रीमंत पंतप्रधानास वाटेल. पण तें सर्व हळू हळू होईल. एकदम होणार नाहीं. कारण एकदम कशीही बदल होणं इष्ट नाहीं. ती लोकांच्या तेव्हांच नजरेस येईल. हळुं हळुं वाढणाऱ्या रोगानं एकदां सर्व शरीर व्यापून टाकलं ह्मणजे मग तो जसा असाध्य होतो, आणि त्याच्यापुढें मग जशी कोणाची मात्रा चालत नाहीं, तसं हें होणार. आणि तेवढ्याच करितां हें असं केलं आहे. हें श्रीमंतांच्या आलंना ध्यानांत?

बाजीराव—हो, आलं !

वैजनाथ—जोंपर्यंत हे ताईत त्यांच्याकडे गेले नाहींत, तोंपर्यंत श्रीमंतांनीं हें आपल्याजवळ ठेवावेत. दुसऱ्यावर कधींही विसंबू नयेत. हें अगदीं जिवाच्या विश्वासूक मनुष्याच्या हातून पोंहचतील असें करावे. हें जर भलत्याच्या हातीं लागले, तर मात्र काय परिणाम होईल तें मला सांगता येत नाहीं.

बाजी०—नाहीं, अशा भलत्या सलत्या मनुष्याच्या हातीं मी ही अशी अमोल्य वस्तु कधींच देणार नाहीं, याविषयीं आपण खात्री ठेवा.

वैज०—श्रीमंतांसारख्या सुज्ञांस जास्त सांगणें नको. बरें आहे आतां श्रीमंतांनीं यावं ! रात्रही फार झाली. कोणी भलत्या मनुष्यानं आपल्याला येथं एकटं पाहिलं ह्मणजे आणखी पंचाईत !

बाजी०—(त्याच्यापुढें मोहरा ठेवून नमस्कार करतो.) आजच्या महा पूजेची ही दक्षिणा. बिदागी वाड्यांत आल्यानंतर होईल. उद्यां तिकडेच या.

वैज०—ठीक आहे.

बाजी०—(आपल्याशीं) आतां हे रावाच्या हातीं माधवरावाकडे पाठविले ह्मणजे मी कृत्यकृत्य झालों. (जातो.)

वैज०—(आपल्याशीं) आतां मला देखील कांहीं तरी निमित्य काढून लवकर येथून निसटलं पाहिजे. नाहीं तर सर्वच ढोंग बाहेर यायचं ! झांकली मूठ आहे तोंपर्यंतच सर्व ठीक आहे. यंदाची भिक्षुकी पाहून आमच्या तिला असा आनंद होईल ह्मणतां, कीं बोलायची सोय नाहीं. गरिब स्थितींतील मनुष्याला प्रपंच्याकरितां अशा सतरा हजार उलाढाली कराव्या लागतात !

(जातो.)

प्रवेश दुसरा.

स्थळ—बलवंतराव नागनाथाचा दिवाणखाना.

पात्रें—बलवंतराव आणि त्यांची स्त्री सत्यभामा.

सत्यभामा—पहा, मी सांगितल्याप्रमाणें करायचं झालं ह्मणून किती काम झालं. श्रीमंत पंतप्रधान माधवरावसाहेबांची आणि आपली आतां पूर्वीपेक्षां किती जास्त ओळख झाली. बाजीराव साहेबांबरोबर आपल्यामार्फतीनं, त्यांचा जो पत्रव्यवहार आज दीड दोन महिने सुरू आहे, त्या प्रत्येक पत्रांत त्यांनीं आपल्याला किती गौरवून लिहीलं आहे. आपल्याला मी विसरणार नाहीं ह्मणून कितीकदां वचनं दिलीं आहेत. हीं सर्व यावेळीं दिलेलीं वचनं फुकट जातील असं आपल्याला वाटतं कां ? या ओळखीचा पुढें पाठीमागें श्रीमंत माधवराव पेशवे स्वतां सर्व कारभार पाहूं लागले ह्मणजे कांहींच उपयोग होणार नाहीं अशी आपली अजून समजूत आहेना ! शर्थ झाली बाई संशयी स्वभावाची हो !

बलवंत—आतां ह्मणजे श्रीमंत मला विसरतील असं मला स्वप्नांत सुद्धां वाटत नाहीं; पण कधीं राहून राहून असं वाटतं कीं, श्रीमंतांमध्यें आणि बाजीरावसाहेबामध्यें सध्यां जो पत्रव्यवहार माझ्या मार्फतीनें चालत आहे, हा जर **नानांना** कळला आणि भलता प्रसंग आला तर मग कसं !

सत्यभामा—तर मग कसं काय ? हा असला आपला भितरा आणि संशयी स्वभावच आपल्याला बाधक होईल, एऱ्हवी कांहीं देखील व्हावयाचं नाहीं हें मी पक्कं सांगतें. संशयच मेला जिथं तिथं बाधतो. संशयभुतानं ज्याला एकदां पछाडलं, त्याच्या हातून कसलंही साहसाचं काम होत नाहीं. तो केव्हांतरी आपल्या संशयानंच फसायचा. तेव्हां हा असला मेला घातक संशय द्यावा गडे टाकून ! नांव पलिकडच्या कांठाला पोंहचेल कीं मध्येंच बुडेल, अशा रितीनं नांव हांकणारा नावाडी अफाट दर्यांत नांव हांकण्यास अगदीं उपयोगीं नाहीं. प्रपंचांत बरें आणि वाईट असें प्रसंग पुष्कळ येतात. त्याला भिऊन स्वस्थ एकाजागीं माशा मारीत बसणं हें बरं कां ? अशा यो-

णानं कांहीं एक पुरषार्थ व्हावयाचा नाहीं. एकदां ही नांव समुद्रांत लोटली खरी, काय होईल तें होईल. एक हीं तड किंवा ती तड.

बलवंत—मला भिती वाटतें ह्मणून मी असें ह्मणतों असें मुळींच नाहीं. आजपर्यंतचं काम निराळं, आणि आतां जें बाजीरावानं काम सांगितलं आहे तें निराळं आहे ह्मणून ह्मणतो. दुसरं कांहीं नाहीं.

सत्यभामा—कोणचं बरं तें ?

बलवंत—कोणचं ह्मणजे, तुला काल सांगितलं तें ! अगं त्यांनीं एक जिन्नस श्रीमंतांस देण्याकरितां दिली आहे !

सत्यभामा—अंः ! त्यांत काय अवघड आहे. आजपर्यंत आपण जसं पत्र देत होता, तशी आतां या खेपेला जिन्नस द्यायची. पत्र देण्याइतकंच तें सोपं आहे. आणि त्याबद्दल कां आपल्याला इतकं अवघड वाटतं, इतका संशय येतो. धन्य झालीहो बाई आपल्या स्वभावापुढें. कांहीं करा, ज्याचा जो मूळचा स्वभाव आहे तो कधींही बदलला जात नाहीं. आणि कदाचित् कांहीं कारणानं बदलला तरी तो आपलं मूळ कधीं सोडीत नाहीं; केव्हां तरी पहिल्या ठिकाणावर यायचाच, हें जें ह्मणतात तें कांहीं खोटं नाहीं. हें पहा, त्याबद्दल आपल्याला कांहीं एवढं अवघड वाटायला नको आणि एवढा संशयही यायला नको.

बलवंत—कदाचित् कोणाला कळलं, कोणी पाहिलं तर; आणि भलताच प्रसंग आला तर, रावाचा रंक व्हावयाला कांहीं वेळ लागायचा नाहीं; ह्मणून ह्मणतो.

सत्यभामा—ही जशी आपल्या मनांत कल्पना आली, तशी रंकाचा राव होण्याची कां बरं आपल्या मनांत कल्पना आली नाहीं. यामुळें बाजीरावाचे आणि श्रीमंत पंतप्रधानाचे आपण जिव्हाळ्याचे मित्र आणि सल्लागार बनून, हलके हलके **नानाच्या** बरोबरीला नाहीं कां कधीं जाऊन बसणार ? आणि असं झालं ह्मणजे रावाचा रंक आणि रंकाचा राव होण्याला मुळींच वेळ लागणार नाहीं; त्या गोष्टी ह्मणजे आतांच होतील असें कांहीं नाहीं. कसाही प्रसंग आला तरी त्या प्रसंगीं कसं वागावं हें मला चांगलं माहित आहे.

बलवंत—भलताच प्रसंग आला तर तूं बायको माणूस काय करशील? घरांत बसून नुसतं दुःख करशील हेंच कीं नाहीं.

सत्यभामा—बायको माणूस काय वाटेल तें करील.

बलवंत—नाहीं पण काय करशील तें एकदां ऐकूं दे तर खरं!

सत्यभामा—ऐकायचं काय; आणि सांगायचं काय? प्रसंगीं परमेश्वर बुद्धी देईल तसं करीन. समजा—सर्व दारं बंद केली, बाहेर पळून जीव बचावण्याला सवड नाहीं, आणि हातांत कांठी घेऊन आपला जीव घेण्याला काळाप्रमाणें मनुष्य तर तयार झाला आहे; अशा वेळेला लहान आणि गरीब मांजर सुद्धां आपल्या शत्रूच्या अंगावर, आपला जीव बचावण्याकरतां जाण्याला व त्याचं नरडे आपल्या दांतांनीं काडकन् फोडण्याला आणि आपल्या रेशमासारख्या मऊ पंज्यांतून तीक्ष्ण नखं काढून त्याचं तोंड ओरबाडण्याला मुळीं सुद्धां मग भीत नाहीं; त्यांतलाच प्रकार, प्राणावरच आलं मग भीति कसली!! जी स्त्री आपल्या पतीबरोबर ऐश्वर्याचं आणि मोठेपणाचं सुख भोगण्याला तयार असते, तिनं त्याच्याबरोबर दारिद्र्याचं दुःखही भोगायाला तयार झालंच पाहिजे. जी एकाच गोष्टीला तयार असते ती खरी स्त्रीच नव्हे; आणि तिचं आपल्या पतीवर खरं प्रेमही नव्हे. आपल्याकरितां मी आपल्या जिवाकडे, फार तर काय पण माझ्या ह्या तान्हुल्याकडे सुद्धां पाहणार नाहीं, यापेक्षां मी आणखी जास्त काय सांगूं!

बलवंत—(आश्चर्यानें) हं; इतकी आपली तयारी आहे कां?

सत्यभामा—आईबापांनीं ज्यांच्या पदरीं एकदां जन्माची गांठ बांधून दिली, त्यांच्याकरितां सर्व कांहीं करायला आम्हाला नेहमीं तयार असलंच पाहिजे. त्यांचं भलं तें आपलं भलं, त्यांचं वाईट तें आपलं वाईट, त्यांचा जीव तोच आपला जीव, मग त्या जिवाची जी वाट, तीच या जिवाची वाट लागायला नको कां?

बलवंत—तुझा निश्चयी स्वभाव मला पूर्वीपासून माहीत आहे. तुझ्या मनांत जें एकदां येईल तें केल्याशिवाय तूं कधीं राहवयाची नाहींस. बरं

आहे. बाजीरावसाहेबांची, श्रीमंत पंतप्रधानाकडे ही कामगरी घेऊन आह्मी यंदा गणपती उत्सवाकरितां पुण्यास जाणार.

सत्यभामा—आणि परत केव्हां यायचं ?

बलवंतराव—परत दसरा झाल्यावर !

सत्यभामा—इतके दिवस तेथें राहयचं ?

बलवंत—फार करून लवकरच येऊं. काम झालं कीं तेथें राहयचं कशाला ? आपल्या सहवासाचं अमोल्य सुख सोडून तेथें उगीच राहण्याची हौस कोणाला आहे. सारख्या स्वभावाचा, सारख्या विचाराचा, सारख्या मनाचा असा हा जन्माचा प्रेमळ मित्र मिळाल्यावर, त्याचा समागम कोणाला नकोसा होईल. अनेक चांगल्या वाईट कल्पनांनीं बहकून गेलेलं मन आणि तापलेलं डोकं, दोन गोड गोष्टी सांगून युक्तीनं ताळ्यावर आणून आणि या मृदु हातानें आपल्या मांडीवर घेऊन तें मग कोण बरं थोपटील. खरं सुख, खरी विश्रांति जगांत जर कोणाला मिळेल, तर त्याला त्याच्याच सारखं जेव्हां हें जन्माचं विश्रांतिस्थान मिळेल, तेव्हांच मिळेल. एऱ्हवीं सर्व बाहेरची सुखं; एकाचं तोंड पूर्वेस आणि दुसऱ्याचं पश्चिमेस, असल्यानें व्यर्थच होत. आपल्याला तर या ठिकाणाशिवाय आणि या हातावर असं डोकं टेंकल्याशिवाय निवांत झोंप कधींच येत नाहीं; आणि ह्मणूनच आपण आतां येथें असेंच निजणार !

सत्यभामा—ही युक्ती मला कळली बरं ! (दोघे जातात.)

प्रवेश तिसरा.

स्थळ—नाना फडणवीसांचा वाडा.

पात्रें—नाना आणि कोंडाजी येतात.

नाना—(आपल्याशीं) जी गोष्ट मोरोपंत आणि दाजीबा यांजकडूनच कळायला पाहिजे होती, ती मला या कोंडाजीकडून कळत आहे. ते दोघे श्रीमंतांच्या जवळ असून त्यांच्या जेव्हां ती लक्षांत आली नाहीं, तेव्हां

ह्याच्या सांगण्यांत खरेपणा आहे किंवा हा आपला कांहीं तरी सांगत आहे असें ह्मणावें ? त्यांची दृष्टी मंद, त्यांचं लक्ष कमी आणि याची दृष्टी तीक्ष्ण, आणि याचं लक्ष विशेष, असं याच्या सांगण्यावरून समजायाचं किंवा काय? हें एक मोठं गूढ आहे. हा कामाठी, याच्या बोलण्यावर विश्वास काय ठेवायचा आहे; एवढ्यावरून यानं सांगितलेल्या गोष्टीकडे काना डोळा करणं बरोबर होणार नाहीं. दैववशात् याचीच गोष्ट मागून प्रत्ययास आली ह्मणजे, मग त्यासारखी फजिती कोणचीच नाहीं. एखादे वेळीं हलक्या मनुष्याच्या नजरेस जी गोष्ट पडते, ती मोठ्याच्या पडणं कधींच शक्य नसतं. कारण ती करणारे लोक 'हा वेडगळ व मूर्ख आहे, याला हें काय कळणार आहे' अशा नुसत्या समजुतीवर फार करून, या अशा हलक्या मनुष्याकडे दुर्लक्ष करतात आणि शेवटीं आपली समजूत चुकीची झाली असं त्याचं त्यांनाच मग वाटूं लागतं, तसं होऊं देणं योग्य नाहीं. हा लेकाचा तेथील कामाठी भलतंच सांगेल कशाला ? त्याला त्यापासून फायदा काय ? कांहीं नाहीं. त्यानं जेव्हां ही गोष्ट मला दोन तीन वेळ संधि साधून, युक्तीनं माझ्या जवळच सांगण्याचं धैर्य केलं; तेव्हां त्यांत कांहीं तरी अर्थ असावा. जर कदाचित् त्यांत कांहीं तथ्यांश निघाला नाहीं तर दिलं सोडून; तेव्हां त्याचं ऐकून पहावं हें बरं ! कोंडाजी,—

कोंडाजी—(हात जोडून) जी धनीसाहेब—

नाना—तूं आजपर्यंत जसं सरकारच्या कामावर लक्ष ठेवलंस तसंच नेहमीं ठेवीत जा. ते पागेदार आणखी काय करतात, काय काय बोलतात, याची बातमी ठेवून मला येऊन कळवीत जा !

कोंडाजी—त्यें मी अक्षीं डोळ्यांत तेल घालून रात दिन कावळ्यासारखा बघत राहीन, पण सरकार मला माझ्या कामाठ्याच्या कामामुळं फुरसत मिळंल तवा. मी जवा तथं काम करत असतो, तवा तथं जें माझ्या ध्यानांत येतं त्येवढं मी धनीसाहेबाजवळ येऊनशानी सांगंन. काम जर दुसरीकडं असलं तर सरकार म्यां काय करावं. त्ये मला सोडता येत नाहीं; आन् त्यांतून फुरसातबी मिळत नाहीं.

नाना—हंः, बरं तुझी बदली सध्यां तेथल्या हलकाऱ्यांत केली आहे. तूं तेथें आजपासून काम देत जा. जमादाराला तुझ्याबद्दल वर्दी दिली जाईल.

कोंडाजी—(मुजरा करून) धनीसाहेब अक्सी कामांत असनार तवा खबरबी कशी ध्यावी ?

नाना—तूं नुसती आल्याची वर्दी देऊन येत जा. जा, आपल्या कामाला, आणि नीट सरकारची नोकरी चांगली इमानेंइतबारें करीत जा, नाहीं-तर खोड्यांत पडशील. जा.

कोंडाजी—(पुनः मुजरा करून) जी; धनीसाहेब अगदीं हुकुमापरमानं करीन. [जातां जातां आपल्याशीं] कोंड्या कामाठ्याचा आतां कोंडाजी हलकारा आज झालों कीं नाय. एंवरे बहादर ! (मिशी पिळतो) आतां थोड्या दिसांत शिरमंताचा हुजऱ्या होईन, आन मग हुजऱ्याचा नाईक होईन नाईक. मग तर ती फुटाणी मैना माझ्या पाया पडत झकत् येईल कीं नाहीं? आतां या केरसुनीला आान् त्या पोत्यराला घेऊन करायचं काय? नग इचिभन ही ! लई दिसांनीं हातांतली सुटली. आतां तिला माझ्या हाताची घान येईल. (वास घेतो) कशाला नांव घेतां. आतां नदीवर जाऊन म्हसरं धुतल्यावानीं चक्क अंग धुतो, ह्ये मुंडासं, हो चोळणा, ही बंडी घेतो एकाद्या भिकाऱ्याच्या पोराला; आन् झकपाक पोशाक करतो कीं समदं जन ह्मणतील एवं रे कोंडाजीराव. (आनंदानें मिशा पिळीत जातो.)

नाना—(आपल्याशीं) मोरोपंत, दाजीबा व बळवंतराव नागनाथ यांच्या हातून गैरशिस्त गोष्ट होईल, अथवा कोणतीही गोष्ट ते माझ्यापासून चोरून ठेवतील असें नाहीं. माझा त्यांच्यावर पूर्ण विश्वास आहे. पण जोंपर्यंत लावलेल्या रोपाचा मोठा चांगला जोमदार वृक्ष बनला नाहीं, तोंपर्यंत त्याचं, लागणाऱ्या किडीपासून रोज पाहून, त्याच्यावर लक्ष ठेवून रक्षण केलं पाहिजे. उत्तम मौल्यवान जरतारी वस्त्राला एकदा कसर लागली ह्मणजे ती जसं मग त्याचं जाळं करून ती अगदीं मातीमोल करून टाकते, त्याप्रमाणें अपक्व अशा राजपुत्रांच्या किंवा आपल्या पुत्राच्या सुंदर मनोरूपी वसनाला दुर्व्यसनाची एकदां कीड लागली कीं, झालीच त्याची माती ! तेवढ्याकरतां

रात्रंदिवस त्यांना जपणं हें त्यांच्या, आपल्या आणि सर्व देशाच्या कल्याणाकरितां करण्याचं माझं आणि सर्वांचं कर्तव्यकर्मच आहे, आणि तें मला केलंच पाहिजे. (जातो.)

प्रवेश चवथा.

स्थळ—शनवारचा वाडा.

पात्रें—यशोदाबाई आणखी कांहीं मुली मिळून मंगलागौरीची पूजा वगैरे करीत आहेत.

यशोदाबाई—(मंगलागौरीला फुलें वाहून) तुह्मी वाहिलीं कां फुलं? तुह्मी वाहिलीं. तुह्मी दुर्वा वाहिल्या. तुह्माला पत्रचा मिळाल्या? ही ठेवा गौरीपुढें दक्षणा! (सर्वांना देते.)

मुली—अहो आह्माला सर्व मिळालं?

यशोदाबाई—आतां काय, धूपदीप लावून नैवेद्य दाखवून मग आरती करायची ना?

सर्वमुली—हो.

यशोदाबाई—आरती सर्वजणींनीं मोठ्यानं चांगली गळ्यावर ह्मटली पाहिजे. तोंडातल्या तोंडांत किंवा हळूं अथवा चुकवाचुकवी करून नाहीं उपयोगी! (एका मुलीकडे पाहून) आपण दुपारी गुळमुळीतच ह्मटली होती. मी जवळ असून मला देखील पुरती ऐकूं आली नाहीं, तर बाकीच्याना कशी येईल. पण आतां या वेळेला मात्र तसं कांहीं चालायचं नाहीं बरं कां! पुन्हां मग एकटीला ह्मणावी लागेल आमचं कांहीं जात नाहीं. आमच्या कानीं सात खडे.

एक—बरं मोठ्यानीं ह्मणूं! (दुसरीकडे पाहून) आपल्याला देखील निराळं सांगायला नको.

(सर्वजणी उभ्यानें मोठ्यानें गळ्यावर आरती ह्मणतात.)

यशोदा—ही तर नेहमींच आहे. तुह्माला येते ना दुसरी ह्मणा पाहूं.

एक मुलगी—[दुसरी आरती ह्मणते.]

(आरती करून मंगळागौरीला पुष्पांजळी वाहतात आणि आरतीचें तबक खालीं ठेवतात.)

यशोदा—आतां किनई फराळाची तयारी होईपर्यंत आपण सर्वजणी झोंपाळ्यावर बसून देवाचीं गाणीं ह्मणूं.

स. मुली—ठीक आहे.

यशोदा—फराळ झाल्यावर मग फुगड्या, झिंमा, सोंगट्या, छपापाणी, आंधळी कोशिंबीर, शिवाशिवी खेळूं. मैने, अगं मैने—

मैना—जी, जी बाईसाहेब.

यशोदा—फराळांचीं पानें मांडिलीं कीं, मग आह्मांला कळवायला ये. तोंपर्यंत आह्मीं झोंपाळ्यांवर बसून गाणीं ह्मणतों.

मैना—जी होय बाईसाहेब. [जाते.]

[सर्वजणी झोंपाळ्यावर बसून गाणीं, ह्मणतात.]

[इतक्यांत श्रीमंत माधवरावसाहेब व बाबूराव फडके असे हातांत हात घालून हलके हलके येतात.]

माधवराव—(कान देऊन ऐकून) बाबूराव, वरून कांहीं चांगलं ऐकूं येत नव्हतं. आतां येथून चांगलं स्पष्ट ऐकूं येईल नाहीं रे !

बाबूराव—होय सरकार ! [दोघे कान देऊन ऐकतात.]

माधव—[आनंदानें] गड्या, यांचे गळे कितीरे चांगले आहेत. यांचीं हीं कानाला गोड लागणारीं गाणीं नुसतीं ऐकतच रहावं असं वाटतं. बाबूराव, यांत तुमच्या राणीसाहेबरे कोणच्या !

बाबूराव—(हांसतो) सरकार—

माधव—अरे त्यांत लाजायचं काय ! आपलं माणूस दाखवायला कां कोणी लाजतं ! ज्यानें नुकतंच लक्ष सवालक्ष सैन्याचं आधिपत्य केलं, त्या तुझ्यासारख्या वीरांनीं अशा कामाला लाजायचं आणि भ्यायचं ! सांग सांग तर खरं ! नांव घेऊन सांगितलंस तर बरंच होईल.

बाबूराव—मातोश्रीजवळ जी बसली आहे.—

माधव—असं काय ! या सर्व मुलींमध्यें ती एकटीच आहे. आमच्या

घरचं दुसरं कोणीच नाहीं. बाबासाहेबाचीं, आप्पासाहेबाचीं आणि अमृतरावसाहेबाचीं अशी आमचीं सर्वांचीं व सर्व आश्रितांचीं, कुटुंबें एका ठिकाणीं होऊन मग हे असे समारंभ आह्मीं डोळ्यानें पहावें असें मला वाटतं. बाबूराव असं माझ्या मनाप्रमाणें होईल कां रे? सध्यां तर बाबासाहेब एकीकडे आणि मी एकीकडे !!

बाबूराव—श्रीमंतांच्या मर्जीप्रमाणें सर्व कांहीं होईल. यंदा नाहीं पुढल्या वर्षी.

एक मु.—[घाबऱ्या घाबऱ्या] बाईसाहेब, बाईसाहेब, ती पहा सरकारस्वारी सज्यांत गाणीं ऐकत उभी आहे.

यशोदा—अगं खरंच ! [सर्वजणी उठतात.]

माधव—बाबूराव, बाबूराव, त्यांनीं आपल्याला पाहिलं वाटतं. त्या पहा गडबडीनं उठल्या. आपण त्यांच्या रंगाचा फुकट विवाद केला. चल आपण आंत जाऊं. [जातात.]

मैना—बाईसाहेब, फराळाचीं पानें मांडून तयार आहेत.

यशोदा—बरंच झालं. चला सर्वजणी फराळाला. [सर्व जातात.]

प्रवेश ५ वा.

स्थळ—आरसे महाल.

पात्रें—श्रीमंत माधवराव पेशवे आणि बलवंतराव नागनाथ बोलत बसले आहेत, बाहेरच्या बाजूला कोंडाजी हळूंच ऐकत उभा आहे.

कोंडाजी—[आपल्याशीं हळूंच आडून] आतां हा पागेदार बामन आला आहे, हा शिरमंत सरकाराजवल लई वढूल खलबात करीत बसल. इचिभन् सरकार याच्याजवल कसलं रोज रोज खलबत करत्यात कोणास ठावं ! कां एखाद्या गनिमावर सवारी करण्याचा बेयत करत्यात, कीं कुनाचा किल्लं कोट घेण्याचा बेयत करतात, कां ह्यो बामन दुसऱ्या कुनाची सरकार जवळ चुगली खाऊन त्याचा गांव, इनाम, दौलत जप्त करून ती आपन मटकावनार, काय आहे तरी काय ह्यें कारस्थान. कांहीं बी उमगत नाहीं. आन आक्सी सर-

कारबी याच्यासंगं लई वढाळ गुलगुल गोष्टी करत्यात, तवा असा हा कोना लेका तालेवाराचा ल्योक कां नातु. आपनासनी त्ये कायबी कलत नाहीं, आपुन बिगीबिगी जाऊनशानी नानासाहेबासनी ही वर्दी द्यावी, आन् त्याना घेऊन येऊन हे समदं लपून दावावं ह्मणजे आपुन आपली कामगिरीबी बजावलीसारखी होईल, त्यांना इस्वासबी येईल, आन् आपल्या डोळ्यांनं पाहून त्येंची चांगली खात्री बी होईल. ह्मनजे कोंडाजीचं इनाम पटलं. [जातो.]

माधव—(उत्सुकतेनें) राव, तुमच्याकडचा मनुष्य, तुमच्याकडचें पत्र, निदान लहानशी चिठ्ठी, आली ह्मणजे मला मोठा आनंद होतो; त्यांतून तुह्मी प्रत्यक्ष आलांत, तुमची एकदां भेट झाली, तिकडील सर्व कुशल वर्तमान कळलं, ह्मणजे मग जो मला आनंद होतो तो तर शब्दानं मला कोणालाच सांगतां येणार नाहीं. तुह्मी माझी आणि बाबासाहेबांची ज्या दिवशीं प्रथम पत्रानें भेट करून दिलीत, त्या दिवसापासून माझ्या सुखाला आरंभ झाला. माझ्या सगळ्या जन्मांतला तो एक मोठा सुदीन होता असं मी समजतों; आणि त्याची व तुमची आठवण मी या जन्मांत कधींच विसरणार नाहीं.

बलवंत—या गरीब दासाची श्रीमंतांना सदोदित आठवण रहावी, याशिवाय श्रीमंतांच्या चरणाजवळ माझं कांहींएक मागणं नाहीं; मी त्यांतच आपणा स्वतांला कृतार्थ मानतों. श्रीमंताच्या सेवेला आज माझ्यासारखे लक्षावधी सेवक तयार आहेत, असें असून माझी जर श्रीमंतास आठवण राहिली, तर मग मीं आपणास खरा भाग्यवान कां समजूं नये? खरोखर मग माझ्या भाग्यास पारावारच नाहीं.

माधव—मोठ्या लोकांना, त्यांतून राजे लोकांना हलक्या लोकांची आणि त्यांना दिलेल्या वचनाची वेळ गेली ह्मणजे आठवण राहत नाहीं, अथवा ते ठेवीत नाहींत; हें जरी बहुतेक अंशीं खरें आहे; तरी तुमच्याबद्दलची आठवण मी विसरेन असें मला मुळींच वाटत नाहीं. कारण ज्या प्रेमाचा माझ्या मनांत उद्भव होण्याचा मुळींच संभव नव्हता; तो आनंद, तें सुख आणि तें प्रेम माझ्या मनांत उत्पन्न होण्याला सर्वांशीं कारण तुह्मी आहांत. जोंपर्यंत तें प्रेम आणि आनंद कायम आहे, तोंपर्यंत रावांची आठवणही कायमच

आहे; आणि तें प्रेम जर या जन्मांत नष्ट होणार नाहीं आणि कदाचित् झालं तर तें या देहाबरोबरच नष्ट होणार; तर बलवंतरावांची आठवणही नष्ट होणार नाहीं, आणि झाली तर ती तेव्हांच नष्ट व्हावयाची. गंगा, यमुना, कृष्णा, गोदावरी, सिंधु, नर्मदा वगैरे पापविनाशी आणि पुण्यकारक पवित्र नद्यांचे प्रचंड प्रवाह आणि ज्या प्रदेशांतून त्या वाहतात ते प्रदेश जसे वंदनीय, तसेच त्यांचे उगम आणि त्यांचीं उगमस्थानं, हीं जरी तीं लहान आहेत, तरी तीं तितकीच वंदनीय होत. (थोडे थांबून) बरं आमचे बाबासाहेब, त्यांचं कुटुंब, आप्पासाहेब, अमृतरावसाहेब वगैरे मंडळी कुशल आहेतना? बाबासाहेबांची काय आज्ञा आहे. कांहीं पत्र, निरोप वगैरे कांहीं आहे कां?

बलवंत—(इकडे तिकडे पाहून) नुसतं पत्र निरोपच नाहीं, तर आगखीही बाबासाहेबांनीं श्रीमंतास देण्याकरितां एक वस्तु दिली आहे.

माधव—(अति उत्सुकतेनें) काढा, द्या, लवकर द्या, जें कांहीं द्यायचं असेल तें झटपट काढा.

(बलवंतराव हलकेंच खिशांतून ताईत व पत्र काढतो. इतक्यांत नानासाहेब व कोंडाजी येऊन चोरून पहातात.)

बलवंत—हें—

माधव—(हात पुढें करून) द्या. बाबासाहेबाकडची एवढीशी चिठ्ठी, अगदीं लहानशी जिन्नस—मग ती कितीही हलक्या किंमतीची असो, ती मला मोठमोठ्या मौल्यवान जिन्नसापेक्षांही मोल्यवान आहे; आणि ती मोठ्या आदरानं घेणार व मोठ्या प्रेमानं आपल्या जिवापलिकडे जतन करून ठेवणार.

कोंडाजी—(हळूच नानाकडे पाहून) सरकार बघा आतां. मी खोटं ह्मणतोय की काय त्यो!

नाना—(आश्चर्ययुक्त होऊन आपल्याशीं) काय राज्यबुडव्या दादासाहेबांचा आणि राक्षसीण आनंदीबाईचा पुत्र बाजीराव, याचा आणि श्रीमंताचा पत्रव्यवहार सुरू असून परस्परांकडे भेटीच्या जिन्नसाही जातात आणि येतात, अं:! आणि त्या या हरामखोराच्या मार्फत! अरे दरोडखोरा! बल-

वंतरावा, तूं माझा मोठा विश्वासूक ह्मणून तुझ्यावर मीं इतका विश्वास ठेवला, त्याचें हरामखोरा हें चीज! आग, आग, अंगाची अगदीं नखशिखांत आग होऊन गेली आहे. ज्याला घर राखण्याकरितां रखवालदार ह्मणून ठेवला, तोच जर बेइमान होऊन तेथेंच दरोडा घालूं लागला, तर तेथें मालक मोठा शहाणा असून करतो काय? कोंडून ठेवलेला साप, कसं आणि कोठं बीळ पाडील याचा नेम नाहीं; हें आतां माझ्या प्रत्ययाला आलं. बरं ह्मणावं, हा नाना फडणवीस तुह्माला गारुडी मोठा वस्ताद मिळाला आहे. तुमचे दांत पाडून तुह्माला पेटाऱ्यांतच घालून ठेवील; तुमच्या कसल्याही गमजा कधींही चालूं देणार नाहीं, हें पक्कं लक्षांत ठेवा. सर्व पेशवाईचा मी कारभार करतों, सर्व दुनियेतल्या खबरा रोज मला कळतात, असं असून हें घरांतलं कारस्थान मला कळत नाहीं, तर मग मी कारभार करतों कसला? साडेतीन शहाण्यांपैकीं लोक मला अर्धा शहाणा ह्मणतात, पण मी ह्मणतो कीं मी पुरा मूर्ख; ज्यांना आपल्या जवळ, अगदीं पायाखालीं आणि आपल्या घरीं काय चाललं आहे तेंही पुरतं समजत नाहीं, आणि जगाच्या उलाढाली व कारभार मात्र जे रात्रंदिवस करीत बसतात, तेही मजप्रमाणें सगळे मूर्खच समजले पाहिजेत. पाहूं आणखी काय काय प्रकार होतात ते!

माधव—बरं तो काय जिन्नस आहे, तें मग पाहूं! प्रथम बाबासाहेब या पत्रांत काय लिहितात तें पाहिलें पाहिजे. [पत्र फोडून वाचतो, आनंदानें हांसून] बाबासाहेबांच्या नेहमींच्या पत्राप्रमाणें हेंही त्यांचें पत्र प्रेमानं अगदीं भरलं आहे. राव पहा तर खरं एकदां हें पत्र वांचून! लिहितात इतकी माझी योग्यता आहे कांहो राव! (पत्र त्याच्या हातीं देतों.)

बलवंत—हं: [पत्र परत करून] त्यांच्या मनाचं यांत खरं प्रतिबिंब दिसत आहे.

नाना—[आपल्याशीं] यांचा पत्रव्यवहार यावरून बऱ्याच दिवसापासून चाललेला आहे ह्मणायचा? हैद्राबादवाल्या निजामाच्या राज्यांतील अंधाधुंदीला, कांहीं आह्माला आतां हंसायला नको.

कोंडाजी—[आपल्याशीं] नानासाव लई रागावलं आहीत, असं त्यांच्या चेहऱ्यावरनं दिसतया. त्या पागेदार बामनाची आतां शंभर वर्स भरलींच ह्मणायची !

माधव—बाबासाहेबांची आणि माझी गांठ केव्हां पडेल, माझ्या सर्व आप्तस्वकीयांना मी केव्हां एकदां भेटेन असं मला झालं आहे, त्यांच्याशिवाय माझी आप्तस्वकीय मंडळी आहेत कोण ! वेळ पाहून नानांना याबद्दल विचारायचं ! आपलं वैभव पहायला, आपण एखादं चांगलं कृत्य केलं ह्मणजे त्याचं कौतुक करायला जर आपली आप्त मंडळी नाहींत, तर मग शेंकडों बाहेरच्या मंडळींला घेऊन करायचे काय? दाणे नसले ह्मणजे मग उडून जाणाऱ्या पांखराप्रमाणेंच त्यांची स्थिती. नाहीं; माझी मंडळी माझ्या जवळ पाहिजेत.

बलवंत—ज्याप्रमाणें श्रीमंतांना बाबासाहेबांचा निदिध्यास लागला आहे, त्याचप्रमाणें बाबासाहेबांसही श्रीमंतांचा लागला आहे. पण तो योग येईल तेव्हां खरा ! आप्पासाहेबास तर प्रत्यहीं श्रीमंतांची आठवण होते.

नाना—[आपल्याशीं] असं, असं ! सापाच्या पिलांना घरांत मोकळं सोडीन इतका मी मूर्ख नाहीं ! अंगावर प्रथम चढतांना तीं मऊ आणि गार लागतात, पण परिणामीं प्राणघातक; हें यांना पोरवयामुळें कळत नाहीं.

माधव—पाहूं बाबासाहेबांनीं माझ्याकरितां काय चीज पाठविली आहे ती!

बलवंत—ही घ्यावी. ही श्रीमंतांनीं आपल्या जवळ ठेवावी अशी त्यांची इच्छा आहे; आणि ती कोणाच्या नजरेस न पडेल अशी तजवीज ठेवावी.

माधव—[ताईत घेऊन पहातो] हें काय बरें आहे ? मला वाटतं ताईत आहे. मी हा असा मणगटांत बांधीन अगर माझ्या यज्ञोपवीताला बांधून ठेवीन. याच्यावर नकशीचं काम मोठं सुबक केलं आहे.

बलवंत—आणखी एक माझी श्रीमंतापाशीं विनंती आहे.

माधव—कोणची ती ?

बलवंत—मी जोंपर्यंत येथें आहे, तोंपर्यंत हा ताईत मजजवळ असूं द्यावा, मी परत जातांना श्रीमंतांना देऊन जाईन. ह्मणजे तो कोठून आला, कसा आला याची चौकशी आजच व्हावयाची नाहीं.

माधव—आमचे आजोबा जे दादासाहेब त्यांच्या हातांतला हा ताईत आहे, असं बाबासाहेब पत्रांत लिहितात; मग तो वडिलोपार्जित जिन्नस आपल्याजवळ ठेवायला काय हरकत आहे ?

बलवंत—पण तो आजपर्यंत नव्हता आणि आतां आला कोठून ? अशी सहजच दुसऱ्यास पाहिल्यावर शंका यायची ! त्यांतून नानांच्या दृष्टीस पडला कीं, त्याची चिकीत्सा मग झाल्यावांचून रहावयाचीच नाहीं ह्मणून ह्मणतों—

माधव—बरं, तसं तुमच्या मर्जीप्रमाणेंच कां होईना ! घ्या हा, जातांनाच मला द्या ह्मणजे झालं ! बरं पण राव तुह्मी जाणार केव्हां ?

बलवंत—लवकरच जाईन ह्मणतों ! [ताईत घेतो]

माधव—राव, जेव्हां जेव्हां तुह्मी पुण्यास येतां, तेव्हां तेव्हां तुह्माला परत जाण्याची मोठी घाई असते.

बलवंत—नोकरी तेथें पडली आणि ती इमानदारीनं आणि सावधगिरीनें केली पाहिजे तेव्हां नाईलाज आहे. नाहीं तर बाजीरावसाहेबांचे आणि श्रीमंतांचे चरण सोडून मी कधींच दूर गेलों नसतों.

नाना—[आपल्याशीं रागानें] अरे फितुऱ्या, काय पण इमानदारीनें आणि सावधगिरीनें चाकरी करीत आहेस ? तुला बाजीरावाचे चरण सोडून जाण्याची इच्छा नाहींना ? त्याच किल्ल्यांतील अंधारकोठडींत तुमची स्थापना करतों, ह्मणजे जन्मभरपर्यंत तुला बाजीरावाचे चरण अंतरणार नाहींत.

माधव—आतां गणपतीचा उत्साह जवळच आला आहे, तेवढा केल्याशिवाय जायचं नाहीं; अशी आमची तुम्हाला आज्ञा आहे.

बलवंत—श्रीमंतांची आज्ञा कोण मोडील ? बराच वेळ झाला। येतों मी !

माधव—या. रोज भेटत जा.

नाना—[आपल्याशीं] चोर मुद्देमालानिशी चांगला सांपडला आहे. पहातों आतां येथून कसा सुटून जातो तें ! कोंडाजी, मी सांगेन तसं ताबडतोब कर. अगदीं मागें पुढें पाहूं नकोस ?

माधव—(पत्र पहात रहातो) बाबा—

(बलवंतराव नागनाथ बाहेर पडतात, तो एकदम नाना फडणवीस पुढें होऊन ओरडून ह्मणतात; माधवराव, त्यांचें ओरडणें ऐकून स्तब्ध होतो.)

नाना—[रागानें, मोठ्यानें ओरडून] बलवंतराव कुठं चाललास. उभा रहा. खबरदार एक पाऊल पुढें टाकशील तर.

बलवंत—(घाबरून लटलटा कांपू लागतो.)

नाना—आतां श्रीमंतांजवळून उचलून तूं काय खिशांत घातलेंस, तें काढ पाहूं !

बलवंत—कां—हीं—ना—हीं—

नाना—कांहीं नाहीं. मीं आपल्या डोळ्यांनीं प्रत्यक्ष पाहिलें आहे. कोंडाजी, पहातोस काय ? याच्याच शेल्यानें बांध याच्या मुसक्या आणि पहा याच्या खिशांत काय आहे तें !

[कोंडाजी बलवंतरावाच्या मुसक्या बांधतो आणि त्याच्या खिशांतून ताईत काढून घेतो.]

कोंडाजी—(नानांच्या हातीं ताईत देऊन) हें घ्यावं धनीसाहेब. दुसरं कागुद आहीत कागुद.

नाना—अरे चोरा, हरामखोरा हें रे काय ! कांहीं नाहींना ? [नीट न्याहाळून पाहून] हा ताईत आहे. हा कोठून आणलास? बोलतोस कीं नाहीं?

बलवंत—हा श्रीमंत बाजीरावसाहेब पेशवे यांनीं श्रीमंतांस देण्याकरितां दिला आहे. श्रीमंत दादासाहेब यांच्या हातांतला तो आहे, आणि तो श्रीमंतांस नजर केला आहे.

नाना—समजलों, समजलों, सर्व तुमचें आणि त्यांचें कारस्थान ! अरे फितुऱ्या हरामखोरा, तुझ्यावर एवढा विश्वास ठेवला त्याचें हें फळ काय ? खास, खास, हा ताईत कांहीं चांगला नसावा. तूं इतका राजद्रोही होशील असें मला मुळीं सुद्धां वाटलं नव्हतं. राजद्रोह, फितूर, बेइमानी चहूंकडे माजली आहे. अरेरे—

बलवंत—मी—कांहीं—एक फितुरीपणा केला नाहीं.

नाना—चोरून एकमेकांकडे पत्रें यायचीं, भेटीच्या जिन्नसा यायच्या, आणि त्या तुझ्या मार्फत, ज्याला मीं बंदोबस्ताकरितां नेमला त्या कामगारामार्फत अं:? हा फितूर नाहीं तर काय? याकरितां तुला तेथें ठेवला होता अं:!

बलवंत—माझ्या—

नाना—[संतापानें] अगदीं एक अक्षर बोलूं नकोस ? माझ्या विश्वासाचें जसें तूं मला फळ दिलेंस, तसें आपल्या राजद्रोहाच्या कृतीचें फळही आतां भोगायला तयार हो. राजद्रोहाच्या अपराधाबद्दल कड्यावरून लोटणें, हत्तीच्यापायीं देणें, अगर सूळावर देणें, यापैकीं देहांतच शिक्षा दिली पाहिजे; पण तूं ब्राह्मण पडलास ह्मणून तुला ती शिक्षा देत नाहीं, परंतु जन्मभरपर्यंत तुला किल्ल्याच्या अंधारकोठडींत कैदेंतच मेलं पाहिजे. कोंडाजी, याला असाच खालीं घेऊन जा, आणि गारद्याच्या पहाऱ्यांत दे; मी खालीं आलों ह्मणजे याची आणखी काय तजवीज करायची ती करतों. ने—ने—ओढ—त्याला माझ्या डोळ्यांपुढून ओढ. हा अधम, राजद्रोही एक क्षणभर देखील आतां माझ्या दृष्टीपुढें नको.

कोंडाजी—चला—(त्याला खेंचून पुढें करूं लागतो.)

बलवंत—(काकुळती येऊन) नाना—साहेब—

नाना—[तिरस्कारानें] हो, तुला बाजीरावाचे चरण सोडण्याची इच्छा नाहींना ? तेथेंच त्यांच्याजवळ तुझी स्थापना करतों ! ह्मणजे बाजीरावालाही असलीं कुलंगडीं, आणि कारस्थानं उत्पन्न केल्याबद्दलचं प्रायःश्चित् कसं भोगावं लागतें, तें तूं त्यांच्या नेहमीं डोळ्यासमोर असला ह्मणजे चागलं कळेल. याच्या पायांत मोठ्या वजनदार शृंखळा घालून, याला शिवनेरी किल्ल्यावर आतां पाठवायचा आहे; तेव्हां याच्या बरोबर जाण्याकरितां पहारा तयार ठेवण्यास जमादारास माझा हुकूम सांग. चल ने.

माधव—[पुढें होऊन रागानें] कोंडाजी, खबरदार त्याला घेऊन गेलास तर. सोड त्याच्या मुसक्या. [कोंडाजी नानाकडे आणि पेशव्याकडे पहात रहातो] तोंड काय पहातोस. तुला कोण हुकूम करीत आहे ? [नानाकडे

पाहून] माझ्या आप्ताकडून मला आलेली वस्तु मी घेणार. (घेण्यास जातो पण नाना देत नाहीं.)

नाना—[रागानें] राजद्रोहाच्या अपराधाबद्दल कोणाचीही शिफारस ऐकायची नाहीं व चालायचीही नाहीं. झाली ही शिक्षा योग्य आहे, आणि ती अंमलांत आलीच पाहिजे. ने—

माधव—(रागानें) पण त्याला श्रीमंत पंतप्रधान माधवराव पेशव्याची संमती पाहिजे.

नाना—पाहिजे, पण ती सध्यां नाहीं, आणि या कामांत चालायची नाहीं. चल ने—तोंड पहात काय उभा राहिला आहेस ?

माधव—नाना, नाना—हा पेशव्याच्या हुकुमाचा उपमर्द होत आहे.

नाना—कांहीं नाहीं. तसें खरोखरच होत आहे कीं काय हें मागून पहातां येईल; सध्यां माझ्या हुकुमाची अंमलबजावणी झालीच पाहिजे. (कोंडाजी घेऊन जाऊं लागतो.)

बलवंत—(जातां जातां) फुटलं, नशिब फुटलं. श्रीमंतांच्या मध्यस्थीचा कांहीं उपयोग होईल असं वाटलं होतं, पण सर्व व्यर्थ. आतां मला जन्मपर्यंत कारागृहवासच भोगला पाहिजे. मी या भानगडींत पडलों नसतों तर बरं झालं असतं. भावीवैभवपदाच्या माझ्या मनोराज्यानें काढलेल्या सुंदर इमारतींनें माझे डोळे दिपून गेले, पण तिला जाण्याच्या रस्त्यावर मध्यें असलेले भयंकर खोल खळगे मला त्यावेळीं दिसले नाहींत. त्यांतच मी पडलों. यांतून बाहेर निघण्याची आतां मुळींच आशा नको. दुर्दैव ओढवलं ह्मणून मला त्या दिवशीं प्रथम या कामांत पडण्याची बुद्धि झाली. प्रिये सत्यभामे, आतां तुझं आणि तुझ्या तानुल्याचें कसं होईल. (जातो.)

नाना—चला, आतां दुःख करून काय उपयोग ?

माधव—मागून नाहीं. आतां—नाना—बलवंतराव नागनाथ कैदेंत जातां कामा नये. त्यांनीं राजद्रोह केला नाहीं. त्यांनीं जर तो खरोखर केला असेल तर त्याला ती शिक्षा होणं योग्य आहे, त्याच्या अपराधाची चौकशी

झाली पाहिजे. अन्यायानें एखाद्याला शिक्षा देणें मला अगदीं पसंत नाहीं; आणि माझी खात्री आहे कीं, त्यानें कांहींएक गुन्हा केला नाहीं.

नाना—राजद्रोह केला, यापेक्षां आणखी त्यानें कोणचा अपराध करायचा होता? (हात जोडून) त्याबद्दल श्रीमंतांची खात्री झाली नसेल, पण माझी पूर्ण खात्री झाली आहे. मीं सर्व प्रत्यक्ष आपल्या कानानीं ऐकलें आहे. त्यानं फितुरीपणा केला, त्याला सांगितलेली कामगिरी त्यानं उत्तम रितीनं बजाविली नाहीं, इतकंच नव्हे; पण त्याच्या तो उलट वागून त्यानें विश्वासघात केला. विश्वासघातकी माणसें राज्याला अपायकारक असतात, याकरितां त्यांना कडक शिक्षा दिलीच पाहिजे.

माधव—(संतापून) पण त्यानें विश्वासघात केला कुठें? नाहीं-नाहीं—बस्स माझा हुकूम चालला पाहिजे.

नाना—बाजीरावांशीं गुप्तरितीनें पत्रव्यवहार होऊं देणें, एकमेकांच्या भेटी एकमेकांकडे पोंहचविणें, मीं सांगितलें त्याच्या विरुद्ध गोष्टी चोरून करणें, या सर्व गोष्टी राजद्रोहाच्या नाहींत तर कशाच्या आहेत? अशा गोष्टीला श्रीमंतांचें पाठबळ, आणि अशा फितुरी मनुष्याला सोडून देण्याबद्दल श्रीमंतांची शिफारस; यासारखी दुसरी दुःखदायक गोष्ट कोणची! शिव, शिव, हें मला मुळींच सहन होणार नाहीं. जोंपर्यंत आपलं हिताहित कशांत आहे हें समजत नाहीं, जें काम आपण करतों, त्याचा परिणाम पुढें काय होईल, हें कळत नाहीं, जबाबदारी शिरावर घेण्याची शक्ति नाहीं, कोण मनुष्य कशा योग्यतेचा आहे, याची परीक्षा नाहीं, राज्याला अपाय कशानें आणि कसा होत आहे याची कल्पना नाहीं; तोंपर्यंत कोणत्याही मनुष्याला स्वतंत्रतेनें कोणचेंही काम करण्याला अधिकार नाहीं. त्यांतून लक्षावधी मनुष्यांचें बरें वाईट करण्याचें ज्यांच्या नुसत्या लहरीवर असतें, त्यांना तर या गोष्टी चांगल्या रितीनें समजूं लागेपर्यंत, राज्याच्या फायद्याकरितां मुळींच करून देतां उपयोगी नाहींत. श्रीमंतांची सध्यां तशी स्थिती आहे व वयही लहान आहे, ह्मणून श्रीमंतांना कोणतीही गोष्ट आपल्या मर्जीप्रमाणें आणि स्वतंत्रतेनें करितां येत नाहीं. तसें करण्याला अद्याप अवकाश आहे. याकरितां

श्रीमंतांजवळ माझी हात जोडून अशी विनंती आहे कीं, या बाबतींत श्रीमंतांनीं अगदीं भीड खर्च करूं नये, तिचा कांहीं एक उपयोग व्हावयाचा नाहीं. बलवंतराव नागनाथाला झाली ही शिक्षा अगदीं योग्य झाली आणि त्यानें ती भोगिलीच पाहिजे. आणखी श्रीमंतांजवळ माझी अशी विनंती आहे कीं, त्यांनीं आजपासून असल्या भानगडींत सध्यां मुळींच न पडण्याचं व कोणतेंही कृत्य स्वतंत्रतेनें न करण्याचं पूर्णपणें लक्षांत ठेवावें. मी काय ह्मणतों हें श्रीमंतांच्या ध्यानांत आलें असेलच.

माधव—हो,—हो—पूर्णपणें ध्यानांत आलें, आणि पेशव्याचा अधिकार काय, हेंही पूर्णपणें ध्यानांत येऊन चुकलं. पेशव्याचा हुकूम तोडणाऱ्या मनुष्याचे तुकडेच केले असते पण-(तें आंवरून रागानें निघून जातो)

नाना—(रागानें) त्या हरामखोराच्या दुष्ट कृतीमुळें हा असा आज दुःखदायक प्रसंग आला. श्रीमंतांना माझ्या बोलण्याचा सध्यां राग आला आहे, पण परिणामीं तें त्यांना हितावह झाल्याशिवाय कधीं राहणार नाहीं. दुष्ट कृत्य हें भयंकर महामारीसारख्या सांथीच्या रोगाप्रमाणें आहे. तें एका मनुष्याचाच नाश करून रहात नाहीं, तर आसपासच्या कित्येकांच्या प्राणनाशास कारण होतें. तेव्हां त्यापासून उपद्रव न होऊं देण्याची पहिल्यापासूनच काळजी घेतली पाहिजे. नानासाहेब पेशव्यांच्या सुवंश वृक्षाच्या या लहानशा सुंदर रोप्याला, या असल्या विषारी किडी लागूं नयेत, त्यांची छाया सुद्धां यावर पडूं नये, ह्मणून मी रात्रंदिवस मोठ्या दक्षतेनें जपत असतांही शेवटीं ती लागण्याचा प्रसंग येऊन ठेपलाच होता; पण दैवयोगानें तो लवकरच दृष्टोत्पतीस आला ह्मणून बरें झालें. आतां मला श्रीमंतांच्या प्रत्येक कृतीवर पूर्वीपेक्षांही जास्त दक्षतेनें याकरितां नजर ठेविली पाहिजे. कारण सर्पाच्या कुळांत सर्पच उत्पन्न व्हावयाचे, हें सर्व जगाला माहित आहे. कोणी तात्काळ प्राण घेणारे, कोणी पाव लहरीचे, कोणी अर्ध्या लहरीचे, कोणी एक लहरीचे, कोणी दोन तीन लहरीचे इतकाच त्यांच्यांत भेदाभेद; बाकी परिणामीं सर्वच प्राणांशीं गांठ घालणारे असतात. (जातो.)

अंक तिसरा समाप्त.

अंक चवथा.

प्रवेश पहिला.

स्थळ—शनवारच्या वाड्यांतील चौक.

पात्रें—कोंडाजी, नाईकाचा मोठा भपकेदार पोषाक करून ऐटीनें येत आहे.

कोंडाजी—(आपल्याशीं) आतां बघूं बरं मला कोण मुर्दाड कोंड्या कामाठी ह्मनतो तो ! जो ह्मनल त्याचं अगुदर तथच मुस्काट फिरवून देईन, आन् मग त्याच्याशीं बोलन. इचिभन नशिब फळफळायला लागलं ह्मनजे बघा कीं कसं फळफलतय ? चार महिन्यामागं मी या चौकांत क्येरपोत्यर करीत होतो, तो आतां समद्या हुजऱ्यांचा नाईक झालोंया नाईक; आन् माझी नोकरीबी अक्षी शिरीमंताजवळ राहाण्याची. व त्यांच्यावर नजर ठेवण्याची नानासाबनीं करून दिली. आतां समदं मला कसं वचकत्यात, आन् अक्षी कोंडाजीराव, कोंडाजीराव ह्मनून शिरीमंत काय करत्यात, शिरीमंत कुठं हैती, नानासाब कचीरींत आलं कां ? त्यांची आतां भेट व्हईल. असं इच्यारत्यात, तवा मोहरं जातात. अगुदर जवा मी त्या इठ्याकडं, त्या महाद्याकडं, कामाकरितां जात व्होतो, तवा माझ्या अंगावर कसं कुत्रचावानी वसकन् येत होते, आन् आतां कसं माझ्या मोहरं कुत्रचावानं गोंडा घोलत्यात. आतां मीबी त्यांच्यावर गुरगुरत जाईन. (थोडे थांबून) त्या समद्यासनी जाब देतां देतां आपलं तर त्वांड दुखून आलं. त्या लोकासनी असं कसं समजत न्हाई ह्मनतो कीं, इकत्या जनासनी ह्ये एकट्या कोंडाजीराव नाईकाचं थोबाड जाब देतां देतां दुखून कसं येत नसल. ह्ये माझं थोबाड आहे कां तोबरा आहे तोबरा ! पन दुसऱ्याची फिकीर या दुनियेंत करतो कोन ल्योक ? ज्याची त्याची मोठ्याची काय, आन् लहानाची काय समदी आपल्यावर नदर. आतां ह्यो कोंडाजीराव नाईक कुनासनी तोंडानं जाब नाहींच देनार ! नानासाब आन शिरमंत जेव्हां इच्यारतील तवाच ह्ये त्वोंड उघडल,

आन बाकीच्यासनी नुसतं मुंडी हालवूनच सांगत जाईन. इतकी सर्व नानासाहेबाची कुरपा! आन त्यांची कुरपा कां होनार न्हाई, या बहादरानं तसीच सरकारची कामगिरी बजावली आहे. त्या सटवी मैनेचा नखरा माझ्यापेक्षां आधीक आहे, का या कोंडाजी रावाची ऐट तिच्या नखऱ्याहून आधीक आहे! लई, लई, फुटाण्यावानी उडत होती; बरं, बरं मैने सटवे—

(इतक्यांत मैना येते.)

मैना—(मागून येऊन) कायरे मेल्या ह्मसोबा, कोंड्या, कुणालारे सटवाई ह्मणतोस? तुझी आई, बहीण, काकी, मावशी असेल सटवाई! काय मेला नंदीबैलासारखा सजला पहा? काय त्या पागोट्याची ऐट, काय अंगरख्याचा झोंक, कानांत बाळ्या काय घातल्या आहेत आणि मिशीला पीळ काय घालतो आहेस; जसा काय माकडाच्या तमाशांतला देवजी धसाड्याच! अहाहा शेणाचे दिवे ओवाळावे दिवे! मेल्या किती जरी नटलास, किती मुरकलास, किती जरी ऐट दाखविलीस तरी तुझ्या अंगाला जी केरपोतेऱ्याची घाण येते आहे, ती कांहीं अद्याप गेली नाहीं. ओय—इश्यग बाई—थूं! (थुंकते.)

कोंडाजी—(जरा रागानें) ए ए फुटाणे, ए. मैने, जरा त्वांड संभाळ त्वांड! कुनाला बोलतीस, याचं कांहीं गुमान है का तुला? ह्यो त्यो केरसुनी घेऊन चौक झाडनारा आतां कोंड्या कामाठी नव्हं समजलीस कां? आतां ह्यो नानासाबाच्या मेहरबानगीनं शिरिमंतांच्या संमद्या हुजऱ्याचा कोंडाजीराव नाईक आहे नाईक. जरा मानुस बनूनशानी बोलत जा. आतां एकदां बोललीस त्ये बोललीस, पुन्हा बोललीस तर बिलकूल खपनार नाहीं. लागलीच गारद्याच्या पहाऱ्यांत देईन.

मैना—मेल्या ह्मसोबाराव, तूं कां मला गारद्याच्या पहाऱ्यांत देणार? मुर्दाडाचें तोंड पाहून घ्या, मला गारद्याच्या पहाऱ्यांत देण्याचं!

कोंडाजी—बघ, बघ, पुन्हा म्हनालीस! न्हाई, न्हाई ह्ये खपनार! बरं, आतां पुन्हां तर म्हन ह्मनजे दावतो तुला!

मैना—[हांसून] घे पुन्हां ह्मणते, कोंड्या कामाठी, ह्मसोबाराव, ह्मसोबा, म्हसोबा!

कोंडाजी—(तिच्या तोंडावर हात ठेवून) अग गप्प, गप्प!

मैना—(हात काढून) बघ, पुन्हां ह्मणते, ह्मसोबा, वाऱ्या, ह्मसोबा, ह्मसोबा! काय करतोस तें कर आतां!

कोंडाजी—अग तुला समदं दावलं बी असतं, आन केलं बी असतं; पन तूं जवा ह्मनतीस तवा मला असा राग येतों कीं, तुला खूप बडव बडव बडवावी, आट्यावानी तिंबावी; पन तवा ह्मणतां ह्मणतां मधून मधून गालांत हांसतीस आणि डोळं मिचकावतीस, त्येनं माझा संमदा राग पान्यांत ढेकूळ टाकल्यावानी इरगुळून जातो. तूं ह्मनतांना हांसू नकोस, आन डोळं बी मारूं नकोस, ह्मनजे मग या मर्दाचा क्रुद बघ कसा आहे त्यो, तुझा खुर्दाच करून टाकीन.

मैना—(हांसून) मेल्या—

कोंडाजी—(लघळपणानें) बघ, बघ, पुन्हा गालांत हांसतीस, आन् डोळं बी मारतीस! हें चांगलं नव्हं! (तिच्या जवळ जाऊन) बरं आतां तर या कोंडाजीरावाशीं पाट लावशील कां न्हाई? ह्यो तुझ्यापरमानं मोठा झाला कीं न्हाई. तूं मागं ह्मणाली व्हतीस कीं मला कामाठी नग. जासूद, हुजऱ्या, शिपाई होवा, आन आतां बघ कीं मी नुसता हुजऱ्या झालों नाहीं तर हुजऱ्यांचा नाईक झालों नाईक. आन तूं आतां माझ्याशीं पाट लावलास कीं माझी कारभारीन होशील; आन मग वाड्यांतलं समदं लोक, समद्या बायका तुला नाईकीण ह्मनतील नाईकीण! कळलं कां! मग कवा पाट लावायचा? या भाद्व्यांत, कां मार्गसिरांत, कां सिमग्यांत! कां कवा? बोल कीं? सिमग्यापर्यंत थांबलं तर इतकं मांयदळ दागिनं करूनशान तुझ्या अंगावर घालीन कीं, जनुकाय गौरच सजलीया! पन इकतं लांब आपल्याच्यानं आतां न्हाई दम निघत! भाद्व्यांतच घेऊं कीं उरकून! दागिनं होतील मागून!

मैना—तुझ्याशीं, ह्मसोबाशीं, मला मुळींच पाट लावायचा नाहीं.

कोंडाजी—कां, कां आतां इचिबन् असं कां?

मैना—तसंच कांहीं आहे !

कोंडाजी—काय त्यें कलुंदे कीं ! कामाठ्याचा हलकारा, हलकाऱ्याचा जासूद, जासूदाचा हुजऱ्या, आन आतां हुजऱ्याचा नाईक झालों; आन इतकं समदं चार महिन्यांत. इतकी उच उडी डोंबारीबी मारत्यात कां ?

मैना—तूं हुजऱ्याचा नाईक जो झालास तो कशानं ?

कोंडाजी—माझ्या शेनपनानं, आणि अक्कलहुशारीनं सरकारची कामगिरी केली तवा झालो, कां उगीच झालों व्हय ? पाळत राखून नानासाबासनी गुपचुप खबार देऊन त्या शिवनेरीच्या पागेदाराला दिलाना पकडून, तवा नानासाबांची मेहेरनजर झाली. उगीच न्हव ? त्यो पडलाना आतां सिवनेरी किल्ल्यामधी अंधारकोठडींत कैदत ! त्ये समदं काम ह्या ह्या पठ्यानं केलं.

मैना—कांहीं कुठं लढाईत तरवार तर गाजवली नाहींसना ? रांडासारखी चहाडी खाऊन त्या बामनाला कैदेंत घालून वाढलास ! हीं कामं तर रांडा, जे नामर्द असतात ते करतात ! थुः तुझ्या जिनगानीवर. लोकांच्या चहाड्या सांगून आणि नास करून, तळतळाट घेऊन मोठा होतोस ? लढाईत जाऊन तरवार गाजवायची होतीस, ह्मणजे ह्मटलं असतं कीं खरं तुझ्या अंगांत पाणी आहे; पण तें येतं कुठलं ! तूं बोलून चालून कामाठी केर काढणारा, तुझ्या अंगीं मर्दपणा येणार कुठला ! आधीं होता वाघ्या मग झाला पाग्या; पण त्याचा एळकोट कुठला जायला ! तशी तुझी गत !

कोंडाजी—आतां असं ह्मनतीस व्हय ? पन तूं मला अगुदर सांग कीं पिरथीमींत जे समदं तालेवार होऊन ग्येलात, आन् मार टोलजंग वाड्यांत बसून बापाचा ल्योक, त्येचा ल्योक, त्याचा नातु, त्येचा पनतु असं पिढ्यान पिढ्या मजा मारत्यात; त्या समद्यानं तरवार गाजविली असती व्हय ? कुनी तरवारबी गाजवतो, कुनी चहाडीबी करतो, कुनी दरोडाबी घालतो, कुनी कुनाचा गळाबी कापतो, असं कांहीं जवा करत्यात तवा गबर होऊन बसतो. या पिरथीमींत एकाचा गळा दुसऱ्यानं कापल्याबगर कुनीच लेकाचा एकदम तालेवार होत नाहीं. समदं मर्द नसत्यात.

मैना—असल्या चहाडखोराबरोबर पाट लावून चहाडखोराची बायको, असं मी नाहीं ह्मणून घेणार ?

कोंडाजी—यद्रूळ तुला, जासूद, हलकारा, हुजऱ्या हवा होता. आन आतां सिपाई व्हवा व्हय! अग सटवे. कशी कशी बोलतीया मैना. (तिचा हात धरतो) मैना, असं कां करतीसग ? कवा, कवा मग बोल कीं !

मैना—चल सोड मेल्या, मी तुझ्याशीं पाट कधींच लावणार नाहीं. बाईसाहेबाना आज हरताळकेची पूजा करायची आहे, तेव्हां त्यांची वेणी-फणी करून बागेंतलीं माळ्याकडून फुलं आणायाचीं आहेत. सोड सोड मला जाऊंदे.

कोंडाजी—[तिला धरून ठेवून] तूं न्हाई, न्हाई, माझ्याशीं पाट लावायला कबूल होत ?

मैना—नाहीं, नाहीं, चहाडखोराची कोण बायको व्हायला सुजलं आहे. माझा खेंटर देखील आडला नाहीं. जल जा कीं चुगलखोरा ! [झटक्यानें निघून जाते.]

कोंडाजी—[आपल्याशीं] पांजरापोळांतली गाय जसी एका ठानावर बसून राहयची न्हाई, हाकडं जा, तकडं जा, इथं हुंग, तिथं त्वांड घाल अशी करती; तशांतल्या या बटकीच्या पोरी. असली ही चवचाल, आन चवना करनारी पाटाची नको आपल्याला बायकु ! आपन आपली लग्नाचीच एकादी फाकडी पोरगी पाहून बायकु करूं ! वाईच थोराड आन धडधाकट पोरगी पाहून केली ह्मनजे झालं. बायकाला जरा चांगलं चांगलं खायला घातलं, जरा खुराक लावला ह्मनजे भरारा उकीरड्यावानी वाढतात. सहा महिन्यांत माजलेल्या ह्मशीवानी बायकु ! आपल्याजवल मुबलक पैसा असला ह्मनजे हव्या तिकत्या एकाहून एक चढ फटाकड्या पाया पडत येतील. पैसा असला तर या पुन्यांत पोरींना काय तोटा पडलाय ? मेथीच्या भाजीवानी सस्त्याच सस्त्या. घटका दोन घटकांनीं जीव जाऊन तिरडीवर नेऊन ठेवणाऱ्या जखड थेरड्याना सुधां बी जर फटाकड्या पोरी पैसाला मिलतात, जर मला जवान मर्दाला कां नाहीं मिलनार ? [ऐटींनें मिशाला पीळ घालीत निघून जातो.]

प्रवेश दुसरा.

स्थळ—गणेशमहाल.

पात्रें—श्रीमंत सवाई माधवराव पेशवे, इकडे तिकडे विचारांत गर्क होऊन खेपा घालीत आहेत.

माधव—[आपल्याशीं खिन्न वदनानें] मी कोण ? आणि माझा जगांत उपयोग काय; या दोन गोष्टींचा मी आज बरेच दिवस विचार करीत आहे, पण समाधानकारक असा याचा उलगडाच होत नाहीं. वाटेल तेव्हां म्यानांतून काढावी, वाटेल तेव्हां तिचा उपयोग करून घ्यावा, आणि वाटेल तेव्हां ती म्यानांत घालावी; अशी मी एक मोठी पेशव्यांच्या अमोल्य वस्तुंपैकीं सतेज आणि पाणीदार, रत्नखचित मुठीची आणि म्यानावर जडावाचं काम केलेली पण उपयोगी तरवार आहे; पण ती उपयोगी केव्हां, जेव्हां दुसरा कोणी तिचा उपयोग करील तेव्हां; तिचा स्वतांला मात्र कांहीं एक उपयोग नाहीं. तेव्हां मी सतेज आणि रत्नखचित मुठीची तरवार आहे खरा; पण ती पाणीदार नाहीं, दिखाऊ आहे. नाहींतर ' बलवंतराव नागनाथ कैदेंत जातां कामा नये, बाबासाहेबाकडून वडिलांच्या जिन्नसापैकीं, मला आलेला भेटीचा ताईत, माझ्याजवळ पाहिजे, ' असा मीं माधवराव पेशव्यानें तीन वेळ कडक हुकूम सोडला असतां, तो जेव्हां अमलांत आला नाहीं; तेव्हां तो पेशव्याचा हुकुम, तोडणाऱ्याचे लागलेच तिनें तेथल्या तेथेंच तुकडे तुकडे करून, पेशव्यांच्या पाणीदार समशेरीचें पाणी दाखविलें असतें ! पण तसं कुठं झालं. बलवंतराव कैदेंत गेला, तो माझा ताईत माझ्या जवळ आला नाहीं, आणि पेशव्यांचा हुकूम तोडला गेला तो गेलाच ! पण तो पेशव्यांच्या कैदेंत गेला, तेव्हां मी तसा आहे आणि नाहींही. अत्यंत कुशल कारागिरानें तयार केलेलं मी सुरेख, सुंदर आणि मधुर शब्द काढून लोकांचं मन आकर्षण करणारं असं एक कळसूत्रीं बाहुलं आहे. पण तें सुरेख झालं केव्हां ? दुसऱ्यानं केलं तेव्हां ! तें कानाला गोड लागणारा सुस्वर आवाज काढतं केव्हां, दुसरा जेव्हां त्याची कळ फिरवितो तेव्हां ! या दोन्हीं गोष्टींचा त्या कळसूत्री बाहुल्याला कांहीं उपयोग आहे कां, कांहीं नाहीं. तें सर्व दुसऱ्याचे उपयोगाकरितां ! स्वतां

त्याची मूळची स्थिती ह्मणजे निरुपयोगी आणि निर्जीव लांकडाची! लांकूड तरी निरुपयोगी कां? नाहीं, तें उपयोगी आहे. तें जर मुळींच नसतं, तर सुरेख आणि गोड शब्द काढणारं बाहुलं झालं असतं कां? तेव्हां तें उपयोगीही आहे आणि निरुपयोगीही आहे. उपयोगी दुसऱ्याला आणि निरुपयोगी स्वतांला! ज्या पेशव्यांनीं शेंकडों वेळ निजामाची खोड मोडली, कित्येक वेळां हैदरनाईकाची आणि टिपू सुलतानाची रग जिरविली, दक्षिण देशांत तऱ्हाडांत, बंगाल्यांत, पंजाबांत, उत्तर हिंदुस्थानांत, गुजराथेंत वगैरे सर्व ठिकाणीं आपला अंमल, तरवार बहाद्दर आणि विजयी अशा आपल्या सरदारांकडून बसवून, दिल्लीच्या बादशहापासून सुद्धां चौथ आणि सरदेशमुखीच्या सनदा आणल्या आणि छत्रपतींच्या नांवाचा दरारा बसविला; रोहिले, गिलचे, व दुराणी लोकांना अटकेच्यापार हांकून दिलें. त्या पेशव्यांचा गादीवर बसलेला मी माधवराव पेशवा आहे. पेशव्यांचा हुकूम मोडण्याची कोणाची छाती आहे; जो असें करण्याला धजेल तो मातीस मिळून जाऊन जन्मास आला होता कीं, नाहीं अशी त्याची स्थिती होऊन जाईल; पण माझा, माधवरावाचा हुकूम, पेशव्यांचा चाकर तर मानीत नाहींच, पण त्याचाही यःकश्चित् चाकरही मानीत नाहीं! ह्मणजे मी प्रत्येक वस्तुप्रमाणें उपयोगी आहे आणि निरुपयोगीही आहे. माधवराव पेशव्याचें सर्वजण ऐकतात, पण माझं ह्मणजे माधवरावाचें कोणीच ऐकत नाहीं. प्रत्येक गोष्टीचा त्यामुळें उपयोग आहे, पण तिचा स्वतांला मात्र कांहीं उपयोग नाहीं. अशा मनुष्याच्या स्थितीला हांसावं कीं रडावं? (दांत चांवून) करावं तरी काय! पण मला हांसतां येत नाहीं आणि रडतांही येत नाहीं. कारण कोणतंही काम स्वतंत्रतेनें मला करण्याचा अधिकार नाहीं, तेव्हां मी काय करावं, हें मला समोरून येणारे गृहस्थ सांगतील काय—हो—

(इतक्यांत नाना फडणवीस येतात.)

नाना—(हात जोडून) काय, श्रीमंतांची काय आज्ञा आहे? श्रीमंतांनीं येथें बसावं?

माधव—हो–बसलंच–पाहिजे. (गादीवर जाऊन खिन्न वदनानें बसतो.)

नाना—काय-ती-आज्ञा—व्हावी.

माधव—(चमत्कारिक मुद्रेनें) आज्ञा—(मोठ्यानें हांसतो) आज्ञा—कांहीं —

नाना—होय, श्रीमंताची आज्ञा आह्माला शिरसावंद्य होय !

माधव—(एकीकडे तोंड करून बसतो आणि आपल्याशीं) आपण दुसऱ्याची आज्ञा विचारणं ह्मणजे, 'अशी आज्ञा आहे' ? असं सांगणं ! ह्मणजे ही आज्ञा शब्दाची आणि त्याच्या अर्थाची थट्टा करणं आहे. तेव्हां (रागानें) मनुष्याची थट्टा, अधिकाराची थट्टा, हुकुमाची थट्टा, शब्दाच्या अर्थाची देखील थट्टा, हें काय आहे काय ? असली थट्टा श्रीमंत पंतप्रधान सवाई माधवराव पेशव्याला कधीं खपायची (नानाकडे पाहून, उघड) नाहीं.

नाना—[आपल्याशीं] या पूर्वी जेव्हां जेव्हां मी श्रीमंतांकडे येत असे, तेव्हां तेव्हां, श्रीमंत माझ्याशीं किती मोकळ्या मनानें बोलत असत, मला किती नानातऱ्हेच्या गोष्टी रोज विचारीत असत; त्यांपैकीं आतां एकही राहिलं नाहीं. धड बोलणं नाहीं, विचारणं नाहीं, दरबारांत येणं नाहीं, कांहीं नाहीं. रोज आपली उदासीन वृत्ती असते. हें असं जर रोज चाललं तर कसं होणार ? चोरानं चोरी केली, अथवा हरामखोरानं हरामखोरी केली ह्मणजे त्याबद्दल इतकं वाईट वाटत नाहीं, आणि त्या मनुष्याबद्दल इतका रागही येत नाहीं; पण इमानदारानें चोरी केली आणि अत्यंत विश्वासूक मनुष्यानें विश्वासघात केला ह्मणजे किती राग येतो, याची कल्पनाच होत नाहीं. बलवंतराव नागनाथानें तसें कृत्य केलं, आणि त्याबद्दल श्रीमंतांनीं शिफारस केली ह्मणून रागाच्या आवेशामुळें, बोलण्यांत माझ्या हातून त्यावेळीं अतिक्रम झाल्यानें श्रीमंतांस राग येऊन अशी त्यांची वृत्ती झाली असेल तर, ती मला त्यांच्यापाशीं क्षमा मागून घालविली पाहिजे. धन्यापुढें अपराधाची क्षमा मागायला हरकत कसली ! (उघड) आतांशा श्रीमंतांनीं उदासीनवृत्ती कां धरली, त्याचं कारण जर समजेल तर त्याचें तात्काल निराकरण होईल ! फक्त आज्ञा मात्र व्हावी !

माधव—काय-आज्ञा-आज्ञा कसली? आणि कोणाची—माझी—कांहीं एक

आज्ञा नाहीं. पण—(विचार केल्यासारखें करून) पण—तरी—काय—पण—ही—कांहीं नाहीं. (तोंड फिरवून बसतो.)

नाना—बलवंतराव नागनाथाला फितुराबद्दल कडक शिक्षा केली, याबद्दल श्रीमंतांना माझ्या त्या दिवशींच्या बोलण्यानें रोष आला असेल, तर तो रोष श्रीमंतांनीं सोडावा आणि या पायाच्या चाकराला क्षमा करावी. पण माझी खात्री आहे कीं, झाल्या गोष्टीचा श्रीमंतांनीं शांतपणें विचार केला तर त्याला जी शिक्षा झाली ती अगदीं योग्य झाली, अशी श्रीमंतांचीही खात्री झाल्यावांचून राहणार नाहीं. एका फितुरी मनुष्याला जर मोकळा सोडला तर, तो राज्यांत चहूंकडे गोंधळ उडवून दिल्याशिवाय कधीं राहणार नाहीं. तेव्हां सुव्यवस्थेकरितां कडक शिक्षा कित्येक बाबतींत कोणाचीही शिफारस न ऐकतां केलीच पाहिजे. पेशवे सरकारच्या कायद्याचें उल्लंघन जर त्यांच्याचकडून होऊं लागलं, तर मग त्याचं महत्व कोण मानील ? तेव्हां पेशवे सरकारच्या महत्वाकरितां त्या गोष्टी केल्याच पाहिजेत. एकाच्याच महत्वाकरितां नव्हेत. (सुस्कारा टाकून) श्रीमंत नानासाहेब पेशवे पानपतच्या अपजयामुळें कैलासवासी झाल्यानंतर, महाराष्ट्रवासी जनांच्या अफाट शोक समुद्रावर प्रतिकूळ दैवाच्या प्रचंड झंझावातानें भयंकर तुफान होऊन, जेव्हां हें महाराष्ट्र राज्यरूपी तारूं इकडे तिकडे हेलकावे खाऊं लागलें व त्याला गृहकलह, आपसांतील दुही, निकट शत्रूंचीं कारस्थानें वगैरे मोठमोठीं छिद्रें पडून तें ज्या वेळीं अगदीं बुडण्याच्या बेतांत आलें होतें; त्या वेळीं त्या तशाही प्रसंगांतून श्रीमंतांच्या चुलत्यानीं मोठ्या हुशारीनें गृहकलहाखेरीज बाकी जर्व छिद्रें बुजवून तें तीराला आणण्याचा प्रयत्न केला होता; पण ते हुशार कर्णधार अकालींच मृत्युमुखीं पडले. पुढें त्यांत राज्यतृष्णाग्नीनें एकदम पेट घेऊन श्रीमंतांच्या वडिलांचा स्वाहा केला! पुढें चहूंकडे बजबजपुरी कशी माजली, श्रीमंत लहान असतांना कसे घोर प्रसंग आले, आणि हें राज्य दोघांच्या भांडणानें तिसऱ्याच्या घशांत जाण्याची किती भयंकर वेळ आली होती! परंतु त्यावेळीं कोणकोणच्या प्रयत्नानें सर्वही अरिष्ट—ढगांतून मराठ्यांचा पराक्रम—रवि पार पडून खर्ड्याच्या लढाईच्यावेळीं सर्वांस त्याचा प्रभाव कसा

दृष्टीस पडला; या गोष्टी श्रीमंतांच्या लक्षांत नाहींत असें मी कसें ह्मणूं? सुज्ञांस थोडक्यांत कळतं!

माधव—(मान हालवून) हो, [आपल्याशीं] मला कळलं नव्हतं—पण आतां कळूं लागलं आहे.

नाना—दादासाहेब आणि आनंदीबाईसाहेब, यांच्या गृहकलह विषाचा परिणाम किती भयंकर आहे, याचा त्यांना आणि सर्वांना पूर्ण अनुभव आल्यामुळें, आपल्या चुलत्यांनीं आणि वडिलांनीं त्यांचा चांगला बंदोबस्त केला. तशाही स्थितींत आपल्या वडिलांचा याच गणेशमहालांत, कारस्थानें करून त्या दुष्टांनीं कशा भयंकर रीतीनें वध केला, ही गोष्ट श्रीमंतांच्या स्मरणांतून जातां कामा नये? श्रीमंतांचें मन मोठें आहे, स्वभाव उदार आहे, त्यामुळें श्रीमंत ती मागची गोष्ट विसरतील; परंतु आपल्या चुलत्यांनीं आणि वडिलांनीं 'आपल्या वडिल मातुश्रीस जन्मभरपर्यंत प्रतिबंधांत ठेवलें,' हें बाजीराव त्यांचा पुत्र कधीं विसरणार नाहीं. सगळे जरी नाहीं, तरी आईबापाचे कांहीं तरी गुण मुलांच्या अंगीं जात्याच येतात. तो त्याप्रमाणें कांहीं तरी कारस्थानें करील; अशी माझी जी पूर्वीं कल्पना होती, ती बाजीरावाच्या सध्यांच्या कारस्थानानें खरी ठरली इतकेंच नव्हे, तर त्याबद्दल माझी पूर्ण खात्री झाली आहे. कोण भयंकर कारस्थान तें! नको, त्याचा उच्चारच करणें नको!

माधव—[एकीकडे] खरें आहे. त्याचा उच्चार करूं नये हें बरें, असं मलाही वाटतं.

नाना—या लहान वयांत जर त्यांचा एवढा प्रभाव, तर पुढें राव काय करतील कोण जाणे? जशाला तसेंच परमेश्वर फळ देत आहे. आपल्या आजोबांच्या कृपाछत्राखालीं मी वाढलों आहे. त्यांनीं माझें पोटच्या पुत्राप्रमाणें प्रेमानें लालनपालन केलें आहे, मला वाढविलें आहे, मागील सर्व गोष्टी माझ्या डोळ्यापुढें मूर्तिमंत उभ्या आहेत. सर्व भोगलेल्या दुःखाचें, प्रत्येक क्षणोक्षणीं स्मरण होऊन अंतःकरण फुटून जात आहे; त्याचीं कारणें कोणचीं, त्याचे परिणाम काय झालें; या सर्व गोष्टींचा या म्हाताऱ्याला पूर्ण अनुभव आला आहे, मागील अनुभवावरून पुढील गोष्टी तर्कानें जाणून त्याचा

बंदोबस्त आधीं करावा लागत आहे; ह्मणून श्रीमंतांच्या मर्जीविरूद्ध कांहीं गोष्टी होत असतील, त्याची श्रीमंतांनीं क्षमा केली पाहिजे. या सर्व गोष्टीं जर मी पार विसरून जाईन, तर मात्र तसें होणार नाहीं. पण त्या गोष्टी आणि श्रीमंत नानासाहेब पेशव्यांनीं मजवर केलेले अनंत उपकार, हा म्हातारा नाना कधीं कधीं विसरणार नाहीं. मरणानंतर देखील या म्हाताऱ्याचीं हीं जीर्ण व निर्जीव हाडें तें उपकार आपोआप बोलून उठतील. तेव्हां नानासाहेबांच्या वंशाकरितां, पेशव्यांच्या गादीकरितां, आणि या महाराष्ट्रराज्याकरितां त्याच्या हिताची प्रत्येक गोष्ट करणें हें माझें कर्तव्यकर्म आहे. तें जर मीं केलें नाहीं तर मी माझ्या उपकारकर्त्यांचे उपकार विसरलों, त्यांच्या वंशजांशीं विश्वासघात केला, त्यांच्याशीं कृतघ्न झालों, महाराष्ट्रांशीं बेइमानी केली, आणि त्याचें अनहित केलें असें होईल. सरकारचें गादीचें आणि महाराष्ट्रराज्याचें जें हित ती माझी इच्छा, तो माझा धर्म, तो माझा स्वार्थ, तीच माझी तपश्चर्या, तेंच माझें जीवित पुरुषार्थ; सर्व कांहीं जगांतील जें कांहीं ऐहिक आणि पारलौकिक कृत्य असेल तें तें आहे. त्याच्याशीं या उतार वयांत जर हा नाना परांङ्मुख झाला, असें श्रीमंतांच्या नजरेस आलें, तर हा अधमाधम पातकी मृत्यूच्याच शिक्षेस योग्य आहे, मग त्याची उपेक्षा करूं नये!! आपल्या राष्ट्राशीं बेइमानी करणारा प्राणी जिवंत ठेवून करायचा काय? आज साठ वर्षांपर्यंत मीं हेंच केलें आहे, आणि आणखी जे कांहीं आयुष्याचे अवशेष दिवस राहिले असतील तितके दिवस तेंच करण्याची इच्छा आहे. राज्यशकटाचें अवजड जूं श्रीमंतांनीं घेतलें ह्मणजे मी मोकळा झालों.

माधव—मोकळें कसें होतां येईल?

नाना—बाकी कोणतीही गोष्ट श्रीमंतांच्या मर्जीविरुद्ध करण्याची माझी इच्छा नाहीं. अशी दुष्ट बुद्धि जर मला उत्पन्न झाली तर हें शीर या चरणीं ठेवलं आहे, हें लागलेंच श्रीमंतांनीं या जर्जर झालेल्या देहापासून वेगळें करावें, ह्मणजे या देहाची सार्थकता होईल. (पायावर डोकें ठेवतो). [डोळ्यांत आंसवें आणून] बाकी माझें काय आहे, व मला करायचें काय?

माधव—नको—तें नको. तें नको. त्यापासून आपल्याला अलग रा-

हिलें पाहिजे. अगदीं दूर—जाऊन राहिलें पाहिजे. [दुसऱ्या बाजूला जातो.]

नाना—(आपल्याशीं) श्रीमंतांना अजून माझ्या बोलण्याचा खरेपणा वाटत नाहीं, त्याला माझा नाईलाज आहे. माझें प्रारब्ध म्हणायचें, दुसरें काय? [रागानें] हरामखोरा, अधमाधमा, बलवंतरावा, तुझ्या एका दुष्ट कृतीमुळें हें सर्व झालें आहे. तुझ्या अपराधाबद्दल तुला झाली ही शिक्षा अगदीं कमी आहे. त्या बाजीरावानें, वडिलोपार्जित जिन्नस म्हणून जादूनें भरून तो ताईत श्रीमंतांकडे पाठविला, नानातऱ्हेचीं पत्रें, निरोप पाठविले, त्यामुळेंच श्रीमंतांच्या बुद्धिला भ्रंश झाला. तो ताईत जादूचा आहे असें मीं कितीही आतां जीव तोडून सांगितलें तरी श्रीमंतांना तें कधींही खरें वाटायचं नाहीं. असो प्राणांत होईपर्यंत श्रीमंत नानासाहेब पेशव्यांच्या वंशवृक्षाचें रक्षण करणं हें भानूच्या वंशांतील पुरुषाचें कर्तव्यकर्मच आहे. [जातो.]

प्रवेश तिसरा.

स्थळ—गणेशमहालांतील दुसरें दालन.

पात्रें—श्रीमंत माधवराव पेशवे हातांत पत्र घेऊन उभे आहेत तों बाबूराव फडके येतात.

बाबूराव—[आपल्याशीं] नानांनीं सांगितल्याप्रमाणें श्रीमंतांची वृत्ती, बाजीरावाशीं त्यांचा असलेला पत्रव्यवहार नानांला कळल्यापासून आणि त्यांनीं बलवंतरावाला कैदेंत टाकल्यापासून, अगदीं बदलून गेली आहे. त्यांचा तो पूर्वीचा आनंद, काम करण्याचा उत्साह, मनाचा मोकळेपणा यापैकीं आतां कांहींएक राहिलें नाहीं. जेव्हां पहावी तेव्हां स्वारी विचारांत गर्क असते. ' तूं त्याच्या बरोबरीचा आहेस, त्यांचा मित्र आहेस, तुझ्याशीं ते कदाचित् मोकळे मनानें बोलतील तेव्हां कसेंही करून, त्यांच्या मनांत काय आहे तें काढून घेण्याची व त्यांची वृत्ती ताळ्यावर आणण्याची खटपट कर; ' म्हणून नानांनीं मला सांगितलें आहे, पण मीं तरी येथें काय करावें? ते माझ्याशीं तरी कुठें नीट बोलतात. त्यामुळें मलाही अगदीं सुचेनासें झालें आहे. ते

पहा श्रीमंत त्या कागदाकडे पाहून हांसत आहेत, यावरून स्वारी जरा खुशींत आहे असें वाटतें, पहावी खटपट करून ? (पुढें होऊन हात जोडून)

माधव—(त्याच्याकडे पाहून) या, या, तुह्मी ! असे हात कां जोडतां ? कोण तुह्मी ? पेशव्यांच्या कुलांत जन्म घेतल्याचा जर तुह्मी अपराध केला असेल, तर तुमच्या हात जोडण्याचा येथें कांहीं उपयोग व्हावयाचा नाहीं; त्याबद्दल तुह्माला कडक शिक्षा झाल्याशिवाय कधीं राहणार नाहीं.

बाबूराव—मला श्रीमंतांनीं ओळखिलं नाहीं वाटतें ? मी या चरणाचा चाकर बाबूराव फडके !

माधव—काय ह्मणालात तुह्मी ? तें पुन्हां बोला पाहूं ?

बाबूराव—मी श्रीमंतांच्या चरणांचा चाकर बाबूराव फडके ! श्रीमंतांची या सेवकाला काय आज्ञा आहे ?

माधव—(तिरस्कारानें आणि संतापानें) 'श्रीमंतांची काय आज्ञा आहे, मी या चरणाचा सेवक आहे,' या असल्या थट्टेखोरपणाचा मला अत्यंत संताप येतो. ही सर्व लबाडी आहे; आणि ही लबाडी करायला तुह्माला कोणी शिकविली, किंवा तुह्माला हिचें बाळकडूच पाजलें आहे, अथवा तुह्मी सर्व त्या वृद्ध शिक्षकाच्या शाळेंत शिकून तयार होऊन त्याचे पट्टशिष्य झाला आहांत ? बोला, बोला; आणि जें बोलाल तें खरें बोला. कोणापुढें बोलतां याचा नीट विचार करा, आणि मग उत्तर द्या. जर खोटं बोललांत तर माझ्याशीं गांठ आहे; चाकर असाल तर ते मला डोळ्यापुढें नकोत. त्यांचा शब्दही ऐकायला नको. कारण जो सेवक असतो, त्याला धनी होण्याची इच्छा होते. तेव्हां धनी होणारे चाकर आणि चाकराचे चाकर होणारे धनी मला नकोत. नुसता बाबूराव असेल तर मात्र मला माधवाला पाहिजे. कारण तो माझा जिवलग मित्र. तेव्हां तुह्मी कोण आहांत तें बोला; आणि बोलतांना असें हात जोडूं नका.

बाबूराव—[आपल्याशीं] श्रीमंतांना आतां काय उत्तर द्यावें !

माधव—बोलता कीं नाहीं ?

बाबूराव—श्रीमंत मला जो करतील तो मी होईन.

माधव—असें काय ? तर मग तुह्मी माझे जिवलग स्नेही बाबूरावच व्हा! [जवळ जाऊन त्याचा हात धरतो] अहाहा, खऱ्या जिवलग स्नेहाची योग्यता, जिवलग स्नेही झाल्याशिवाय कळत नाहीं. जन्म देऊन, लालनपालन करून, मोठेपणाला आणून आपल्याप्रमाणें करून सोडणारे आईबाप जरी या जगांत सर्वांहून पूज्य आहेत; नेहमीं मनाला आनंद देणाऱ्या, सुखदुःख समुद्रांतून जन्मभरपर्यंत हात धरून सहचरण करणाऱ्या स्त्रीसारखा जरी दुसरा आपला समदुःखी सुखी असा मित्र नाहीं, तरी जिवलग स्नेहाची योग्यता या सर्वांहूनही अधिक आहे. त्याच्या ठिकाणीं जगांतील सर्व चांगल्या वस्तुंची एकवट झाली आहे. जेथें आपल्याला अखंड आनंद, सुख, विश्रांती, वगैरे गोष्टी मिळतात, असें तें एक रमणीय स्थान आहे. तो निर्मळ प्रेमजलाचा सतत वाहणारा असा जिवंत झरा आहे. तो आपल्या जिवलग स्नेहाकरितां वाटेल तें करील, वाटेल तें देईल, आणि वाटेल तो होईल. जेणेंकरून आपल्या मित्राच्या मनाला आनंद होईल असें तो वाटेल तें बिनदिक्कत करील, कधीं काकूं करणार नाहीं. असें खरें कीं नाहीं ?

बाबूराव—खरें आहे !

माधव—ठीक. तुह्मी आतांच माझे जिवलग स्नेही झालांत, तेव्हां तुह्मी माझ्याकरितां वाटेल तें करायला तयार असलं पाहिजे.

बाबू०—हो, आपल्याकरितां वाटेल तें करायला मी तयार आहे !

माधव—अगदीं खरेंना पण हें ! नाहीं तर बदलाल मागून ?

बाबू०—कधीं बदलणार नाहीं.

माधव—तर मग आपण आपली अदलाबदल करूं ? तुह्मी माझी स्थिती घ्या, आणि मी तुमची घेतों; ह्मणजे तुह्मी मी व्हावें, आणि मी तुह्मी व्हावें, ह्मणजे माझी जागा तुह्मी घ्या आणि तुमची जागा मी घेतों. कां पतकरते तुह्माला ही गोष्ट ? कारण त्यांत मला मोठें सुख आहे.

बाबूराव—आपल्या सुखाकरितां, मी माझी सर्व दौलत हारवीन; माझ्या प्राणामुळें जर आपलें चांगलें होत आहे तर सरकार तोही देण्याला मी या क्षणीं तयार आहे, आपल्या करितां वाटेल तें मी करीन, त्यांत जर मी मागें

ह्मटलों तर मी तात्यासाहेबांच्या पोटीं आलोंच नाहीं. पण सरकारच्या जागेवर बसण्याचें दुष्ट कृत्य मात्र मी कधीं करणार नाहीं. ज्याचें जें स्थान तेंच त्याला योग्य! त्यानें दुसऱ्याच्या स्थानाची कधीं इच्छा धरूं नये. सरकारचें स्थान सरकारासच योग्य आहे. शिवाय तें ईश्वरदत्त असल्यामुळें त्याची अदलाबदल करण्यास मनुष्य असमर्थ आहे.

माधव—कायहो, तुह्मी माझे जिवलग स्नेही ह्मणून ह्मणतां, आणि तुमच्यानें मीं ही एवढीशी गोष्ट सांगितलेली करवत नाहीं. मग तुह्मी माझें स्नेही कसले? (विचार केल्यासारखें करून) बरोबर आहे, तुह्मी जें ह्मणतां तें अगदीं खरें आहे? कारण तुह्माला मीं अदलाबदल करायला जी सांगितली, तींत मीं तुमचें कोणचें हित पाहिलें. एक दुसऱ्याचा जिवलग स्नेही झाला ह्मणजे दोघेही परस्पर जिवलग स्नेही झाले. मग उभयतांनींही एकमेकांचें हित अनहित पाहिलें पाहिजे. तसें जर दोघांपैकीं एकानें केलें नाहीं, तर तो दुसऱ्याचा जिवलग स्नेही ह्मणवून घेण्याला योग्य नाहीं. तो स्वार्थी, मतलबी, आणि अप्पलपोट्या होय! तशी गोष्ट माझ्या हातून मुळींच झाली नाहीं. मी त्या गोष्टींत आपला स्वार्थ पाहिला. तुह्माला माझी स्थिती दिल्यानें, तुह्माला जर मुळीं दुःख नसेल तर तें दुःखरूपी वीष मी, मी, तुमच्या जिवलग स्नेहानें तुमच्या शरिरांत घातलें. जर तुह्माला दुःख थोडें असेल, तर तो दुःखरूपी विषाचा तुमचा घडा, मीं आपलें दुःख त्यांत घालून तो अगदीं कांठोकांठ भरून टाकला. मनाच्या असह्य तापानें मीं तुमच्या शरीराची अगदीं आग, आग, भडका करून दिली; तुह्मी स्वतंत्र असून तुह्माला बंदिवान केलें, जितकें ह्मणून चांगलें आणि आनंददायक तुमच्या जवळ होतें, तितकें सर्व तुमचें मीं आपल्या स्वार्थाकरितां हिरावून घेऊन, तितकेंच वाईट आणि दुःखदायक असें माझें सर्वस्व तुह्माला दिलें! ही सर्व ठकबाजी मी, मींच तुमच्या जिवलग मित्रानें प्रथम तुमच्याशीं केली. त्याबद्दल मला क्षमा करा! (रागानें दांत ओंठ खाऊन) अरे अधमा, ठका, माधवा, तुझ्या जिवलग स्नेहाशीं, तुझें असें आपस्वार्थीपणाचें वर्तन! तूं स्वतां, त्या सर्वांहून पूज्य अशा मित्रस्थानाची व त्या आनंददायक मैत्रीची अशी थट्टा आणि अशी वंचना करतोस? धिः-

कार, धिःकार असो तुला! हें सर्व कशाकरितां, तर स्वतांच्या स्वार्थाकरितां अः! अरेरे कोण हा नीच स्वार्थीपणा! या स्वार्थानेंच तर चहूंकडे अनर्थ आणि प्रळय करून दिला आहे. हा नीच स्वार्थीपणा मनुष्यमात्रांना अधोगतीला आणि नीचपणाला नेऊन पोंहचवितो, जगांत वर तोंड सुद्धां कोणाला काढूं देत नाहीं; असें पदोपदीं अनुभवास येत असूनही मनुष्य तो कुठें सोडतो आहे? दिवसेंदिवस मनुष्य त्याचीच कांस बळकट धरीत आहे. तो सोडल्याशिवाय मनुष्य मैत्रीला, विश्वासाला, कोणत्याही चांगल्या कामाला उपयोगी नाहीं. हें जग अशा मजसारख्याच स्वार्थी मनुष्यांनीं भरलें आहे काय? (बाबूरावाकडे पाहून) नाहीं, नाहीं आपल्या जिवलग स्नेहाकरितां वाटेल तें करायला तयार असणारे असें कांहीं पुण्यात्मेही आहेत, पण यांना मी माझे जिवलग स्नेही ह्मणून ठकविलें! आतां यांना मी आपलें हें तोंड कसें दाखवूं? निर्लज्जा, ठका, तुला त्यांना तोंड दाखविण्याला अद्याप शरम कशी वाटत नाहीं! बरोबर आहे, कोणतेंही नीच कृत्य करून, पुन्हां राजरोसपणें मान वर करून मिरवायला बेशरम मनुष्याला कधींच शरम वाटत नाहीं. धिःकार, धिःकार असो त्या स्वार्थीपणाला, त्या स्वार्थ्याला, आणि माझ्या ठकविद्येला. अधमा, बेशरमा, माधवा, निघ, निघ, येथून, आपलें काळें कर. (रागानें निघून जातो.)

बाबूराव—(आपल्याशीं) असेंच आतांशा चाललें आहे. कांहीं तरी करतात, कांहीं तरी बोलतात, मध्येंच रागावतात. अशी ही श्रीमंतांची भ्रमिष्ट स्थिती झाली आहे. ती इतकी थोडक्या दिवसांत झाली, त्यावरून बाजीरावांकडून आलेल्या ताईतासंबंधानें नानासाहेबांचें ह्मणणें अगदीं खरें वाटूं लागतें. त्याशिवाय अशी स्थिती इतक्या लवकर होण्याचें संभवत नाहीं. परमेश्वरा आमच्या श्रीमंतांची प्रकृती लवकर ताळ्यावर आण? जसजशी श्रीमंतांची प्रकृती बिघडत चालली, तसतशी नानांचीही प्रकृती काळजीनें शुष्क होत चालली आहे. त्यांना आतां श्रीमंतांच्या प्रकृतीशिवाय दुसरें कांहींएक काम सूचत नाहीं. अशी जरी स्थिती आहे तरी झालेली हकीकत नानांच्या कानावर घातली पाहिजे, त्याशिवाय याला कांहींएक तोड निघणार नाहीं. (जातो.)

प्रवेश चवथा.

स्थळ—शनवारवाड्यांतील कचेरी.

पात्रें—मोरोपंत भावे आणि दाजीबा आपटे येतात.

मोरोपंत—दाजीबा, पाहिलेंतना बलवंतरावाचें कारस्थान, आणि त्याचा परिणाम?

दाजीबा—हो पाहिला! तो असें करील असें मला मुळींच वाटलें नव्हतें!

मोरोपंत—दाजीबा, खरें विचाराल तर मला त्याचा पूर्वींच थोडासा संशय आला होता. अहो, तो जेव्हां जेव्हां येथें येई, तेव्हां तेव्हां श्रीमंताशीं त्याच्या आपल्या चार चार घटका गोष्टी व्हावयाच्या! तेव्हां ह्मटलं कीं हें आहे काय? तेव्हां हें असं होतें बरें! आपला स्नेही होता, श्रीमंतांपाशीं त्याची पूर्वींपासून जाण्यायेण्याची वग होती, ह्मणून आपण त्याची फारशी चौकशी केली नाहीं. बाजीरावानें मध्यस्थी करण्याला मनुष्य फार उत्तम शोधून काढला. नाना देखील त्याचें कारस्थान पाहून अगदीं थक्क होऊन गेले.

दाजीबा—श्रीमंताना बाजीरावाकडून आलेलीं सर्व पत्रें नानांच्या हातीं लागलींना?

मोरोपंत—सगळीं कांहीं लागलीं नाहींत, पण कांहीं लागलीं!

दाजीबा—ज्या दिवशीं तीं पत्रें नानांच्या हातीं लागलीं, त्या दिवशीं नाना श्रीमंतांना बरेंच रागें भरले, आणि त्यामुळें श्रीमंतांच्या वृत्तींत त्या दिवसापासून फरक झाला, असें नाहीं कां तुह्माला वाटत?

मोरोपंत—नुसत्या रागें भरण्यानें असें मुळींच होणार नाहीं. बरें नाना रागें भरले ह्मणून काय झालें. श्रीमंतांना त्यांनीं लहानपणापासून पोटच्या पुत्रापेक्षां आणि आपल्या प्राणापेक्षांही जास्त काळजीनें वाढविलें आहे. तेव्हां त्यांना रागें भरण्याचा नानांना वयपरत्वें हक्कही आहे. हा सर्व बाजीरावाच्या जादूच्या ताईताचा परिणाम आहे. हें तुह्मी पक्कें लक्षांत ठेवा.

दाजीबा—श्रीमंतांनीं बलवंतरावाबद्दलही नानांना शिफारस केली होती, पण तीही त्यांनीं ऐकिली नाहीं, त्यामुळें श्रीमंतांना बराच राग आला, आणि ते नानाशीं अथवा दुसऱ्या कोणाशीही त्या दिवसापासन बोलेनासे झाले.

मोरो०—फितुरी मनुष्याबद्दल शिफारस करणेंच मुळीं बरोबर नाहीं.

दाजीबा—आतां बलवंतरावाला जन्मभर कैदच ह्मणायची! त्यांतून सुट-ण्याची कांहीं आतां आशा नाहीं.

मोरो०—छे, सुटण्याचें नांव काढूं नका! आपल्या कारस्थानाचा काय परिणाम झाला, हें बाजीरावाच्या नेहमीं डोळ्यासमोर असावें, आणि त्यानें पुन्हां असल्या भानगडींत पडूं नये, ह्मणून नानांनीं बलवंतरावाच्या हातापायांत मोठ्या वजनदार बिड्या ठोकून, त्याला पिंजऱ्यांत घालून शिवनेरी किल्ल्यावर ठेवलें आहे, त्याची स्थिती पाहून आपणाला आपल्या कामगिरीबद्दल सावध राहिलें पाहिजे. श्रीमंतांची पाठ मुळीं सोडता कामा नये. त्यांची अनिष्ट स्थिती झाली आहे, तेव्हां त्यांच्यावर सक्त देखरेख रात्रंदिवस ठेवली पाहिजे. ते, ते, पहा श्रीमंत, अगदीं लगबगीनें तिकडे जात आहेत. तेव्हां चला, आपणालाही त्यांच्या आसपास असलें पाहिजे.

दाजीबा—हो, हो, खरेंच चला. (दोघे जातात.)

प्रवेश ५ वा.

स्थळ—शनवारच्या वाड्यांतील मधला दिवाणखाना.

पात्रें—हरतालकेच्या पुजेचा थाट केला आहे. श्रीमंत सौभाग्यवती यशोदाबाईसाहेब हातात फुलें घेऊन डोळे मिटून हरतालकेची स्तुती करीत उभ्या आहेत, जवळ शागीर्द उभा आहे, आणि भटजी पूजा सांगत आहे.

यशोदा—(आपल्याशीं) हे माते हरतालके, तूं जशी आपल्या पतीस शंकराच्या वरप्रदानानें प्रिय झालीस, आणि अखंड सौभाग्यसुख भोगलेंस, त्याचप्रमाणें मलाही आपल्या पतीस प्रिय होऊं दे. हे देवी भवानी माते, तूं जशी शिवाची पूजा करून त्यांना प्रिय होऊन त्यांची अर्धांगी होऊन बसलीस, त्याचप्रमाणें मलाही आपल्या पतीची अर्धांगी होऊं दे. हे महालक्ष्मी, आई जगदंबे, तूं जशी आपल्या पतीला प्रिय होऊन, त्यांची चरणसेवा सतत

करीत बसली आहेस, त्याचप्रमाणें मलाही माझ्या पतीच्या चरणाची सेवा अखंड मिळूं दे आणि मला हे चरण जन्मोजन्मीं मिळूं दे.

(फुलें वाहते व नमस्कार करते, इतक्यांत माधवराव पेशवे धोतराचे सोंगे सुटले आहेत, अंगावरचा शेला मागें लोळत आहे, असा एकदम येऊन उभा राहतो.)

शागिर्द—भटजी, उठा, बाईसाहेब एकीकडे व्हा, ती पहा सरकार स्वारी इकडेच येत आहे. ही पहा आलीच.

यशोदा—खरेंच ! पण हें असें काय तें. (सर्वजण निघून जातात.)

माधव—(हरतालकेकडे पाहून आपल्याशीं) हें काय हें ! (देवीवरची फुलें एका बाजूला करून) ही हरतालका आहे ! जी आतां पूजा करीत होती, जिनें बहुमोल वस्त्राभरणें धारण केलीं होतीं, जी आतां विजेप्रमाणें चमकत निघून गेली ती कोण ? ती माझी यशोदा, कां ही हरतालका देवी तिच्या रूपानें मूर्तिमंत होऊन गेली ? नाहीं, ती यशोदाच ! पण ती येथें काय करीत होती? डोळे मिटून हात जोडून हिच्यापाशीं काय मागत होती? सर्व स्त्रिया हरतालका देवीची पूजा करून आपल्या पतीचें अभिष्ट चिंतन करतात, आणि या जन्मीं जसे मला शंकरासारखे पती मिळाले आहेत, तसे पती जन्मोजन्म मिळावे ह्मणून तिच्याजवळ आणि शंकराजवळ वर मागतात, तसेंच माझी यशोदा करीत असली पाहिजे. पण यशोदे, तूं एका गोष्टींत अगदीं चुकत आहेस ! वर मागण्यांत तूं निव्वळ वेडेपणा करीत आहेस. देवापाशीं वर मागतांना नीट विचार करावा, नाहींतर भलतेंच होतें. माझ्यासारखा अभागी पती जन्मोजन्म मागण्यांत तूं आपल्या हातानं आपल्यावर दुःखाचे डोंगर कोसळून घेत आहेस. त्याच्याखालीं तूं दडपून जाशील. तुला सुखाचा वारा एक क्षणभर देखील लागणार नाहीं. जर कांहीं तुला सुख लागलं तर तें मग मृत्यूच्याच वरीं ! या जन्मांत आणि या जगांत जोंपर्यंत तूं माधवराव पेशव्याची स्त्री आहेस, तोंपर्यंत त्याची तुला आशा नको. तुलाच काय पण माधवराव पेशव्याचे जितके ह्मणून आप्त, इष्ट, मित्र सध्यां जिवंत आहेत, तितके सर्व दुःखाच्या तापानें होरपळूनच निघणार ! कोणाला नजर

कैदेंत राहावें लागेल, कोणाला किल्ल्याच्या अंधारकोठडींत आपला सारा जन्म घालवावा लागेल, कोणाच्या हातापायांत मोठमोठ्या वजनदार बिड्या पडतील, कोणाच्या पाठीवर कोरडे ओढले जातील, असं कोणाला कांहींना कांहीं तरी दुःख भोगलंच पाहिजे. त्यांना दुःखमुक्त करण्याचें माझ्या अंगीं यत्किंचित् सुद्धां सामर्थ्य नाहीं. जितके मरतील तितके मात्र दुःखापासून मुक्त! बाकीच्यांनीं दुःखांत राहून सडून सडून मेलंच पाहिजे. माझी आई लहानपणीं वारली ह्मणून फार चांगलं झालं, नाहींतर तिच्या प्रेमळ अंतःकरणावर तिच्या पुत्राची तिला खरी स्थिती कळल्यावर, दुःखाचे घाव इतके पडले असते कीं, त्यामुळें त्या अंतःकरणाचे तिळा तिळा एवढे तुकडे झाले असते. माझी रमा लवकरच यमसदनीं गेली, हें किती चांगलं झालं, नाहीं तर तिचं हृदय तिच्या पतीची स्थिती पाहून शतशः विदीर्ण झालं असतं. आई, बाबा, आजोबा, रमे, तुह्मी सर्वजण खरोखर भाग्यवान! मी आणि माझे आप्त, मित्र, जे मागें राहिले आहेत ते मात्र खरे खरे अभागी आहेत. मला आई नाहीं, बाप नाहीं, आप्त, मित्र, वगैरे मला कांहीं एक गणगोत नाहीं; तेव्हां माझ्या सारखा पोरका आणि अभागी पती तूं पुढील जन्मीं तरी मागूं नकोस? एका जन्मांतच तुला जें माझ्यामुळें दुःख भोगावं लागेल तितकं बस्स आहे. यशोदे, मी मात्र रमेसारखी आणि तुझ्यासारखी मैत्रिण मला जन्मोजन्म मिळावी ह्मणून देवाची रात्रंदिवस प्रार्थना करीन. कारण मला स्वतांला सुख पाहिजे; मी मात्र सर्वांना दुःख देणार. असा हा माझा आपस्वार्थीपणा आहे. जगांत असाच चहूंकडे आपस्वार्थीपणा माजला आहे. आपलं झालं ह्मणजे झालं! दुसऱ्याच्या सुखदुःखाची कोण पर्वा करतो. यशोदे, माझा मतलब मीं पाहिला, तुझा तूं पहा. पण हा मतलबीपणा तुला कळला नाहींना? तूं यापैकीं कांहीं ऐकलं नाहींसना? ऐकलं असशील तर सर्व विसरून जा. अथवा तूं एकदम बहिरी, आंधळी, आणि मुकी अशी हो. ह्मणजे तुला तुझ्या पतीची स्थिती ऐकतां येणार नाहीं, पहातां येणार नाहीं, आणि तिच्या बद्दल होत असलेलं दुःख तुला लोकापाशीं सांगतांही पण येणार नाहीं. याशिवाय तुझं दुःख कमी करून घेण्याला तुला दुसरा उपाय नाहीं! नाहींतर

तुझ्या कपाळीं अखेर दुःखच आहे. देवींनो, जिनं तुमची एवढी मनोभावानं पूजा केली, तिचं तुह्मी तरी कल्याण करा! छे, तुह्मी मातीच्या देवी! तुमच्यांत देवपण कुठें आहे? तुह्मी करतां कपाळ आपलें! देवांत देवपण नाहीं, मनुष्यांत मनुष्यपण नाहीं, सर्वत्र महा—(देवी उचलून टाकून निघून जातो)

प्रवेश ६ वा.

स्थळ—गणपतीमहाल.

पात्रें—गणपती बसवून, हांड्या, झुंबरें लावून मोठा थाट केला आहे, पुजारी पूजा करीत आहेत; दोन्ही बाजूनीं मंडळी उभी राहून मोठ्यानें गणपतीचा स्तव करीत आहेत, असा पडदा उघडतो.

सर्व मंडळी—(सुस्वर गळ्यावर मंडळी पदें ह्मणतात, इतक्यांत श्रीमंत सवाई माधवराव पेशवे जरीकांठी पितांबर नेसून, अंगावर जरीकांठी शालजोडी घेऊन, हातांत चांदीचा पेला, पळी घेऊन येतात आणि गणपतीसमोर त्याच्याकडे पहात राहतात; मंडळी ते आले असें पाहून स्तब्ध होतात.)

माधव—(सचिंत मुद्रेनें) पेशव्यांच्या कुलांत ज्या पुरुषांनीं जन्म घेतला, त्यांनीं या त्यांच्या उपास्य देवतेचं निरंतर भजन, पूजन व अर्चन करणं आणि आपल्या प्रजेचं यथान्याय प्रतिपालन करणं, हेंच त्याचं मुख्य कर्तव्यकर्म आहे. माझ्या वडिलांनीं, माझ्या चुलत्यांनीं, माझ्या आजा, पणजांनीं हें आपलं कर्तव्यकर्म पूर्णपणें लक्षांत वागविलं, आणि त्याप्रमाणें त्यांनीं आपलं वर्तन सदोदित ठेवलं; ह्मणूनच त्यांना त्यांच्या शत्रूंना पादाक्रांत करून, आपला आणि मराठीराज्याचा प्रभाव सर्व जगाला दाखविता आला; आणि ह्मणूनच सर्व जग त्यांचे गुणानुवाद अद्याप गात आहे. पण मीं माधवानं त्यांच्या उत्तम कुलांत जन्मून या गोष्टींपैकीं कोणच्या गोष्टी केल्या? कधीं मीं स्वस्थ अंतःकरणानं या माझ्या उपास्य देवतेची या हातानं पूजा केली आहे, कीं एकाग्र चित्तानं या सुंदर मूर्तीचें ध्यान करून ती माझ्या हृदयांत सांठवून ठेवून, तो ब्रह्मानंद कधीं अनुभवला आहे? किंवा या भक्तवत्सल, विघ्नेशाचं

मनापासून कधीं भजन केलें आहे? कधीं नाहीं. अहाहा, ज्यांनीं हा आजचा पूजेचा थाट केला, व जे त्याचे गुणानुवाद गात आहेत, ते खरोखर धन्य आहेत! कोणीरे हा पूजेचा थाट केला?

मोरोपंत—(पुढें होऊन) श्रीमंतांना गणपतीच्या उत्सवांत अशा देवाच्या पूजा बांधलेल्या आवडतात, ह्मणून उत्सवास सुरुवात झाल्यापासून रोज निरनिराळ्या प्रकारची पूजा बांधावी ह्मणून नानांची आज्ञा झाल्यावरून ही आज केवड्याची पूजा त्यांच्या आज्ञेनं बांधली आहे.

माधव—(कपाळाला आठ्या घालून) हं: असें काय? ही देवापुढें काढलेली सांजी कोणी काढिली? काम फारच सुबक केलं आहे! यांत काढणाराची चतुराई दिसते.

मोरोपंत—लांब, लांबचे सांजी, रांगोळ्या व चित्रें काढणारे लोक यांची इच्छा आपलं कसब येथें दाखवावं, व ते पाहून श्रीमंतांनीं त्यांच्या कसबाची चीज करावी, ह्मणून नानांच्या हुकूमानं त्यापैकीं रोज एक नामांकित कारागिर आपलं कसब दाखवीत असतो.

माधव—(आपल्याशीं) त्यांच्या कारागिरीचं चीज करण्याचं माझ्या अंगीं सामर्थ्य कुठं आहे! (उघड) ही भिंतीवरचीं चित्रें, ही आरास वगैरे कोणी केली?

मोरोपंत—श्रीविघ्नांतक गणपती, श्रीमंतांचं आराध्य दैवत, त्याच्या कृपेमुळें, आणि श्रीमंतांच्या चरण प्रतापामुळें महाराष्ट्रराज्यावर आलेलें मोठें विघ्न टळलें, निजामाची चांगली खोड मोडली, आणि पूर्वीप्रमाणें सर्व यथास्थित झालं, ह्मणून सर्व उत्सव मोठ्या थाटानें करावें, अशी नानांची एकसाहाआज्ञा झाल्यावरून हें त्यांच्या आज्ञेप्रमाणें केलें आहे. श्रीमंतांची आज्ञा कोण मोडील?

माधव—(संतापून आपल्याशीं) आग लागो त्या श्रीमंतांच्या चरणाला आणि त्यांच्या प्रतापाला! निजामाची खोड कोणी मी—मी—श्रीमंत माधवराव पेशव्यानें आणि माझ्या चरण प्रतापानें मोडली! बंदुकीच्या व तोफेच्या गोळ्याची पाऊसाच्या धारेसारखी वृष्टी होत आहे, ढालीवर ढाली, तर-

वारीवर तरवारी एकसारख्या खणखण आपटत आहेत. तरवारींच्या झटक्या-बरोबर हजारों मराठे, ब्राह्मण व मुसलमान वीरांचीं शिरें सपासप उडत आहेत, भाले, बरच्या, यांनीं झालेल्या जखमांतून सर्वांच्या अंगांतून रक्ताचे प्रवाह वाहत आहेत, एकमेकांच्या नरडीचा घोट केव्हां घेऊं, असें ह्मणत, विजयश्रीचे दोघा वीरांनीं दोन हात धरून जो तो तिला आपल्याकडे ओढीत असतां, रणावेश चढल्यामुळें ज्यांना आपल्या देहाचें व प्राणाचे भान राहिलें नाहीं, आणि ज्यांनीं तिला संतुष्ट करण्याकरितां आपले देह खरोखर अर्पण केले; त्याच माझ्या शूर व बहादूर, ब्राह्मण आणि मराठे वीरांनीं मोंगलांची खोड मोडली. मीं मुळींच मोडली नाहीं. कारण मी तर त्या वेळेला लढाई-च्या जागेपासून सुमारें दोन तीन कोस मागें असून, एखाद्या पडद्यांतल्या बायकोप्रमाणें किनखाफी तंबूंत उंच आणि मऊ गादीवर लोळत पडलो होतों; आणि माझी ही तरवार माझ्याप्रमाणेंच खुशाल म्यानांत झोंप घेत पडली होती. असें असून हे सर्वजण माझा चरणप्रताप आणि श्रीमंतांची पुण्याई ह्मणतात. हेंच आश्चर्य आहे! केवढा यांचा हा मूर्खपणा! हें असें ज्या अर्थीं नेहमीं ह्मणतात, त्याअर्थीं ते माझी थट्टाच करतात! हो थट्टाच नाहींतर काय? माझ्या अंगीं जर खरोखर तसं शौर्य आणि पराक्रम असतां, तर माझा स्नेही बाबूराव फडके कच खाऊन मागें आला असतांना त्याच्या मदतीला मी ताबडतोब गेलों नसतों काय? माझा शूरमणी गोपाळराव पटवर्धन मृत्यूमुखी पडला असतां, त्याच्याकरितां मी धांवत जाऊन त्याला मृत्यूच्या जबड्यांतून ओढून काढला नसतां काय? माझे शूर योद्धे माझ्याकरितां आणि माझ्या नांवाकरितां शत्रूवर चढाई करून गेले असतां, मीं त्यांच्या आघाडीवर प्रथम भरधांव घोडा टाकीत गेलों नसतों काय? असा बायकासारखा तंबूंत लपून माशा मारीत बसलों असतों! कधीं, कधीं, स्वस्थ बसलों नसतों. मीं जर माझ्या लोकांचा मालक, माझ्या मित्रांचा मित्र, आणि माझ्या आप्तांचा आप्त आहे, तर माझ्या लोकांकरितां मला त्यांच्यापुढें व्हावयाला पाहिजे होतें. माझ्या मित्रांना पाठीशीं घालायला पाहिजे होतें, आमचे आप्त, बाबासाहेब, आप्पासाहेब, व मित्र नागनाथ यांचा प्रतिबंध, त्रास आणि दुःख तात्काळ

नाहींसें केलं पाहिजे होतं. पण मतिमंदा माधवा, तूं यापैकीं एक, एक तरी गोष्ट करायची होतीस? पेशव्यांच्या कुलांत जन्मून, त्यांतील पराक्रमी पुरुषाचं नांव घेऊन त्यांच्या नांवाची मात्र तूं थट्टा केलीस ? स्वार्थ नाहीं, परमार्थ नाहीं आणि पुरुषार्थही नाहीं, यापैकीं एकही न साधणारा मनुष्य जन्मून व्यर्थ, व्यर्थ ! देवा—(हात जोडतो.)

पूजारी—हें तीर्थ आहे ! (देवाचें तीर्थ त्याच्या हातावर घालतो.)

(इतक्यांत दाजीबा येतात.)

दाजीबा—सर्व तयारी होऊन, नाना पाटावर येऊन बसले आहेत, तेव्हां श्रीमंतांनीं भोजनास चलावें.

माधव—(तीर्थ हातांत घेऊन) हा असा निरुपयोगी प्राणी जन्मास तरी कशाला घातलास ? ज्याच्या हातून कांहीं तरी पुरुषार्थ होतो, ज्याचा कांहीं तरी उपयोग आहे, तोच खरोखर धन्य ! तोच खरोखर पुण्यवान ! तोच खरोखर श्रीमंत, आणि त्याचाच प्रताप. खरोखर सर्व माझे वाडवडील तसे होते, पण मीं तसा नाहीं. मी महापातकी आहे; तेव्हां असा पातकी आपलें दर्शन घेण्यास सुद्धां योग्य नाहीं. माझ्या दर्शनानें, माझ्या सहवासानें आणि स्पर्शानें चांगल्या वस्तु असतील त्या वाईट होतील; उपयोगी त्या निरुपयोगी ठरतील; पुण्यकारक त्या पापी होतील; याकरितां या आपल्या पुण्यकारक चरणतीर्थाला माझा पातक्याचा स्पर्श नको; पुण्यकारक सर्व वस्तूंना माझा हा असा लांबूनच नमस्कार पुरें आहे ! (तीर्थ टाकून देऊन निघून जातो.)

प्रवेश सातवा.

स्थळ—शनवारच्या वाड्यांतील श्रीमंतांची भोजनाची जागा.

पात्रें—श्रीमंत माधवराव पेशवे, नाना फडणवीस, मोरोपंत भाले, दाजीबा आपटे, अवांतर मंडळी पानावर बसली आहे. माधवराव सचिंत आहेत.

नाना—(ओळंबून) श्रीमंतांनीं बसावें.

माधव—[उघड] हो. [आपल्याशीं] न बसून चालतें कुठें ? [जेवायला बसतो, पण अन्न चिवडतो.]

नाना—[हलकेच] श्रीमंतांना काय पाहिजे ?

माधव—कोणाला मला ! मला कांहींएक नको. [आपल्याशीं] मला जें पाहिजे तें कुठें मला मिळतें आहे.

नाना—आतांशा श्रीमंतांनीं अशी वृत्ती कां धरली? श्रीमंतांस काय होत आहे, तें कळलं ह्मणजे त्याला लवकर उपाय करता येईल. सांगितल्याशिवाय या श्रीमंताच्या चाकराला कळणार कसें ? श्रीमंतांच्या घरीं कांहीं कमी आहे कीं काय ? श्रीमंतांनीं पूर्वींप्रमाणें बोललें पाहिजे, चाललं पाहिजे, सर्व मन मोकळें करून सांगितलं पाहिजे.

माधव—[आपल्याशीं खेदानें] हंः ! [चमत्कारिक हांसून] बोलक्या चालक्या बाहुल्याला ही कळसूत्री बाहुल्याप्रमाणें जसा सूत्रधार बोलवील, चालवील, हात वारे करायला लावील; जें जें कांहीं करायला लावील तें तें केलंच पाहिजे. त्याच्या मनांत जरी नसलं तरी त्याला स्वतांच्या इच्छेप्रमाणें थोडेंच करतां येतं !

नाना—मोरोपंत, श्रीमंतास श्रीखंड आणि घीवर आणून वाढवा ?

मोरोपंत—[वाढप्यास] अरे आण लवकर !

[वाढपी श्रीखंड आणि घीवर आणून वाढूं लागतो.]

माधम—[हातानें] नको, नको !

नाना—थोडं, थोडं, घ्यावं ! थोडं घेतलं पाहिजे. वाढरे !

माधव—[अन्न चिवडून त्याच्याकडे पहात रहातो] [आपल्याशीं] जठराग्नि चांगला प्रदीप्त झाला ह्मणजे मोठे लोक या सुग्रास पक्वान्नांनीं त्याची शांति करतात. रानावनांत हिंडणारे आणि दिवस उगवल्यापासून दिवस मावळेपर्यंत काबाडकष्ट करणारे लोक जाड्याभरड्या भाकरीनें, अथवा दुसऱ्या कशानेंही त्याची शांती करतात; त्याचप्रमाणें पशुपक्षी वगैरे जीवजंतूही आपापलें भक्ष्य मिळवून आपल्या जठराग्निची शांती करतात, पण त्याची सर्वांनीं आपापल्या प्रकारांनीं शांती केल्यावर सर्वांना होणारा आनंद मात्र एक-

खा, त्यांत मात्र कांहीं निराळा प्रकार नाहीं. जठराग्नि प्रदीप्त नसला ह्मणजे मग तें सुग्रास अन्न असलं तरी त्याचा कांहींएक उपयोग नाहीं. तें निव्वळ वीष होय ! तें वीष, तें निरुपयोगी अन्न पशु देखील मग खात नाहींत. त्यांच्यापुढें तें आलं तर ते तोंड मुरकतात; पण मी मनुष्य असून असलें अन्न रोज पशूप्रमाणें भराभर खाऊन चांगला पोळासारखा पोसलों आहे. माझे आप्त, मित्र कोणत्या संकटांत असतील, बाबासाहेब, आप्पासाहेब, त्यांचं कुटुंब, बलवंतराव नागनाथ वगैरे मंडळीला आठ प्रहरांतून एकदां तरी जठराग्निची शांती करण्याकरितां जाडें, भरडें, ओलं वाळलं, कसं तरी अन्न मिळालें आहे कीं नाहीं, याची मीं कधीं तरी चौकशी केली काय ? कधीं कधीं नाहीं ! रोज आपल्या उदराची मात्र भरती करीत आहे. पशु, पक्षी देखील आपल्या स्वजातीयांची कधीं कधीं काळजी करतात, पण मला मनुष्यरूपी पशूला आपल्या स्वकीयसंबंधाची कधीं सुद्धां काळजी वाटत नाहीं. (स्वस्थ वर पहात बसतात.)

नाना—श्रीमंत असें काय करतात ? त्यापैकीं थोडंसं खाल्लं पाहिजे. त्याशिवाय प्रकृतीला आराम कसा वाटेल.

माधव—(आपल्याशीं) हे माधवा, बैला, अप्पलपोट्या पशो, तूं त्या अज्ञान पशूपेक्षांही पशू आहेस; दुसऱ्याचं दुःख सुख कांहीं एक मनांत न आणतां, निष्काळजीपणानं तूं आपलं मात्र शरीर पोळासारखं पुष्ट दिवसेंदिवस बनवीत आहेस ! आणि हे सर्वजण तुला चांगलं खाऊ पिऊं घालून, तूं चांगला धष्ट पुष्ट आणि माजलेला पोळ व्हावेंस, व जगापुढें तुझं चांगलं प्रदर्शन करावं आणि आपल्या देखरेखीखालीं हा बैलोबा चांगला माजला, एवढ्याबद्दल आनंद मानावा ह्मणून आग्रह कर करून व तुला चांगलें चांगलें खायला घालून माजवीत आहेत; हें शंखशिरोमणे तुला कसें कळत नाहीं ? अरे ठकानों तुमचें सर्व कारस्थान माझ्या पूर्णपणें ध्यानांत आलें आहे ! पाहूं बरें तुह्मी मला कसें माजवितां तें ! या बाबतींत मी तुमचें कधीं चालूं देणार नाहीं ! एवढें करणें माझ्या स्वाधीनचें आहे. असें केलें ह्मणजे मग तुह्मी काय कराल ? बैला, माधवा, उठ, पळ विचार काय करतोस ! पत्राला ना-

हीस कीं यांनीं तुझ्या नाकांत वेसण घातलीच असें समज. (एकदम पानावरून उठून जातो.)

नाना—काय करावें ! जेवणाची ही स्थिती ! प्रकृती बेताल झाली, फारच बिघडली असें वाटतें ! त्यांना अन्न नको, मग नानाला तरी तें गोड कोठून वाटणार ! नको. (सर्वजण उठून जातात.)

अंक चवथा समाप्त.

अंक पांचवा.

प्रवेश पहिला.

स्थळ—पुण्याजवळ मुळामुठानदीच्या कांठीं एका झाडाखालीं.

पात्रें—सत्यभामाबाई मुलाला घेऊन येते.

सत्यभामा—(आपल्याशीं) माझी परीक्षा पहाण्याकरितांच परमेश्वरानं हा मजवर प्रसंग आणला ह्मणायचा ! तेव्हां आतां त्याला भिऊन काय उपयोग ! कांहीं दिवसापूर्वीं मी साधारण एका सरदाराची स्त्री होतें आणि आतां एका फितुरी व बंदीवानाची स्त्री झाले आणि रानोमाळ फिरायला लागलें. सर्व संपत्ति, वैभव आणि आमचं पुढील मनोराज्य दूपारच्या सावलीप्रमाणं नाहींसं होऊन दुर्दैवाच्या फेऱ्यांत आह्मीं आतां पुरें सांपडलों आहोंत. त्यांच्या बरोबर आह्मी सरदारीणपणा व वैभव भोगण्यास जर तयार होतों, तर आतां त्यांच्याबरोबर आह्माला वाटेल तें दुःख भोगायला, आणि वाटेल तें त्यांच्याकरितां करायला तयार झालंच पाहिजे. तें जर आमच्या हातून होणार नाहीं तर आह्मीं आमच्या पतीच्या सहचरणी कसल्या ! त्यांच्यावर प्रसंग आला असतां, त्यांच्याशीं प्रेमानं वागण्यांत, त्याचं दुःख त्यांना न होऊं देण्यांत, आणि त्यांना अशा प्रसंगीं धीर देण्यांत आह्मां स्त्रियांना जें खरोखर भूषण आहे, तें लक्षावधी रुपयांचें हिऱ्यामोत्यांचे दागिने घालून मिरविण्यांत मुळींच नाहीं. शिवनेरीहून पुण्यापर्यंत येत असतांना या तीन दिवसांत चालून, पायांत खडे, कांटे लागून जरी त्यांची अगदीं चाळण झाली आहे; वारंवार

ठेंचा लागून, बोटं फुटून जरी तीं रक्तबंबाळ झालीं आहेत; भुकेनं जरी माझे प्राण कासाविस होत आहेत; तरी आपल्याला बंदीखान्यांत होत असलेल्या यमयातनापुढें मला त्याचं काडीभर सुद्धां दुःख वाटत नाहीं. आपल्यापेक्षां आणि या सोनकुल्यापेक्षां मला माझा जीव मुळींच जास्त वाटत नाहीं. आपण दोघे सुरक्षीत असला ह्मणजे झालं. आपल्याकडे पाहून मी आपले कसेही दिवस लोटीन. माझी धनदौलत, माझा मोठेपणा, माझं माहेर, माझं गणगोत, माझं सुख, सर्व कांहीं आपण आहांत. त्याशिवाय सर्व व्यर्थ. भुकेनं आणि तान्हेनं कळवळून रडून रडून दमून बाळाला आतां झोंप लागली. (मुलाकडे पाहून) नीज बरं स्वस्थ नीज. जेवढी वेळ तुला गाढ झोंप लागेल तेवढी वेळ तरी तुला भुकेपासून त्रास होणार नाहीं. बाळा, या रानावनांत कांहींरे मिळत नाहीं. आतां गांवांत गेलें ह्मणजे तुझ्याकरितां कोणातरी पुण्यवानाची पायधरणी करीन. कोणी तरी या पुण्यांत पुण्यवान प्राणी भेटेल. सर्वत्र कांहीं नानासारखे पाषाणहृदयीं, निष्ठुर नसतील. गांवांत जाऊन तुझ्याकरितां अन्न अगर दुध मिळेपर्यंत माझ्या अंगाच्या मांसाच्या तुकड्यावर जर तुझी भूक भागत असेल, तर बाळा वाटेल तेथला प्रत्यक्ष काळजाचा देखील तुकडा काढून देण्याला ही तुझी आई मागें घेणार नाहीं. पण बाळा तसं कुठेरे होतं आहे. भुकेनं कळवळून गेल्यामुळें तूं किंकाळी मारलीस, कीं माझीं आंतडी तटातट तुटतात. माझा अगदीं निरुपाय होईपर्यंत आणि प्राणांतापर्यंत यत्न करण्यास मागें घेणार नाहीं. पुढं तुझा वाली परमेश्वर ! प्रतीकूल दैवाचा वारा एकदां उलट वाहूं लागला ह्मणजे सगळं उलटं होतं. हातांतला अधिकार गेला ह्मणजे मग कोण कोणाला विचारतो. फडणवीसाजवळ लबाड लोकांनीं चहाडी सांगितल्यामुळें, तिकडच्यावर हा असा प्रसंग आला; जे नाना तिकडे ह्मणजे अगदीं देव असें वाटत होते, त्याच नानांनीं ही मांगाची करणी केली. पुण्यास जाईन, त्यांची भेट घेईन, एवढी जबर शिक्षा दिली असा कोणचा आमच्या हातून अपराध घडला तें विचारीन; अन्यायाबद्दल प्रथम त्यांच्याजवळ, मग यजमानाजवळ, मग सगळ्या जगाजवळ आणि नंतर परमेश्वराजवळ दाद मागेन; तेव्हां राहीन. पुतण्याचं आणि चुलत्याचं, अगर आप्ताआप्तांचं

सख्य करून दिल्याबद्दल नानाचं निष्ठुरपण किती आहे, आणि त्यांचें अंतःकरण दगडापेक्षां किती कठीण आहे, हें निदान साऱ्या जगाला दाखवीन तेव्हांच ही सत्यभामा राहील. चल जिवा, उठ. हलके हलके अंधार पडेपर्यंत पुणें गांठलं पाहिजे. (ती जाते.)

प्रवेश दुसरा.

स्थळ—शनवारच्या वाड्यांतील श्रीमंतांचा महाल.

पात्रें—श्रीमंत सवाई माधवराव पेशवे बसले आहेत.

माधव—[आपल्याशीं] तापवून लाल केलेल्या डागण्यांनीं भाजलं असतां, तें भाजल्याचं दुःख कमी व्हावं ह्मणून पोटांत मोठमोठ्या दिव्य मात्रा, अथवा उत्तम रसायनं दिल्यानं जितका उपयोग होणार, तितकाच काळजाला घरे पाडणाऱ्या वाक्शल्यांनीं अंतःकरणाला केलेल्या जखमा भरून याव्या ह्मणून त्यावर रोज औषधोपचार केल्याचा उपयोग ! वात, कफ, पित्त यांच्या दोषामुळें बिघडलेली प्रकृती, वरच्या औषधांनीं वैद्य ताळ्यावर आणील; पण मानसिक दुःखानं बिघडलेली प्रकृती प्रत्यक्ष धन्वंतरी खालीं आला, आणि त्यानं द्रोणागिरी पर्वतावरील संजीवनी वल्लीचा रस काढून जरी औषध दिलं, तरी ती ताळ्यावर येणार नाहीं. बाबासाहेबांची, आप्पासाहेबांची, त्यांच्या कुटुंबाची, आणि माझ्या आप्तस्वकीयांची व माझी लवकरच भेट होईल, त्यांच्या सहवासांत मी आनंदानं काळ काढीन, त्यांना जवळ करीन, त्यांना देणग्या देईन, जे जे माझ्या उपयोगी पडले त्यांचं कल्याण करीन; माझ्या पणजाबरोबर आप्पांनीं जशी मुतालकी केली, माझ्या आजोबांची भाऊंनीं जशी दिवाणगिरी केली, त्याप्रमाणें मी आणि बाबासाहेब एकदिलानं चालून सर्व महाराष्ट्र प्रजेस सुख देऊं, आणि आमच्या वाडवडिलाप्रमाणें पराक्रम करून, श्रीछत्रपतीचा व पेशव्यांचा प्रभाव कसा आहे हें लवकरच दाखवूं; ह्मणून जी माझ्या मनांत मोठी आशा होती, ती आशा सर्वस्वी जिरल्यामुळें, व माझ्या मनांत माझ्या आप्तस्वकीयांच्या प्रेमाचा नुक्ताच उद्भवलेला कोंब जागच्या जागींच खुडून टाकल्यामुळें, आणि माझ्या वृद्ध सद्गुरुंनीं मला माझ्या

स्वरूपाची व अधिकाराची ओळख त्या दिवशीं करून दिल्यामुळें माझ्या मनाला झालेला ताप या वैद्याच्या औषधानं नाहींसा कसा होणार ? नाना ह्मणतात कीं, बाजीराव आणि आप्पासाहेब हे तुमचे आप्त आहेत असें तुह्मी विसरा; तीं सर्पाचीं पिलें आहेत असें माना; कारण माझे बाबा दादांच्यामुळें अकालीं मृत्यूमुखीं पडले. बाबासाहेब, आणि आप्पासाहेब जर सर्प तर मग मी कोण? मी देखील सर्पच ह्मणायचा! बरोबर आहे. ह्मणूनच हे वृद्ध आजोबा, आपण गारुडी बनून आह्माला पेटाऱ्यांत घालून, चांगलं खाऊ पिऊं घालून, आमचा हवा तसा तमाशा जगाला दाखवीत आहेत. पण हे गारुड्या, तुझा तमाशा श्रीमंत सवाईमाधवराव पेशव्याला नको आहे. ते तुझी पुंगी तेव्हांच बंद करतील. (इतक्यांत वैद्यबोवा हातांत औषधाची वाटी घेऊन मोरोपंत भावे आणि कोंडाजीसह येतात.)

कोंडाजी—मोरोपंत, सरकारस्वारी सवस्थ बसली हाय, ह्मोरो होऊनशानी इनंती करा.

मोरोपंत—(पुढें होऊन व हात जोडून) नानांनीं जे तैलंगणांतून अतिउत्तम वैद्य आणले आहेत, व ज्यांनीं काल श्रीमंतांची प्रकृती पाहिली, त्यांनीं श्रीमंतांच्या प्रकृतीचें निदान ठरवून त्यावर हें औषध तयार करून आणलं आहे, हें श्रीमंतांनीं घ्यावं असं नानांनीं सांगितलं आहे.

वैद्य—हे दिव्यौषधीपासून श्रीमंताचे प्रकृतीस आराम वाटेल, असें आह्मीं खात्रीनें सांगतो. यांत उत्तम औषधीचा रस काढून दिव्य मात्राही घातली आहे. आह्मी मोठमोठे रोगी बरा केला आहे. आमच्या औषधाचा श्रीमंतांनीं गुण पहावा.

माधव—(किंचित रागानें आणि तिरस्कारानें) ही त्या गारुड्याची खेळ करणारी मंडळी येऊं लागली आतां खेळ करायला! पण मी आहेना येथें त्यांचा वस्ताद! मी पंतप्रधान पेशवा या लुच्चा गारुड्याचे हवेतसें खेळ चालूं देईन? कधीं देणार नाहीं.

मोरोपंत—(वैद्याच्या हातांतील वाटी घेऊन ती पेशव्याच्यापुढें करतो) हें घ्यावं!

वैद्य—(मोरोपंतास) जरा बोटानं दवळून आणि पूर्व दिशेकडे तोंड करून देवाचें नांव घेऊन द्यावें.

माधव—(हातांतील वाटी हिसकून घेऊन रागानें) काय हा तुह्मी तमाशा मांडला आहे. कसलं औषध आहे. काय हो तुह्माला समजतं मला काय झालं आहे तें ! मला औषधाची जरूर नाहीं. (वाटी घेऊन फेंकून देतो) तें औषध फेंकून द्या, अगर तुह्माला वाटेल तर तुह्मी घ्या, अथवा वाटेल त्याला द्या. निघा येथून. माझ्या समोर उभे राहूं नका. (सर्व मंडळी स्तब्ध होतात.)

मोरोपंत—श्रीमंत—

माधव—अरे मूर्खानों, मी तुह्माला हुकूम करीत असतां, तुह्मी मठ्ठासारखे माझ्या समोर ह्मणजे पेशव्यासमोर उभे राहून बोलता. पेशव्याच्या एका चाकरानं त्यांच्या हुकूमाची पायमल्ली केली ह्मणून तुह्मी सर्वजण जर तसंच करूं लागलात, तर हाडेंच खिळखिळी होतील. साराच तुह्माला तमाशा वाटला नाहीं. हरामखोरानों तुह्मीच हा सर्व तमाशा मांडला आहे, चला येथून माझ्या डोळ्यापुढून चालते व्हा ! [त्यांना सगळ्यांना हाताला धरून घालवून देतो] आणि आपल्या वस्तादजीला तुमची कशी संभावना झाली तें जाऊन कळवा.

मोरोपंत—प्रकृती अगदीं बेताल झाली.

वैद्य—हे भ्राम, भ्राम झाले. चांगला औषध पाजला पाहिजे, तेव्हां श्रीमंताची प्रकृती बेतावर येईल.

कोंडाजी—असंच, जवा तवा खसावसा करून अंगावर येतात. चला, नानासाबासनी समदं जाऊन सांगूं चला. (सर्व जातात.)

माधव—(संतापानें) रोग एक प्रकारचा, आणि त्याला औषध दुसऱ्याच रोगावरचं ! कोण मूर्ख, गाढव, लोक हे ! रोग्याच्या प्रकृतीचं निदान जर वैद्याला प्रथम बरोबर कळतं, आणि त्याला त्यावर बरोबर औषध देतां येतं, तर कैक रोगी मृत्यूमुखांतून परत आले असते. रोगाची परीक्षा नीट न झाल्यामुळें, वैद्याला तारतम्य ज्ञान कमी असल्यामुळें आणि वैद्यानें भलत्याच रोगावर भलतेंच औषध दिल्यामुळें कैक बिचारे रोगी यमसदनाला अकालींच

गेले असतील. नमस्कार असो या असल्या यमराज सहोदर वैद्यराजांना! ह्मणें मी दिव्य औषधींचा रस काढून त्यांत मोठी जाज्वल मात्रा उगाळून हें औषध तयार केलं आहे. आधीं माझ्या प्रकृतीचं निदान कुठं या मूर्खाला कळलं! त्यांत त्यानं त्या मात्रेबरोबर 'नाना' नामाच्या मात्रेचें वेढे उगाळल्यामुळें तें औषध अगदीं निरुपयोगी झालं त्यानं माझ्या अंगाचा नुसता दाहादाहा करून सोडला. या औषधानं मला गुण कसा येणार! मानसिक रोग जर नाडीनें वैद्याला कळतां तर काय पाहिजे होतं? पण तो सृष्टिकर्त्या ब्रह्मदेवाला अथवा प्रत्यक्ष धन्वंतरीला देखील जर कळत नाहीं, तर या तारतम्यशून्य मूढ वैद्याला कसा समजणार! माझ्या रोगाची भावना निराळी, त्याचं औषधही निराळं. बाबासाहेबांचा, आप्पासाहेबांचा, बळवंतराव नागनाथाचा आणि माझ्या इतर आप्तांचा बंदीवास केव्हां नाहींसा होईल, मी त्यांस स्वतंत्रतेनें आपल्याजवळ केव्हां ठेवून घेईन, हा मला जडलेला रोग; बाबासाहेबाचं दर्शन, त्यांचा सहवास, त्यांची मैत्री या औषधाशिवाय कधींही जाणार नाहीं! हें औषध ज्याअर्थी सध्यां दुर्मिळ, त्याअर्थी माधवाला जडलेला रोगही असाध्यच! त्या वृद्ध गारुड्याचे ही सर्व खेळी मंडळी वाटेल तें सांगून कान भरते आणि त्याच्या विलक्षण खेळानें माझ्या मात्र अंगाचा संताप होतो. आतां मात्र मी त्या मंडळीचे खेळ कधीं चालूं देणार नाहीं, कोणी कांहीं जास्त कमी केले कीं लगावलेच कोरडे! ते वृद्ध आजोबा मला पुन्हां पुन्हां उपदेश करतात कीं, तुह्मी त्यांचे आप्त आहांत असें विसरा. तें कसं विसरावं? [दुसरीकडे पाहून] हे एक दुसरे त्या गारुड्याच्या तमाशापैकीं खेळे गडी आले त्यांनाच विचारतो. [इतक्यांत बाबूराव फडके येतात.]

बाबूराव—[पुढें होऊन हात जोडून]

माधवराव—[एकदम जाऊन त्याचे हात धरतो] काय हो, तुह्मी देखील त्या गारुड्याच्या मदतनीसांपैकीं एक आहांत, नाहीं कां?

बाबूराव—श्रीमंत, गारुडी कोण! मला कांहींएक माहीत नाहीं आणि मी कोणाचा मदतनीस नाहीं.

माधवराव—नाहीं कसें! आहांत. मला पक्कें माहीत आहे. तुह्माला त्या

तुमच्या वृद्ध वस्तादजींनं तुह्मी जे असाल ते नसण्याची आणि नसाल तें हो-ण्याची विद्या अद्याप शिकविली नाहीं?

बाबूराव—मला माझ्या वडिलांनीं तात्यासाहेबांनीं श्रीमंतांच्या गादीची सेवा एकनिष्ठपणें करण्याचं, आणि तेवढ्याकरितां, आपली धन दौलत, अखेरीस हें डोकें देखील वेळ प्रसंगीं आपल्या मालकाकरितां, आपल्या महाराष्ट्र राज्याकरितां, आणि महाराष्ट्र देशाकरितां देण्याचं शिकविलं आहे. त्याशिवाय मला कोणी कांहींएक शिकविलं नाहीं; आणि कोणी शिकविलं तरी मी शिकणार नाहीं.

माधवराव—तर मग तुह्मी तुमच्या वस्तादजींचे प्रिय व पट्ट चेलेच नाहीं. नाहींतर त्या वृद्ध सद्‌गुरुंनीं आपली मुख्य गुरुकिल्ली सांगून व ती मुख्य विद्या पढवून तुह्माला आपल्याप्रमाणेंच करून सोडलं असतं. बाकींची सर्व मंडळी मात्र आपल्या वस्तादजीच्या तोडीची झाली आहे. कोणी वैद्य बनतो, कोणी हुजऱ्या बनतो, कोणी कारकून बनतो, कोणी मंत्री बनतो, कोणी इमानदार जिवाला जीव देणारा आणि आज्ञाधारक चाकर बनतो, ज्याला जें वाटेल तें तो रूप घेऊन वस्तादजीच्या हुकूमाप्रमाणें आपल्या सोंगाची बतावणी करण्यास तयार होतो. सर्व मंडळी एकच. सोंगें मात्र निरनिराळीं. त्या सोंगापैकीं तुह्मी कोणचं सोंग आणतां! बोला बोला लवकर. बोलतां कीं नाहीं?

बाबूराव—सरकार मह्या कांहींएक आपल्या चरणसेवेखेरीज करतां येत नाहीं.

माधव—तुह्माला करायला येत नसेल तर वस्तादजीकडे जाऊन शिका. ते तुह्माला छान तरबेज करतील. त्यांना आपल्याप्रमाणें आपले चेले तयार करण्याची किल्ली मोठी छान माहित आहे. समजलात कां? तुह्माला तिकडे जाण्याची इच्छा नसेल, तर मी सांगतों तुह्माला तुह्मी कसं व्हावं तें! त्यानं मला आपला चेला बनविण्याकरितां एक गुरुमंत्र दिला आहे, तो मी तुह्माला सांगतों. मी कांहीं त्याप्रमाणें झालों नाहीं, कारण तो माझ्या मनांत नीट ठसला नाहीं. तुमच्या मनांत ठसला तर पहा. पण मी सांगेन तसं ऐकाल कीं नाहीं. बोला?

बाबूराव—श्रीमंत सांगतील तें ऐकायला मी अगदीं तयार आहे. फक्त आज्ञा मात्र व्हावी.

माधव—हं: खबरदार ते असले घाणेरडे शब्द उच्चारलेत तर! सांगतों तेवढं ऐका, बस्स. कारण सध्यां ' काय आज्ञा आहे, ' असें ह्मणणें ह्मणजे ' आमची तुह्माला अशी आज्ञा आहे ' असें सांगणें असा अर्थ होतो.

बाबू०—ऐकतो सरकार!

माधव—बरं तुमचे कोणी आप्त, इष्ट, मित्र आहेत कां?

बाबू०—होय आहेत सरकार!

माधव—त्यांच्याबद्दल तुमच्या मनांत. प्रीति आहे कां? तुह्माला त्यांना कधीं भेटावेसें वाटतं कां? ते लांब असले तरी तुह्माला त्यांना एकदां तरी पहावेसें वाटतं कां? त्यांचा सहवास व्हावा असं तुह्माला वाटतं कां? खरं, अगदीं खरं बोला.

बाबू०—आपल्या आप्तस्वकीयासंबंधाचें प्रेम कोणाच्या मनांत असणार नाहीं? त्यांचा सहवास व्हावा, त्यांना भेटावं, त्यांना पहावं, असं सर्वांना वाटतंच! ज्याच्या मनांत आपल्या आप्ताबद्दल, इष्टमित्राबद्दल प्रेम नाहीं, तो मनुष्यच नव्हे.

माधव—तर मग तुह्मी आपल्या आप्ताचे आप्त नाहीं, असें व्हाना?

बाबू०—तें कसें होणार सरकार! कारण जो आप्तपणा जन्मा बरोबरच येतो, तो जन्मभरपर्यंत राहणारच! तसें होणं अगदीं अशक्य.

माधव—बरें तर, तसं होत नसेल तर तुमच्या मनांत तुमच्या आप्तस्वकीयासंबंधाचें जें प्रेम असेल तें तुह्मी पार विसरून जा. तुमच्या आप्तांना तुह्मी आपले शत्रू समजा, त्यांच्याबद्दल. प्रेमाऐवजीं द्वेष बाळगा, मैत्रीबद्दल शत्रुत्व स्थापन करा, जितके ह्मणून चांगले विकार माया, प्रेम, कळकळ, तुमच्या मनांत त्यांच्याबद्दल असतील तितके पार विसरून जाऊन, त्या ऐवजीं दुष्ट विकारांचे साम्राज्य करून, तुह्मी तुमचा आप्तस्वकीयांचे अगदीं कट्टे कट्टे दुस्मान बना; आणि ते विनाकारण बरें! बोला तुह्मी तसे होता कीं नाहीं?

बाबूराव—सरकार तेंही होणं शक्य नाहीं.

माधव—सर्व गोष्टी जेव्हां तुह्मी नाहीं ह्मणतां तेव्हां तुह्मी एक तुमच्या गुरूचे खरे चेले तरी नसले पाहिजेत किंवा तुमच्याकडे आज प्रत्येक गोष्टीचा नकार बोलण्याचीच कामगिरी तुमच्या गुरूनें सोंपविली असली पाहिजे. बोला तुमच्याकडे कोणची कामगिरी सोंपविली आहे. ही कीं ती. फार करून तुमच्या गुरूनें जें तुह्माला आज सोंग आणायला सांगितलें आहे त्याच सोंगाची तुह्मी बतावणी करीत आहांत; तेव्हां इतर मदतनीसांची जशी मीं मघाशीं संभावना करून बोळवण केली, तशीच तुमचीही करतों. हरामखोरानों निघा माझ्या समोरून. तुह्मी फार खेळ खेळतां. माझ्या आप्तासंबंधानं होण्यास जसा मला त्या आजोबांनीं उपदेश केला, तसा मी त्यांच्यासंबंधानं तर होणार नाहींच पण तुमच्या संबंधानं मात्र होईन. निघा, निघा, माझ्या डोळ्यासमोरून, नाहींतर हाडेंच मोकळीं करीन. (त्याच्या अंगावर धांवतो)

बाबूराव—(जागींच उभा राहून) माझ्या रक्तपातानं जर श्रीमंतांच्या मनाला होत असलेला ताप शांत होत असेल, आणि त्यांच्या प्रकृतीला आराम होत असेल तर तो याक्षणीं करण्यास हा बाबूराव फडके तयार आहे. फडक्यांच्या कुलांतील प्रत्येक मनुष्याच्या अंगांतील रक्त, मांस, हाडें, त्वचा त्यांच्या देहाचा प्रत्येक अवयव, त्यांचे पंचप्राण पेशव्यांच्याच अन्नानें वाढलेले आहेत, त्या सर्वांचा उपयोग पेशव्यांच्या गादीच्या सेवेकरितांच व्हावयाचा आहे. आमचे देह त्या कामाला आतां लागले काय, किंवा उद्यां लागले काय सारखेच. त्यांचें ब्रीदच तें आहे. सरकार, या देहाचा वाटेल तसा उपयोग करून घ्यावा. आपल्या पुत्राचाही देह सरकारकामीं आला हें पाहून स्वर्गस्थ असलेला तात्यासाहेबाचा चिरात्मा तरी संतुष्ट होईल. (मान पुढें करून उभा राहतो.)

माधव—(आपल्याशीं) माझा राग इतका अनावर झाला असतां धिटाईनें उभा राहणारा हा दुसराच कोणी असला पाहिजे. त्यांच्या मदतनीसापैकीं नसेल, नाहींतर त्या चेल्याप्रमाणें हाही चेला आपल्या वस्तादजीकडे वर्दी देण्याकरितां लागलाच धांवत गेला असता. तर मग हा कोण बरें (शु-

द्धीवर आल्यासारखें करून) अरे हा माझा जिलवग स्नेही बाबूराव ! या निर्मळ अंतःकरणाच्या, व खऱ्या मित्राशीं मीं असा मूढाप्रमाणें अती प्रसंग केला अः ! अरेरे, मित्रा (त्याला जाऊन कवटाळतो) काय ही माझी स्थिती ! मी मूढ, पशू, कान असून बहिरा, डोळे असून आंधळा, बुद्धि असून मतिमंद असा सध्यां झालों आहेरे ! तुझ्यासारख्याशीं मी अशा रितीनें वागलों. सर्वांपेक्षां पूज्य, आणि प्रिय मित्राच्या प्रेमाची मीं भ्रमिष्टानें, अशी पारख केली, ज्या मित्रस्थानापासून माझ्या मनाला आनंद, सौख्य, विश्राम मिळणार त्या स्थानाची अमर्यादा करून मीं आपल्या हातानें आपल्या मनाला संताप करून घेतला, आणि तुला दुःख दिलें. मित्रा, मला क्षमा कर. मी चुकलों. (हात जोडतो.)

बाबू०—श्रीमंत हें काय हें ? (त्याला वर उचलतो.)

माधव—(त्याला मिठी मारून) काय करूंरे, त्या सर्व हरामखोरांनीं नानातऱ्हेचीं सोंगं आणून, भलभलतें बोलून, नाहीं ते व्हायला सांगून मला अगदीं त्रासवून सोडलं आहे; शिवाय प्रत्येकजण श्रीमंताची काय आज्ञा आहे ह्मणून हात जोडून ह्मणायला तयार ! जी गोष्ट त्यांच्या मनांतून करायची नसते, ती करायला तयार आहोंत असं दाखविण्याचीं सोंगं त्यांना कशीं आणतां येतात, याचेंच मला आश्चर्य वाटतं, आणि याच त्यांच्या कृतीचा मला अत्यंत संताप येतो; आणि त्या संतापाच्या भरांत माझ्या हातून भलतेंच होऊन जातं. हें सर्व जिवलग स्नेहाजवळ ह्मणून मीं सांगितलं. पण त्याच्याशीं तरी मी कुठं नीट वागलों. त्या माझ्या कृतीचं मला स्मरण झालं ह्मणजे मला तुला तोंड दाखवायला शरम वाटते. नको तुझ्यासारख्या परोपकारी महात्म्याला माझ्यासारख्या पातक्याचं दर्शन सुद्धां नको. हा मूढ, माधवा—चल—चल—नीघ—येथून. (जातो.)

बाबू०—यांच्या भ्रमिष्ट स्थितीमुळें, जितकं दुःख होतं तितकं दुःख कशानं होत नाहीं. याला काय उपाय ! देवा तूं समर्थ आहेस. करशील तें खरें. (जातो.)

प्रवेश तिसरा.

स्थळ—नानांचा वाडा.

पात्रें—नाना आणि बलवंतराव नागनाथाची बायको सत्यभामा.

नाना—बाई, तुमची दुसरी जर कांहीं विनंति असती, तर मीं ती मोठ्या आदरानें मान्य केली असती, व अजूनही करीन. त्या बेइमान, हरामखोरानं, फितुऱ्यानं, असलं भयंकर कृत्य केलं आहे कीं, तें सांगतां येत नाहीं. त्याचा दुर्धर परिणाम मात्र आह्मां सर्वांला भोगावा लागत आहे. त्याच्या एकट्याच्या एका दुष्ट कृतीमुळें इथं जे रोज अनर्थ उसळून गेले आहेत, ते पाहिले ह्मणजे असं वाटतं, आणि त्या फितुऱ्याबद्दल इतका संताप येतो कीं, त्याला याहूनही कडक शिक्षा करावी. त्याच्या अपराधाच्या मानानं शिक्षा भोगायला त्याचा एक देह पुरेसा नाहीं; आणखी जर असते तर फार चांगलं झालं असतं; ह्मणजे त्या सर्वांना शिक्षा देऊन मीं आपल्या मनाचं समाधान मानून घेतलं असतं. त्याचं नांव निघालं कीं अंगाची आग होऊन जाते. अरे मांगा बेरडा—

सत्यभामा—शिव, शिव, या कानांनीं या शिव्या ऐकवत नाहींत. (रागानें) पण त्यांनीं असा सरकारचा कोणचा मोठा गुन्हा केला आहे? उलट त्यांनीं तर आजपर्यंत सरकारची कामगिरी मोठ्या इमानदारीनें केली आहे.

नाना—त्यानं पूर्वी फारच चांगली कामगिरी केली. माझा त्याच्यावर पूर्ण विश्वास होता; पण अखेरीस त्या गुलामानं माझ्या विश्वासाचं मला चांगलं फळ दिलं, ह्मणून त्यालाही पण त्याच्या कृती योग्य फळ देणें मला भाग पडलें आहे. एखादा प्रत्यक्ष गळेकापू, दरोडेखोर पतकरतो, पण हा असला विश्वासघातकी, केंसानं गळा कापणारा मुळींच उपयोगी नाहीं. त्याला हत्तीच्या पायाला बांधून ठारच केला असता, पण काय करूं ब्राह्मण पडला, आणि त्यानं पूर्वी चांगली कामगिरी केली ह्मणून सोडला.

सत्यभामा—त्यांना मृत्यूची शिक्षा कशाबद्दल!

नाना—कशाबद्दल! विश्वासघाताबद्दल, आणि राजद्रोहाबद्दल. पेशव्यां-

च्या राज्यांत अपराध्याला मृत्यूची शिक्षा राजद्रोहाखेरीज होत नाहीं. जें काम करायला नको होतं तें त्यानं चोरून केलं.

सत्यभामा—श्रीमंत आणि बाजीरावसाहेब यांचा निरोप एकमेकांला पोंहचविणें, त्या दोघांचं सख्य करून देणं, हें काम त्यांनीं करायला नको होतं, तें त्यांनीं केलं ह्मणून त्यांना जन्मभर कैद होय ?

नाना—होय तेवढ्याचकरितां ?

सत्यभामा—पण तें श्रीमंत सरकाराला पसंत होतं कीं नव्हतं ? जर सरकाराला ती गोष्ट आवडत होती, त्यांना ती गोष्ट माहित होती, मग ते सरकारचे गुन्हेगार कसे, आणि त्यांच्याकडून राजद्रोहाचा गुन्हा घडला कसा !

नाना—पण मीं त्यांची त्या कामावर योजना केली नव्हती. त्याला सांगितलेली कामगिरी त्यानं बजाविली नाहीं. भलतंच केलं ह्मणून त्याला शिक्षा झाली.

सत्यभामा—श्रीमंतांची आणि बाजीरावाची ह्मणजे चुलत्याची आणि पुतण्याची नुसते निरोप कळवून ओळख करून दिली, आप्ताआप्तामध्यें सख्य करून दिलं, आणि ही गोष्ट यजमानाच्या संमतीनं झाली; असं असून त्या ओळख करून देणाऱ्या माणसाला जन्मभर कैदेची शिक्षा काय ? हा पेशवाईतला सुरेख न्याय आज जगाला नवीनच कळला ह्मणायचा ! आपल्या दूरच्या एखाद्या आप्ताची जर दुसऱ्या कोणी मनुष्यानं ओळख करून दिली तर नानासाहेब आपण त्याला राजद्रोही ठरवून जन्मभर कैदेचीच शिक्षा देणार तर मग ? आजपर्यंत अशा चांगल्या कामांत मध्यस्थी करणाऱ्या मनुष्याला मोठे लोक इनाम देत असत, पण आतां त्यांना त्याबद्दल कडक शिक्षा होतात, या त्यांच्या मोठेपणाला काय ह्मणायचं. श्रीमंतांची आणि बाजीरावाची ओळख करून देणारा मनुष्य जर राजद्रोही, मांगहृदयी, विश्वासघातकी असा ठरतो; आणि त्याला अंधारकोठडींत सारा जन्म घालविण्याची शिक्षा मिळते, तर त्या दोघांमध्यें वितुष्ट पाडणारा, त्यांच्यामध्यें बिब्बा घालणारा, त्यांचे एकमेकांना नुसते निरोप देखील नकळूं देणारा मनुष्य किती विश्वासघातकी, किती मांगहृदयी, व राजद्रोही असावा; याचा विचार नानासाहेब,

आपणच करावा. मला वाटतें त्याला नुसता हत्तीच्यापायीं देऊन अगर दुसऱ्या एखाद्या प्रकारानें एकदम ठार मारून टाकण्याची शिक्षा देऊन उपयोगीं नाहीं, तर त्या मेल्याला हाल हाल करूनच ठार मारण्याची शिक्षा दिली पाहिजे. एखाद्या कुटुंबाची वाताहत करणारा, त्यांतील बायकांमुलांस देशोधडी लावणारा, दीनवाणीनं जीं त्याच्यापुढें तोंड वेंगाडण्यास आणि दया करा ह्मणून ह्मणण्यास आलीं असतां, त्यांची ती दीन स्थिती पाहून न द्रवणारा, तो मेला मांगल्हदयी नाहीं तर कसा? त्याचं ह्रदय काळ्या कुळकुळीत फत्तराचंच असलं पाहिजे. अशा माणसाला माणुस ह्मणण्यापेक्षां राक्षस ह्मटलं तर फार चांगलं होईल. नानासाहेब, पागेदारानीं राजद्रोहाचा गुन्हा केला नाहीं. ते श्रीमंताच्या आज्ञेप्रमाणेंच चालत होते. राजद्रोहाचा गुन्हा कोण करीत आहे आणि श्रीमंताच्या मर्जीविरुद्ध कोण वागत आहेत, याचा प्रथम आपण आपल्या मनाशीं विचार करा. आपल्यासारख्या मोठ्या लोकांनीं भलतंच करून आह्मा गरीब कुटुंबाची दैना करूं नये. देव सर्वांना पहात आहे.

नाना—त्याला झालेली शिक्षा त्यानं जन्मभरपर्यंत भोगलीच पाहिजे.

सत्यभामा—नानासाहेब, इतके निष्ठुर नका होऊं! या आह्मां दोघा दीनाकडे पहा. यांच्याकडे पाहून तरी आपल्याला दया येऊं द्या. तिकडची प्रकृती इतकी अशक्त झाली आहे कीं, त्यांच्यानं त्या वजनदार बिड्यांचं ओझं आतां मुळींच सहन होत नाहीं. एक घासभर त्यांना अन्न जात नाहीं, कीं त्यांच्यानं एक पाऊलही उचलवत नाहीं.

नाना—कांहीं झालं तरी त्यांत आतां बदल होणार नाहीं.

सत्यभामा—त्यांच्याबद्दल मी शिक्षा भोगतें. त्यांच्याजागीं मला ठेवा, पण त्यांना सोडा. मला वाटेल ती शिक्षा देऊन आपल्या मनाची तृप्ती होत असेल तर ती खुशाल करून घ्या. अगदीं कसर करूं नका. नाहींतर उगीच आपल्या मनाला जन्मभर तळमळ लागेल. ही सत्यभामा, त्यांच्याकरितां वाटेल तें दुःख भोगायला तयार आहे. त्यांच्या अपराधाबद्दल आपल्या मनांतून त्यांना जी मृत्यूची शिक्षा द्यावयाची आहे ती मला द्या, ह्मणजे त्यांत दोन्ही तिन्ही कामं एकदमच साधतील. त्यांना होत असलेलं दुःख जें मला

पहावत नाहीं; तें एक नाहींसं तरी होईल, अपराध्याला योग्य शिक्षा दिल्या-बद्दल आपल्या मनाची तृप्ती होईल, जगाला आपला खरा दयालुपणा आणि न्यायीपणा दिसेल, आणि स्त्रियांना सौभाग्यपणांत मरणांत जें सर्वांहून जास्त सुख व भूषण आहे, तें मला अनायासेंच आपल्या कृपेमुळें लाभेल. आपल्या पतीच्या आधीं स्त्रियांना मृत्यू येणं यापेक्षां जगांत स्त्रियांना दुसरी कोणतीच गोष्ट आनंदाची नाहीं. नानासाहेब, द्या हुकूम. जितकं लवकर मला त्यांच्या आधीं मरण येईल तितकं मला चांगलं; आणि तितक्या माझ्या मनाला होत असलेल्या यातना तरी कमी होतील. हंः.

नाना—एका मनुष्याच्या अपराधाबद्दल दुसऱ्याला शिक्षा देणें अगदीं गैर, त्यांतून स्त्रियेला शिक्षा देणं त्याहूनही अयोग्य. शिक्षा ज्याची त्यानेंच भोगिली पाहिजे.

सत्यभामा—त्यांच्यावर प्रसंग आल्यामुळें आह्मी दीन होऊन दारो-दार लागलों आहोंत. मी पदर पसरते, हात जोडते. येऊंद्या, थोडीशी तरी दया येऊंद्या. याबद्दल आपल्याला देखील एखादे दिवशीं देवापाशीं जाब द्यावा लागेल.

नाना—त्यानं पूर्वीं जी सरकारची नौकरी बजाविली आहे, तेवढ्याबद्दल त्याच्या कुटुंबाच्या पोटापाण्याची मात्र सरकारांतून तजवीज केली जाईल. समजलांत बाई. (इतक्यांत मोरोपंत भावे लगबगीनें येतात.)

मोरोपंत—(हात जोडून) आजच्या इतकी श्रीमंतांची प्रकृती कधींच बेताल झाली नव्हती. वैद्याचं औषध घेतलं नाहीं इतकंच नव्हं, तर त्यांनीं आह्मा सर्वांना हाताला धरून तेथून काढून लावलं. औषध फेंकून दिलं. स्थिती फारच भ्रमिष्ट झाली आहे. आजच्या कृतीवरून उद्यां काय होईल हें सांगवत नाहीं. आपण एकदां तिकडे चलावं.

नाना—(संतापानें) आणखी काय काय होणार आहे, कांहीं कळत नाहीं. बाई, हें सर्व आपल्या यजमानाच्या कृतीमुळें. जो सर्वांच्या दुःखाला कारण झाला त्याला ती शिक्षा ह्मणजे कांहींच नाहीं. हरामखोरा, भोग आप-ल्या कर्मांचीं फळं.

सत्यभामा—नानासाहेब, परमेश्वर कांहीं लांब नाहीं बरं! मला तरी त्यांच्या जवळ राहूंद्या; ह्मणजे मीं त्यांची थोडीबहुत तरी सुस्रुषा करीन. पोट जळत नाहीं ह्मणून मी आपल्याकडे आलें नाहीं. त्यांच्यावर आपण कांहीं दया करावी ह्मणून मी आपल्याकडे आलें. मला दुसरं कांहीं आपल्या-जवळून नको आहे, ज्यानं जन्माला घातलं आहे आणि पोट दिलं आहे, तो आजच कांहीं निजला नाहीं किंवा मेला नाहीं. त्यानं कांहीं तरी त्याची तजवीज केलीच असेल.

नाना—परमेश्वर लांब असो अगर जवळ असो, पोटाची मात्र तजवीज होईल, यापेक्षां जास्त सध्यां कांहीं एक होत नाहीं; आणि तुमच्या विनंती-चाही कांहीं उपयोग व्हावयाचा नाहीं. लाखो मनुष्यांच्या पालनवाल्याला एकाच्या दुष्ट कृतीमुळें ताप होऊन जर लाखो माणसांना दुःख होत आहे, तर त्यांच्याकरितां त्या एकट्या हरामखोरानं दुःख भोगलं तर कांहीं एक वाईट नाहीं. तो तेथेंच सडत पडला पाहिजे. समजलांत बाई. जा. (नाना आणि मोरोपंत निघून जातात.)

सत्यभामा—नानासाहेब, आपल्यासारख्या मांगल्हदयी मनुष्यानं दिलेलं अन्न मीही घेणार नाहीं. जग आजच कांहीं ओस पडलं नाहीं. दारोदार पाहिजे तर भीक मागून आणीन आणि आपल्या पोटाची खळी भरीन; नाहीं तर उपाशीं तरफडून मरेन, पण आपल्यासारख्या निर्दयाच्या दाराशीं पुन्हां कधीं येणार नाहीं. पण एवढं मात्र पक्कं लक्षांत ठेवा कीं, श्रीमंत पंतप्रधान आणि त्यांचे आप्त यांचं सख्य करून दिल्याबद्दल आपल्यासारख्या कुटिल मंत्र्याला राग येऊन राजद्रोहाचा तर नाहींच, पण मंत्रीद्रोहाचा गुन्हा के-ल्याबद्दल एका गरीब मनुष्याला किती यातना भोगाव्या लागत आहेत, व पेशवाईत आणि नानासारख्याच्या कारभारांत कसा न्याय होत आहे हें मात्र सर्व लोकांच्या नजरेस आणून दिल्याशिवाय मीं राहणार नाहीं. (आपल्या-शीं) अरे मांगा, कुटिला, निर्दया, कांहीं तरी तुला दया यायची होती. प्र-त्यक्ष निर्दय काळ देखील, सती सावित्रीनं आपल्या पतीच्या प्राणाकरितां त्याची करुणा भाकिली असतां, द्रवला; त्याला त्याची दया आली आणि त्यानं

प्रसन्न होऊन तिचा पती तिच्या स्वाधीन केला; पण हा मेला मनुष्य असून त्या निर्दय काळापेक्षां देखील निर्दय आहे. तिकडे आजपर्यंत नानाची किती थोरवी गाणं होत असे, नानाला किती देवाप्रमाणें भजत असत, तोच बरं आपला हा आजपर्यंत पुजलेला देव; आणि त्याचीच ही आपल्यावर कृपा. मेला नुसत्या काळ्या दगडापेक्षां देखील दगड आहे. इथं दाद लागत नाहीं तर प्रत्यक्ष ज्यांचा त्यांनीं गुन्हा केला आहे त्याच्याजवळ दाद मागेन, आणि या कुटिल कारभाऱ्याचं मन किती काळं आहे हें त्यांना आणि सर्व जगाला दाखवीन; त्याशिवाय मला आतां दुसरा उपाय राहिला नाहीं.(जाते)

प्रवेश चवथा.

स्थळ—वाड्यांतील देवीचें माजघर.

पात्रें—यशोदाबाई आणि मैना येतात.

यशोदाबाई—(आपल्याशीं) हे आई, जगदंबे, कोल्हापुरचे महालक्ष्मी तुझ्या उत्सवाचा आजचा नववा दिवस आहे. चहूंकडे तुझे होम, हवन, उत्सव मोठ्या कडाक्यानं चालले आहेत. कित्येक स्त्रियांच्या अंगांत येऊन तूं आपला साक्षात्कार दाखवीतेस; आणि सगळ्यांचं पुढचं बरं वाईट सांगतेस, तर मग मला कां बरं तूं आपला साक्षात्कार दाखवित नाहींस ? हे माते, तूं जर माझ्यावर रागावलीस तर मग माझं कसें होणार ! मीं लहान आहे, अज्ञान मूल आहे, माझ्या हातून जर तुझा एखादा चुकून अपराध झाला असेल तर तो मला क्षमा कर. मीं तुझ्या कृपेस पात्र आहे. तिकडची प्रकृती जी अगदीं बिघडली आहे, जेवण नको, खाणं नको, झोंप नको, कांहीं एक नको, अशी जी भ्रांती झाली आहे, ती सर्व नाहींशी कर; ह्मणजे पुढील वर्षीं तुझा उत्सव मी दुप्पटीनं करीन. हजारो सवाष्णीस तुझ्या नांवानं सौभाग्य वायनं देईन. तुझ्या कृपेनं मला सर्व कांहीं अनुकूल आहे. तिकडची प्रकृती लवकर बरी होऊं दे, याशिवाय माझं तुझ्याजवळ कांहीं एक मागणं नाहीं. (मैनाकडे पाहून) मैना, आतां प्रकृती कशी ग आहे. तूं खबर आणलीस कां ?

मैना—बाईसाहेब, सरकार भ्रांतिष्टासारखं करतात. औषध फेंकून देतात आणि ज्याच्या त्याच्यावर रागावतात; पण आज कालच्यापेक्षां कांहीं कमी आहे. नवरात्र आहे तेव्हां देवीला एखादा नवस नवसा. मी देखील एक नवस करते. हे आई भवानी, आमच्या सरकारास लवकर आराम पडूंदे ह्मणजे मी तुझ्या नावानं दहा सवाष्णीस जेवायला घालीन.

यशोदा—मैना, मी शेंकडों नवस केले आहेत. तिकडच्या प्रकृतीचं मान रोज कमी व्हावं हेंच मला ऐकायला पाहिजे. (आपल्याशीं) जगांत आमचं सर्वस्व काय तें ते! मी लहान ह्मणून मला जवळ जाऊन काय होतें तें विचारतां येत नाहीं; कांहीं उपाय करतां येत नाहीं, कोणाला एकदम उघडपणें काय होत आहे याची चौकशी करतां विचारता येत नाहीं, डोळे भरून पहातां सुद्धां येत नाहीं, कारण निर्भीड आणि दांडगी असं लोक ह्मणतील कीं काय ही भीति. सगळा मेला चोरटा व्यवहार. काळजी करायची झाली तरी सुद्धां ती चोरूनच केली पाहिजे, आणि घरांतील, चार मंडळी जें कांहीं बोलतील तें चोरून ऐकून त्यांत जर कांहीं कळलं तर त्यावरच समाधान मानून राहिलं पाहिजे. मनाला दुःख होण्याजोगं जर कांहीं कळलं तर तें दुःख बाहेर दाखवितां देखील कामा नये, उलट आनंदच दाखविला पाहिजे. सगळ्याची मेली चोरी आणि नेहमीं दुसऱ्याच तोंडानं पाणी प्यायचं. आह्मा लहान मुलींची ही स्थिती किती वाईट. आह्मी लहान ह्मणून आह्माला कां मन नाहीं, कीं दया नाहीं, कीं आह्माला आमच्या माणसाची काळजी वाटत नाहीं, कीं आह्माला काय होत नाहीं. तहान, भूक ज्याला लागते त्याला आपलं बरं वाईट सगळं कळतं; सुख, दुःख होतें, राग, लोभ येतो, सर्व कांहीं लहानाला मोठ्या माणसाप्रमाणेंच होतं; पण मेलं तें बाहेर दाखविण्याची चोरी आहेना! डोळे भरून पाहीन ह्मटलं तर तें देखील करतां कामा नये. चोरून लपूनच पाहिलं पाहिजे.

(इतक्यांत माधवराव येतात.)

मैना—बाईसाहेब, ती पहा स्वारी आली. चला या इकडून अशा.

यशोदा—चल पुढं हो, ही मी अशी इकडून येते. (ती जाते) (त्या-

च्याकडे पाहून आपल्याशीं) पाहिलं, इतक्यांत शरीर किती उतरलं तें! कानानं, दुसऱ्याच्या तोंडून ऐकण्यांत आणि आपल्या डोळ्यांनीं प्रत्यक्ष पहाण्यांत इतकं अंतर! आणि सर्वजण ह्मणतात कीं प्रकृती बरी आहे. रोजमान कमी आहे, काय आपलं कपाळ सांगतात. पूर्वीचं तोंडावरचं तेज नाहींसं होऊन तें आतां किती निस्तेज झालं आहे. डोळे किती खोल गेले आहेत. गालावरचीं हाडं किती वर आलीं आहेत. बरगड्यान बरगड्या दिसतातग बाई! स्थिती भ्रांतिष्टासारखी झाली आहे. नाहींग बाई चेहऱ्याकडे पहावतच नाहीं. खरं काय होत आहे, हें कळण्याला कांहींएक उपाय नाहीं. डोळ्यांनीं पाहून आणि सुस्कारे टाकून मनांतल्या मनांतच दुःख करीत स्वस्थ राहिलं पाहिजे; डोळ्यानं, पोटभर आणि स्वस्थपणें पहाण्याची देखील सोय नाहीं. सध्यां जवळपास कोणी नाहीं तेव्हां डोळेभरून पाहून तरी घेते.

माधव—(तिच्याकडे पाहून) मनुष्याला त्याच्या कोणच्याही स्थितींत जर कधीं काळीं सुख लागत असेल, तर तें त्याच्या लहानपणांत आणि त्याच्या अज्ञान अवस्थेंतच. म्हातारपणची स्थिती कांहीं बरी! त्या स्थितींत बाहेरचा फारसा त्रास होत नाहीं. कारण त्यावेळीं बहुतेक बाह्य इंद्रियांनीं सोडलेलं असतं; पण त्याही स्थितींत फारसं सुख नाहीं. इंद्रियाचे बाहेरचे सर्व व्यापार सुटले ह्मणजे मनाचे व्यापार जसे मग झपाट्यानें चालतात तसे पूर्वी चालत नाहीं. त्यामुळें त्या स्थितींत सर्व जन्मांत केलेल्या, घडलेल्या गोष्टीच्या स्मरणानं मनाला अतिशय ताप होतो. मनाला ताप झाला कीं समाधान नाहीं, आणि जेथें समाधान नाहीं तेथें सुख कुठलं. जर त्यावेळीं पूर्वीची विस्मृती होईल तर मात्र त्यांत कांहीं तरी सुख लागण्याचा संभव आहे, आणि तेव्हांच लहानपणची आणि म्हातारपणची स्थिती सारखी समजायची. पण मधली तारुण्यावस्थेची स्थिती मात्र अतिशय वाईट. त्या स्थितींत सुखाचा वारा कधींही कोणाला लागण्याची आशा नको. सर्व जें कांहीं सुख दुःख होतं तें समजूं लागल्यावरच. तेव्हां यशोदे, तूं अगदीं लहान हो, तुला जर आतां कांहीं समजत नसेल तर सध्यां आहेस तेवढीच रहा; अथवा एकदम सर्व इंद्रियांनीं सोडलेली, पूर्वीची आठवण नाहींशी झालेली, अशी आंधळी, बहिरी,

मुकी, मतिमंद अशी जखड म्हातारी होऊन जा! म्हणजे तुला मग कांहीं सुख लागलं तर लागेल. तारुण्यावस्था मुळींच तूं पाहूं नकोस. तूं जरा मोठी झालीस म्हणजे तुला समजूं लागेल. तुला समजूं लागलं म्हणजे मग मात्र तुला तुझी दुःखद स्थिती कळूं लागेल. तुझ्या अंगाला बाहेरून विषारी इंगळ्या लागल्यासारखं होईल. तुझ्या दुर्दैवी पतीची तुला खरी स्थिती कळली म्हणजे मग चहूंबाजूंनीं रखरखीत पेटलेले निखारे ठेवल्याप्रमाणें तुझ्या मनाला अत्यंत ताप होत जाईल. मनाला ताप झाला कीं सध्यां जें तुझें सुंदर मुखकमल टवटवीत दिसत आहे, तें त्या तापानें अगदीं कोमेजून जाईल. आणि तुझ्या अंतःकरणांतील आनंदाचा झरा तो मनाचा ताप शोषून टाकील. यशोदे तर मग तूं अगदीं लहान होशीलना? हो, हो, अगदीं लहान लहान हो. तूं लहान झालीस असं मीं पाहिलं कीं मला मोठा आनंद होईल. कारण माझ्यामुळें तुला दुःख होऊं नये अशी माझी मोठी इच्छा आहे.

यशोदा—(आपल्यांशीं) ते पहा माझ्याकडे टवकारून पहात आहेत. मी इथं पहात उभी राहिलें म्हणून स्वारीला राग आला कीं काय? पण मला असं नुसतं पहाण्याखेरीज दुसरं काय करितां येतं! मुद्रा किती तरी भयंकर दिसत आहे. आई—आई—(डोळ्याला पदर लावते.)

माधव—(तिच्याकडे पहात आपल्याशीं) अरे ही तर रडते आहे वाटतं. तें पहा तिनं आपलं तोंड त्या बाजूला वळवलं. तिनं डोळ्याला पदर लावला. ते पहा गालावर आलेले ओघळ ती आपल्या पदरानं पुशीत आहे. यशोदे, तुला माझी स्थिती कळली! माझ्या मनाला काय दुःख होत आहे, तुझा पती किती अभागी, किती दुर्दैवी, किती पराधीन आहे हें तुला समजलं वाटतं. हो समजलं! त्याशिवाय तुझ्या डोळ्यांतून अश्रुपात कधींच होणार नाहीं. मनामध्यें अत्यंत गुप्त ठिकाणीं काय खलबल चालली आहे हें जाऊन शोधून पाहण्याला आणि मनाची स्थिती समजून घेण्याला हेच दोन मार्ग आहेत, ते सर्व दाखवितात. मला आप्त, इष्ट, मित्र गणगोत वगैरे कांहीं नाहीं. जर कोणी मला असले तर मीं त्यांना विसरलें पाहिजे, आणि त्यांच्याबद्दल जर माझें मनांत यत्किंचित् प्रेम, दया, माया कांहीं असेल तर ती टाकून

देऊन मला निव्वळ पाषाण बनलं पाहिजे, पण यशोदे, तुझ्याकरितां तसा प्रेमाचा ओलावा नाहीं असा मी कोरडा पाषाण कसा बनूं. पण आतां मला तसं बनण्यांत बाकी कोणची राहिली आहे. मी तसा झालेला हें तुझें अश्रुच स्पष्ट दाखवीत आहेत. तुझी माझी नजरानजर झाली, तूं मला पाहिलंस, ह्मणून तुला दुःख झालं. तेव्हां माझं दर्शन हेंच खरोखर तुझ्या दुःखाचं मूळ. मी जोंपर्यंत तुझ्या दृष्टीस पडलों नव्हतों तोंपर्यंत तूं मोठी सुखी आणि आनंदी होतीस. माझं दर्शन झाल्याबरोबर तें तुझं सुख, तो आनंद पार कोणीकडच्या कोणीकडे नाहींसा झाला. तेव्हां तुला जर सुख व्हावं असं असेल तर मला येथून तत्काल तुझें दृष्टीपुढून निघून गेलं पाहिजे त्याशिवाय दुसरा त्याला उपाय नाहीं. हे अभाग्या माधवा, तूं खरोखर महापातकी आहेस. तुझ्या दर्शनानं, पाहण्यानं, बोलण्यानं, तुझ्याशीं सहवास ठेवण्यानं, तुझा आप्त झाल्यानं, आणि तुझ्याशीं मैत्री करण्यानं, सर्वांना दुःख होत आहे; असा तूं सर्वांच्या दुःखाचं मूळ जन्माला तरी कशाला आलास! यशोदे, सर्वांना दुःखदायक असा तर मी झालोंच आहे, पण तुझा हात धरून दुःखसागरांतून मीं तुला पार परतीराला नेऊन पोंहचवावयाचं माझं कर्तव्यकर्म असतां, आणि तें करीन अशी मीं सर्वांसमक्ष शपथ वाहिली असतां, या चांडाळ निर्दयानें, तुला, अज्ञान मुलीला फसवून त्या दुःखसागरांत पार बुडविली ग बुडविली. मी तुझा पूर्वजन्मीचा खरोखर वैरी, आणि ह्मणूनच हा असा दावा साधला. या कपट्याचं तूं पुन्हां तोंड पाहूं नकोस, आणि मीही तुला आपलं तोंड दाखविणार नाहीं. जेव्हां जेव्हां तूं माझं तोंड पहाशील तेव्हां तेव्हां तुझ्या दुःखाला भरतं आल्याशिवाय कधीं राहणार नाहीं. (झपाट्यानें निघून जातो.)

यशोदा—हे आई जगदंबे, हे कुलस्वामी गणपतीराया, तिकडचं सर्व दुःखणं मला येऊंदे; आणि तिकडच्या प्रकृतीला लवकर आराम पडूं दे. देवा काय दशा झाली ही.

(डोळे पुशीत निघून जाते.)

प्रवेश पांचवा.

स्थळ—शनवारच्या वाड्यांतील दरबार कचेरीच्या बाहेरील दालन.

पात्रें—मोरोपंत भावे आणि दाजीबा आपटे येतात.

मोरोपंत—दाजीबा, आजचा भयंकर प्रसंग दैवयोगानंच टळला. देवाची कृपा आणि नानांचं दैव सबळ, नाहींतर आज सर्वांच्या तोंडाला काळोखी लागली असती. मला स्वारींतून परत येऊन दोन तीन घटका झाल्या तरी अद्याप माझी छाती धडधडतच आहे.

दाजीबा—मोरोपंत, प्रसंग तसा खरा. पण एकाएकी असं होण्याला कारण काय झालं!

मोरोपंत—आतांशा श्रीमंतांची प्रकृती किती भ्रमिष्ट व किती बेताल झाली आहे! कांहीं तरी बोलतात, कोणीकडे तरी पहातात, कोणीकडे तरी चालतात; मध्येंच मोठमोठ्यानें सुस्कारें टाकतात, आपल्या शरीराकडे वारंवार पाहतात, ज्याच्या त्याच्यावर रागावतात, अंगावर धांवून जातात, असे वेड्यासारखे नाना प्रकार करतात. फार काय सांगावं, माझ्यावर आणि कोंडाजीवर जो एक दोन दिवसापूर्वी प्रसंग आला होता, तोच प्रसंग प्रत्यक्ष बाबूराव फडके यांच्यावर आला होता. आधीं स्वारी आज शिलंगणास जाण्यासच उठेना. बाबूरावांनीं, मीं, आणखी दुसऱ्या मंडळींनीं फार विनंति केली त्यावेळीं आह्मां सर्वांवर स्वारी किती रागावली, तो प्रकार तुह्माला माहित आहेच.

दाजीबा—त्यावेळीं मी तेथेंच होतो. नाना आले तेव्हां स्वारी उठली, त्यावेळीं देखील रागांतच होती.

मोरोपंत—तो प्रकार आणि तोच राग स्वारींत कायम होता. अर्ध्या रस्त्यावर स्वारी गेली असेल नसेल. नानांचा, फडक्यांचा व इतर सरदारांचे हत्ती बरोबर चालत होते. इकडे तिकडे पहातां, पहातां, श्रीमंताची नजर नानाकडे गेली. कांहीं बोलायचें असेल असें समजून नानांनीं आपला हत्ती, श्रीमंतांच्या हत्तीजवळ नेला. इतक्यांत कावरी बावरी मुद्रा करून, ‘ हा मीच येतो ’ असें

ह्मणून श्रीमंत अंबारींतून बाहेर उडी टाकूं लागले. इतक्यांत आप्पा बलवंतानीं धरून बसविलं. नानांनीं तो सर्व प्रकार पाहिला आणि लागलींच झपाट्यानें स्वारी चालवून शमीचं पूजन करून लवकर मागें परतण्याचा त्यांनीं हुकूम सोडला. त्या बरोबर पुढची दरबारची तयारी पूर्वींपेक्षां लवकर ठेवण्यास तुह्माला कळविण्याकरितां पुढें स्वार दवडला आणि मी लागलाच परतलों. सर्व तयारी आहेना ?

दाजीबा—सर्व तयारी आहे ! ह्मणूनच बरं स्वारी सूर्यअस्तापूर्वींच शहरांत आली. नाहींतर शहरांत येण्यास दर वर्षीं चार घटका रात्र होते. तर मग आजचा दरबार देखील असाच व्हावयाचा !

मोरोपंत—नजराण्याचा आणि सोनं देण्याचा यंदाचा दरबार मोठ्या थाटाचा व्हावयाचा, कारण यंदा आपल्या मराठे वीरांनीं निजामावर तसाच जय मिळविला आहे. पण श्रीमंतांची प्रकृती फार नादुरूस्त असल्यानं सर्व जागच्याजागीं राहिलं. हा प्रकार पाहून नानाचं मन फारच भयचकित झालं आहे. ते आजचा दरबार कसा तरी लवकर उरकून घेणार. (ऐकल्यासारखें करून) हे पहा, भालदार चोपदार ललकारत आहेत, त्यावरून स्वारी दरबारांत येऊन बसली वाटतें. चल, तर पानसुपारीची सर्व तजवीज पाहिली पाहिजे.

दाजीबा—हो स्वारी गादीवर येऊन बसलीच चला चला. (दोघे घाईनें निघून जातात.)

प्रवेश साहवा.

स्थळ—दरबारचा दिवाणखाना.

पात्रें—श्रीमंत सवाईमाधवराव पेशवे गादीवर विराजमान झाले आहेत. नाना, बाबूराव फडके, एका बाजूला उभे आहेत, दुसऱ्या बाजूला मोरोपंत, दाजीबा, इतर सरदार मंडळी उभी आहेत, प्रत्येकजण पुढें होऊन नजराणा करीत आहे, भालदार ललकारत आहे असा पडदा उघडतो.

नाना—बाबूराव, आतां श्रीमंतांची प्रकृती किंचित बरी आहे, नाहीं! आप्पांनीं चांगलीच हुशारी केली ह्मणायची नाहीं तर अनर्थच झाला असता.

बाबूराव—अनर्थ ह्मणजे कसला! वर तोंड काढायला जागा नव्हती.

नाना—सर्व त्या सिद्धिविनायकाला आणि जगदंबेला काळजी. असो, (सुस्कारा टाकतो.)

बाबूराव—मुद्रा जरा शांत दिसते, पण चेहेऱ्यावर जो उदासपणा दिसत आहे, तो आहे तसाच कायम आहे. उत्साह मुळींच दिसत नाहीं.

माधव–(खिन्न वदनानें, औदासिन्ययुक्त हांसून आपल्याशीं) एका बाजूला बाबासाहेबांना, दुसऱ्या बाजूला आप्पासाहेबांना घेऊन मी आज या गादीवर बसलों असतो तर या गादीला मग जशी शोभा आली असती तशी शोभा सध्यां मुळींच नाहीं. बाबासाहेबांच्या आणि आप्पाच्या मनांतून ही दसऱ्याची स्वारी पहाण्याला येण्याचं फार होतं, आणि त्यांनीं तसं आपल्याला एका पत्रांत कळविलंही होतं; पण मी आहेना अभागी, अशा रितीनं आजचा दसऱ्याचा दिवस साजरा करण्याचं, व तें सुख अनुभवण्याचं माझ्या कुठं नशिबी आहे. माझ्या मनाप्रमाणं जर सर्व घडून येतं तर आज जिकडे तिकडे आनंदी आनंद, चहूंकडे मजा, बहार उडून गेली असती. पण तसं कुठं झालं. मी आज अशा थाटानं येथें बसून चैन भोगीत आहे, असं जर बाबासाहेबांस कळलं तर ते मला अप्पलपोट्या, निर्दय, आणि निर्लज्ज असं नाहीं कां ह्मणणार? हो अवश्य ह्मणतील. ते काय पण सर्व जग मला तसं ह्मणेल. कारण माझी कृतीच तशी आहे. बलवंतराव नागनाथ कैदेंत पडला आहे, बाबासाहेब, आप्पासाहेब आपापल्या ठिकाणीं त्यांचा हिरमोड झाल्यामुळें खिन्न होऊन बसले असतील, आणि मी मात्र इथं चैन भोगीत आहे! आपल्या आप्तस्वकीयांबद्दल ज्याला वाईट वाटत नाहीं, ज्याच्या मनांत त्यांच्याबद्दल प्रेम नाहीं, ज्यांची जो काळजी करीत नाहीं, आपल्या सुखाचे त्यांना वांटेकरी करीत नाहीं, त्यांच्या दुःखाचा भाग घेत नाहीं, तो निर्लज्ज, अधमाधम, आणि निव्वळ पशू होय! माधवा, अधमाधमा, तुझ्यांत आणि पशूंत अंतर काय आहे. अप्पलपोट्या, त्यांच्याशीं तुझी अशी वर्तणूक! हें बर

सगळं जग तुला हांसत आहे, तुला त्याची कांहीं लाज वाटूं दे. (तोंड फिरवून बसतो) बाबासाहेबांना आणि आप्पासाहेबांना बरोबर घेतल्याशिवाय मी या गादीवर आणि या दरबारांत कधींच बसणार नाहीं. अहो महाराज, अजून मी इतका अप्पलपोट्या झालों नाहीं बरं! मला कांहीं तरी शरम आहे. (मध्येंच गादीवरून उठतो.)

नाना—(पुढें होऊन हात जोडून) श्रीमंत—हें—

माधव—(रागानें त्यांच्याकडे टवकारून पहातो; आपल्याशीं) काय, वृद्ध आजोबा, गारुडीबोवा, याहूनही आह्माला बेशरम बनवून सर्व जगाला आणखी आमचा तमाशा दाखविण्याचा आपला बेत आहे वाटतं! झालं हें कमी झालं होय! अजून कांहीं आपली हौस पुरवून घेण्याची बाकी राहिली आहे वाटतं! अरे थेरड्या, गारुड्या, तूं सापाला त्याचे दांत पाडून जरी निर्जीव आणि निर्बल करून पेटाऱ्यांत घालून अगदीं बंदीवान केला आहेस, तरी तो नुसत्या आपल्या फुत्कारानें देखील तुझ्या जीर्ण देहाला कांपवून सोडील. चल मागें हो, खबरदार पुढें आलास तर. निघा—(रागानें दरबारांतून निघून जातो.)

नाना—(आश्चर्यचकित होऊन) नशिब. आहे तीच स्थिती अद्याप कायम आहे. बाबूराव, दाजीबा, मोरोपंत जा, जा, त्यांच्या मागें असा. (जाऊं लागतात.)

(इतक्यांत सत्यभामा केंस विसकटले आहेत पायांत लुगड्याचा घोळ लोळत आहे तिची कावरीबावरी मुद्रा झाली आहे अशी येते.)

सत्यभामा—(मोठ्यानें) फिर्याद, अर्ज, दाद, अहो माझी गरीब बापडीची कोणी फिर्याद ऐकतं कां, कोणी माझी दाद घेतं कां! हाच श्रीमंतांचा दरबारना! इथं माझी कांहीं तरी दाद लागेल. अहो या अनाथ अबलेची कोणी दाद घ्यावो हो घ्या.

एक शिपाई—[पुढें होऊन] अरे ही कोण वेडी येथें आली. अग चल हो पाठीमागें!

सत्यभामा—कारे बाबा, मला पाठीमागें हो ह्मणून ह्मणतोस! मला श्री-

मंताजवळ दाद मागायची आहे ! एका मोठ्या निर्दय चांडाळावर मला फिर्याद करायची आहे ! चल जाऊं दे.

शिपाई—चलहो मागें ! जा नानासाहेबाकडे.

सत्यभामा—(त्रासिकपणानें) कोणाकडेरे बाबा मला जायला सांगतोस, त्या मेल्या चांडाळाकडे ! तो मेला इथंही आहे कां ?

शिपाई—ये, उद्यां विचा ! चल निघ.

सत्यभामा—तो आमचा मागल्या जन्मींचा वैरी इथं असला तर मग माझी कपाळकरंटीची दाद कशाची लागते. तो मेला मांग जर इथं असला तर मला देखील मग इथं उभं राहयचं नाहीं, आणि त्या दुष्टाचं तोंडही पाहावयाचं नाहीं. ही मी निघाले पहा. तो नसेल अशाच वेळेला आणि अशाच ठिकाणीं दाद मागेन. तो मेला काळ इथं असेल ह्मणूनच हे त्या काळाचे दूत मला आडवितात. नाहींतर मला आडविण्याचं या मुर्दाडांचं काय तोंड लागलं होतं ! अहो श्रीमंत, अहो जनहो, ब्राह्मणांना आणि गरीबांना छळणारा, त्यांचा घात करणारा, त्यांची दुर्दशा करणारा जो घाशीराम कोतवाल राक्षस, त्याला तुह्मीं दगडांनीं ठेंचून ठेंचून ठार मारलात ह्मणून तुमचं दुःख कमी झालं असं मुळीं समजूं नका बरं ! कारण हा मेला त्या राक्षसाचा पाठीराखा रक्तबीज राक्षस जोंपर्यंत जिवंत आहे, तोंपर्यंत तुमचं दुःख पहिल्यासारखंच आहे, अथवा त्याला जास्त भरती आली आहे असें समजा ! हा आपल्या सामर्थ्यानं आणखी तसे शेंकडो घाशीराम राक्षस उत्पन्न करील. याचं रक्त जेव्हां कोणी शोषील आणि याचं सामर्थ्य कोणी हिसकावून घेईल तेव्हां तुह्माला सुख लागेल. हें, हे सर्व लोकहो पक्कं लक्षांत ठेवा. नाहींतर आमचं गरीब कुटुंब जसं देशोधडीस लागलं आहे, तशीं तुमचीं शेंकडों गरीब कुटुंबं मातीस मिळतील बरें ! कोणी तुमची दाद घेणार नाहीं. अहो गरीब बापड्यानों, तुह्मी याच्या गोड गोड बोलण्याला, मोठमोठ्या वचनांना भुलून फसूं नका. याच्या झपाट्यांत येऊं नका. याच्यावर विश्वास ठेवून याला देवाप्रमाणें भजूं नका, अहो याच्या दृष्टीस देखील पडूं नका; पडलांत कीं फसलात, आणि फसलात कीं मजप्रमाणें सर्वस्वी बुडालात असें समजा. अ-

न्याय, अन्याय, अरे मांगा—राक्षसा—तुझी देखील शंभर वर्षं आज नाहीं उद्यां केव्हां तरी भरतीलच भरतील. नको, मेल्याचं तोंड पहाणं नको. (निघून जाते.) सर्व जातात.

प्रवेश सातवा.

स्थळ—पर्वतीवरचा शिकारखाना. एकीकडे शंभू नांवाचा वाघ बांधला आहे. चित्ते बांधले आहेत, ससे, हरिणें, मोर नाचत बागडत आहेत. मैना, पोपट पिंजऱ्यांत बोलत आहेत.

पात्रें—श्रीमंत सवाईमाधवराव शिकारखाना पहात पहात येत आहेत, बरोबर मोरोपंत भावे, कोंडाजी, दाजीबा वगैरे मंडळी मागून चालत आहेत.

माधव—(पक्ष्याकडे पहात पहात) अरे वारे वा! मी आल्याबरोबर हे सर्व पक्षी पहा कसे किलबिल किलबिल करूं लागले. (त्यांच्या जवळ जाऊन) हे मैने, ए गंगारामा, ए चंडोला, अरे बोला, आणखी बोला. तुमच्या किलबिलण्यानं मला फार आनंद होतो. तुमच्या सुस्वर आवाजानं माझे कान आणि डोकं अगदीं भरून जाऊद्या; ह्मणजे मला दुसऱ्या कोणत्याही विचाराच्या भणभणण्यानं त्रास होणार नाहीं. हंः, चालूंद्या. चालूंद्या ! माझ्या जवळ येण्यानं जर तुह्माला भीति वाटत असेल तर मी आपला लांब रहातों. वा मोरोपंत, तुह्मी तर आपल्या प्रियकरणीबरोबर खूपच लाडीगोडी लावूं लागलात. पण तुमची कुठं तिच्याजवळ पत आहे. ती पहा कशी ऐटीनं तुह्माला टाकून निघून गेली. आतां बसा स्वस्थ. बरं, तुह्मी आपल्या शब्दानं एकदां हें स्थान गर्जून टाका पाहूं. (थांबून) नाहीं तुमची मर्जी. बरं आहे, आपल्याच मर्जीप्रमाणें होऊं द्या. तुह्मी आमच्यावर रुसलांत ह्मणून काय झालं, त्याप्रमाणं ही दुसरी मंडळी कांहीं आमच्यावर खास रुसणार नाहीं. पहा त्यांनीं कसं आमच्या मनांतलं ताडलं? या पिंजऱ्यांतील पक्षांच्या शब्दांत (नीट ऐकल्यासारखे करून) बराच करुणस्वर ऐकूं येतो, तसा कांहीं त्या पलिकडच्या झाडावर बसलेल्या पक्ष्यांच्या शब्दांत येत नाहीं. याचं कारण काय बरं अ-

सावं ! झाडावरच्या पक्षांपेक्षां हे आमच्या शिकारखान्यांतील पक्षी किती तरी सुखी, किती तरी आनंदी असले पाहिजेत. त्यांचा खाण्याचा, पिण्याचा, राहण्याचा किती छान बंदोबस्त आहे, असं असून मग यांचा करुणस्वर कां ? (विचार केल्यासारखं करून) बरोबर आहे, याचं कारण आतां माझ्या लक्षांत आलं बरं ! हा प्रतिबंध. प्रतिबंध बरं यांच्या करुण स्वराचं आणि सर्व दुःखाचं कारण ! जरी त्यांची येथें अगदीं उत्तम प्रकारची बरदास्त आहे तरी त्यांना स्वतंत्रता नसल्यानें आपल्या मनाप्रमाणें नाचतां बागडतां, उडतां, फिरतां येत नाहीं ह्मणून त्यांना हें सर्व सुख व्यर्थ वाटत आहे, हे त्यांचे जातबंधू त्यांना आपली स्थिती आपल्या शब्दानं दाखवून लाजवीत आहेत. आणि हे करुणस्वरानं मला आळवीत आहेत. ईश्वरानं ज्याला जी देणगी जन्मतः दिली आहे, ती दुसऱ्यानं त्याच्यापासून हिरावून घेण्याचा त्याला काय अधिकार आहे. त्यांतून स्वतंत्रतेसारखी ईश्वरदत्त देणगी हिसकावून घेणं किती भयंकर कृत्य आहे. पण आह्मी मनुष्यं हें भयंकर कृत्य करतो; आणि तें कशाकरितां, तर आमच्या स्वार्थाकरितां ! अंः ! एकाच्या अमोल्य देणगीवर आपल्या सुखाकरितां, आपल्या स्वार्थाकरितां, मनुष्यानं अशा रीतीनं दरोडा घालून ती हरण करणं ह्मणजे यासारखा मनुष्याचा अप्पलपोट्या, स्वार्थी आणि नीच स्वभाव दुसऱ्या कोणाचा नाहीं. जिथं तिथं स्वार्थाचं प्राबल्य आणि तेवढ्याकरितां आह्मी दुसऱ्याचं वाटेल तें नुकसान करायला तयार ! या नीचपणाला तर सीमाच नाहीं ! माझ्या मनरंजनाकरितां हे सर्व बंदिवासांत आहेत अंः ! असला नीचपणा मी कधीं करणार नाहीं. (जाऊन पिंजऱ्याचे दरवाजे उघडतो) जा तुह्माला वाटेल तिकडे जा, आणि स्वच्छंदानें हवे तिकडे उडा. फिरा.

मोरोपंत—रोजची कांहीं तरी विचित्र कृती ! कोंडाजी, श्रीमंताची स्वारी पुढें गेली ह्मणजे त्या रखवालदारास हळूच सांगून पुन्हा तीं दारं बंद कर बरं ! नाना रागावतील.

कोंडाजी—जी व्हय !

माधव—(त्यांना हुसकावून लावतो) मनुष्याप्रमाणें त्यांना त्यांच्या

प्रतिबंदाचं दुःख होत नसेल कां! पण आपल्या फायद्यापुढें दुसऱ्याच्या दुःखाचा विचार कोण करतो! असला नीचपणा मनुष्यांतच भरला आहे. (पुढें वाघाजवळ जातो) खायला, प्यायला, वगैरे सर्व गोष्टी मनुष्याला काय, अगर पशूला काय, यथास्थित असोत, अगर नसोत; कोणालाही स्वातंत्र्यासारखी मजा नाहीं, आनंद नाहीं आणि बलही नाहीं. पारतंत्र्यासारखं दुःख नाहीं, आणि पारतंत्र्यासारखा मोठ्या बलवानाला आणि मोठ्या शहाण्याला बलहीन करणारा आणि मतिमंद करणारा दुसरा रोगही नाहीं. हे मृगराज, जेव्हां अरण्यांत स्वतंत्रतेनं विहार करीत होते, तेव्हां यांचं बल केवढं होतं; एका गर्जनेबरोबर सर्व रान गजबजून टाकून शेंकडो जणांना थरथर कांपवून सोडीत होते, पण तेच हे मृगराज, पारतंत्र्याच्या साखळदंडांनीं दोहोबाजूंनीं जखडून टाकल्यामुळें कसें अगदीं दीन गाय होऊन गेले आहेत. पारतंत्र्यबंधानं मोठमोठ्याचीही अशी दीन अवस्था होते. पहा बिचारे कसे आपल्या दुःस्थितीबद्दल दुःख करीत आहेत. पण, अहो राजश्री आपल्याला देखील आह्मी जोडीदार आहोंत. बाबासाहेबांनीं एका पत्रांत लिहिल्याप्रमाणें त्यांची शिवनेरीस, माझी पुण्यास आणि या पशुपक्ष्यांची या शिकारखान्यांत सर्वांची स्थिती सारखीच आहे. फक्त स्थळाचं मात्र अंतर! मृगराजा, तुला तर दोनच बंदांनीं बांधलं आहे, पण मला आंतून आणि बाहेरून शेंकडों बंदांनीं जागजागीं अगदीं जखडून टाकलं आहे. तुला पहाण्याकरितां जसें शेंकडो जण येतात, तसं आमचंही प्रदर्शन होत आहे. हीं माझी बंधनें मी आधीं फेंकून मोकळा होतों आणि मग तुलाही मोकळा करतों. (अंगावरचे दागिने, कंठी, कडी काढून फेंकून देतों, व वाघाजवळ जातो.) (इतक्यांत मोरोपंत, कोंडाजी वगैरे जवळ जाऊन त्यांस मागें ओढतात.)

मोरो०—(घाबरून) श्रीमंत, सरकार हें काय! मागें सरावें तो पंजा मारील.

माधव—(संतापानें) काय, मला पेशव्याला जिथें तिथें तुमचा प्रतिबंध! तुह्मी इथें कशाला आणि कोणाच्या हुकूमानं आलांत?

मोरो०—श्रीमंताच्या रक्षणाकरितां, नानाच्या हुकुमानं! श्रीमंतांची प्र-

कृती बिघडली आहे, तेव्हां श्रीमंतांवर सक्त देखरेख ठेवावी, असा आह्माला हुकूम आहे.

माधव—तर मग तुह्मी माझ्यावर पाळत राखणारे गुप्त हेर आहांत अं: ! अरे काफरानों आतां हेराचीं सोंगं आणलीत काय ? हिंडण्या फिरण्यांत; बसण्यांत उठण्यांत, जेवणाखाण्यांत, प्रत्येक गोष्टींत माझ्यावर देखरेख ठेवण्याबद्दल तुह्माला नानांचा हुकूम आहे ! ज्या गोष्टी लहान मुलाला सुद्धां सहज करतां येतात, त्या मला बरोबर करतां येत नाहींत इतका मी अजागळ, बैल आहे, असं तुह्माला वाटून तुह्मी मला त्यांच्या हुकूमानं प्रत्येक गोष्टींत प्रतिबंध करता ! जसा तुह्मी मला समजता तसा मी नाहीं; समजलांत. चला चालते व्हा येथून. निघा, निघा. नाहींतर—(दांत ओंठ चावतो.)

मोरो०—सरकारांनीं आमचे प्राण घेतले तरी आह्मी सरकाची पाठ सोडणार नाहीं आणि हुकूमाबाहेर चालणार नाहीं. आह्मी ताबेदार आहोंत.

माधव—(त्रासून) माझं मन, माझं शरीर, माझे हातपाय याची काळजी दुसऱ्यानं घ्यायची, मी दुसऱ्याच्या संमतीनं कोणतीही गोष्ट करायची, प्रत्येक वेळेला मला दुसऱ्याचा हुकूम पाहिजे अं: ! हें देखील तुझं तुला संभाळतां येऊं नये, इतका बैला, अजागळा, तूं कसा झालास ! तूं अजागळ आहेस ह्मणून तुझी अशी दशा ! त्यापेक्षां असा एखादा जंगलातला हिंस्त्र पशु झाला असतास तर फार चांगलं झालं असतं, ह्मणजे तुला ही तमासगीर मंडळी कांहीं तरी भ्यायली असती. तूं खरोखर बैल आहेस, ह्मणूनच तुझी वेसण जिकडे ओढली जाईल तिकडे तुला गेलें पाहिजे. चला, बैलोबा चला.

(सर्व जातात.)

प्रवेश ८ वा.

स्थळ—यशोदाबाईचा महाल.

पात्रें—यशोदाबाई आणि मैना.

यशोदा—गडे मैना, तिकडच्या प्रकृतीचं मान मला घटकोघटकीं कळवीत जा. मी त्याबद्दल तुझी मोठी उतराई होईन. दसऱ्याच्या दिवशीं अंबारींतून

उडी टाकायला जाणं, आणि काल संध्याकाळीं त्या शिकारखान्यांत जाऊन त्या शंभू वाघापुढें उभं राहणं; वगैरे गोष्टी ऐकून माझं काळीज किनई चर्र होऊन गेलं आहे. आह्मां मुलींना सर्व गोष्टींची चोरी असल्यामुळें आह्माला तुमच्या सारख्याच्या मार्फतच या सर्व गोष्टी करून घ्याव्या लागतात. मैना, जा, जा, आणि आतां प्रकृती कशी आहे याचा शोध करून ये. तुझ्याशिवाय ही माझ्या मनांतील गोष्ट मी दुसऱ्या कोणाजवळ सांगूं? दुसऱ्या कोणाजवळ ही बोलेन तर तर सर्वजण माझी थट्टा करतील. पण गडे मनांत काय होत आहे तें किनई सागतां येत नाहीं ग! तूं आपल्या मनांत मला आतां वाटेल तें ह्मण. पण मी तुझ्याजवळ आज माझा नाईलाज झाल्यामुळें थोडीशी निर्भीड झालें खरी. बाई—काय—करूं—ग एकेक भयंकर प्रकार रोजचे ऐकतें त्यामुळें राहावत नाहीं ग! (डोळे पुसते.)

मैना—बाईसाहेब इतकी कांहीं काळजी करायला नको. स्वस्थ असा, मी आतां जाऊन शोध करून येतें.

यशोदा—अग काळजी करायला नको आणि हवी, या गोष्टी कोणी सांगून कां करतं! जा, गडे जातेसना!

मैना—अहो जातें! जातें पण इतक्या उतावीळ कां होता? (हांसते.)

यशोदा—जा, जा लवकर, मग पाहिजे तर कर थट्टा!

मैना—(जाऊं लागते. इतक्यांत केंस पिंजारलेली, कावरीबावरी मुद्रा झाली आहे अशी कडेवर मूल घेतलेली सत्यभामा येते) ही वेडी पिशी बाई कोण! आणि ही इथं कशाला आली.

सत्यभामा—(केविलवाण्या मुद्रेनें) अहो बाई, राणीसाहेब कोणच्या. त्या कुठं आहेत, त्या मला दाखविता काय? त्या जिथं असतील त्या ठिकाणचा मला रस्ता दाखवितां कां? मी किनई गांजलेली, त्रासलेली, जुलमानं कहावलेली, त्या मेल्या चांडाळ कुटिल, निर्दय कारभाऱ्यानं, अन्याय केल्यामुळं संतापलेली, आणि कोणी माझी दाद घेत नाहीं, ह्मणून वैतागून बहकून गेलेली, अशी मी एक गरीब बिचारी आहे बरं! मला त्या मांगाविरुद्ध त्यांच्याकडे फिर्याद करायची आहे. त्या माझी दाद खास घेतील. अहो तुह्मी

माझ्याकरितां त्यांना दोन गोष्टी सांगा बर कां! सांगाल कां ? तुमच्या तों-डावरून तर तुह्मी चांगल्या ममताळू आहांत असं दिसतं. हें माझं वाटणं तुह्मी आपल्या कृतीनं खरं करून दाखवा, नाहींतर सगळंच उलट करून मला फसवाल. तुह्मी माझं एवढं काम केलंत ह्मणजे मी तुह्माला हा माझा सोन्याचा तुकडा देईन बरं. नाहीं, नाहींग बाई मी आपला हा सोन्याचा तुकडा तुह्माला द्यायची. हा तुमच्या दृष्टीस पडला ह्मणजे मग तुह्माला हा घेण्याची इच्छा होईल. तेव्हां तुमच्या हा दृष्टीस पडूं नये ह्मणून मी याला अगदीं लपवून ठेवीन. मी माझ्या हृदयांत याला ठेवीन. (मुलाला पदराखा-लीं लपविते) याबद्दल मी तुह्माला माझे पाहिजे तर प्राण मोठ्या मोठ्या आनंदानें देईन बरं कां! त्याला नाहीं मी कधीं मागं सरायची! कुठं कुठं आहेत राणीसाहेब, मला लवकर दाखवा. कां नाहीं दाखवीत. ठिकाण दाख-वायला देखील तुमच्या पदरचं कांहीं वेचतं. तुह्मी दाखवीत नसाल तर मी इथूनच त्यांना ऐकूं जाईल असं ओरडतें. (मोठ्यानें) अन्याय, जुलूम, बाई-साहेब, जुलूम हो जुलूम. माझी दाद घ्याहो.

मैना—अग ए वेडे, या बाईसाहेब इथंच आहेत. तुला दिसत नाहीं कां! उगीच ओरडतेस कां राक्षसणीसारखी.

सत्यभामा—होय कां! ह्या कां त्या! (त्यांच्याजवळ जाऊन त्यांच्या पायावर डोके ठेवते) बाईसाहेब आपल्या येथील एका मोठ्या निर्दय मांगा-नं आमच्या गरीब कुटुंबावर आग पाखडली आहे हो! त्यांनं आह्मी अगदीं होरपळून गेलों आहोंत, आमचा कोणी वाली नाहीं, आमची कोणी दाद घेत नाहीं, आमची कोणाला दया येत नाहींहो. बाईसाहेब करतां कां कृपा! आपल्या पतीच्या जिवाला कांहीं बरं वाईट झालं, त्यांच्या पंचप्राणांची ती आपली ठेव कोणी निर्दय राक्षस जर हरण करून घेऊन जाऊं लागला तर त्याबद्दलचें दुःख बायकांना किती होतं, हें बायकाशिवाय दुसऱ्या कोणाला तरी चांगलं कळेल कां ? ह्मणून मी आपल्याकडे आलें आहे हो! तो मेला पेशव्यांच्या दरबारांतला मोठा राक्षस फार माजला आहे. त्याला चांगली शिक्षा करा.

यशोदा—मैना ही कोण ग बाई ! ही काय हें बडबडतें.

मैना—बाईसाहेब ही कोणी तरी वेडी बाई आहे. ही इथं आली कशी ! (तिच्याकडे वळून) ए वेडे, तूं दरबारांत जाऊन नानासाहेबापाशीं फिर्याद कर ! ते तुझी दाद घेतील. जा येथून. तुझं काम इथून व्हायचं नाहीं.

सत्यभामा—(त्रासून) कोणापाशीं, त्या मांगापाशीं, त्या काळापाशीं त्याच्याचबद्दल फिर्याद नेऊं. अहो त्यानंच तर सर्व अनर्थ केला आहे. त्यानंच आमच्या सर्व घराला आग लावून आम्हाला भाजून टाकलं आहे. तुम्हीच माझं ऐका. मी तुमच्या पाया पडते हो ! (तिचे पाय घट्ट धरते, मैना जोरानें त्यांचे पाय सोडविते) तुम्ही माझं ऐकत नाहीं तर मी येथून हालणार नाहीं.

मैना—बाईसाहेब चला येथून ! ही वेडी तुम्हाला त्रास देईल. मी खालीं जाऊन शिपायाकडून हिला बाहेर घालवून लावते. (दोघी जातात.)

सत्यभामा—बाईसाहेब, ऐकाहो ऐका, माझी गरीब बापडीची एक फिर्याद ऐका ! दोघीजणी आपण एकच आहोंत ! [धांवत मागें जातें, तो मैना तिला ढकलून देतें.] [त्रासून] ही मोठ्या लोकाजवळचीं कुत्रीं अशींच मेलीं द्वाड असतात. यांचा कांहींएक चांगला उपयोग नसून हीं नुसतीं अंगावर येण्याच्या व भोंकण्याच्या मात्र उपयोगाचीं ! हा मेल्या निर्दया दुर्दैवा इथंही तूं आपला थोडासा प्रभाव दाखविलासना ! बरं इथं माझी दाद लागली नाहीं तर श्रीमंत पंतप्रधानाजवळ जाऊन मी दाद मागेन ! [वर पाहून] अहाहा, किती आनंद ! केवढा सुदीन. ती पहा स्वारी तेथें माडीवर उभी आहे. थांब मेल्या, तिथं जाऊन फिर्याद करतें आणि मांगा तुझी चांगली खोड मोडतें. [जाते.]

प्रवेश ९ वा.

स्थळ—गणपतीचा दिवाणखाना.

पात्रें—श्रीमंत माधवराव पेशवे माडीवर कठड्याला टेंकून बाहेर पहात उभे आहेत, जवळ सत्यभामा मुलाला घेऊन हात जोडून विनंति करीत आहे.

सत्यभामा—एवढा वेळ मीं सरकारची विनवणी केली, पण सरकारकडून कांहींच जाब येत नाहीं, त्यावरून याही ठिकाणीं माझ्या अभागिणीच्या कमनशिबानं आपला प्रभाव दाखविला ह्मणायचा! सरकारच्या दयाळूपणाबद्दल आणि न्यायीपणाबद्दल पुण्यांतील सर्व लोकांची घाशीरामाला सरकारांनीं दिलेल्या शिक्षेमुळें खात्री झाली आहे. असं असून माझ्यासारख्या दीन बापडीला तो अनुभव जेव्हां येत नाहीं, तेव्हां माझंच नशीब फुटलं याशिवाय दुसरं काय? सरकार, आमच्या तीन माणसांच्या गरीब कुटुंबावर, सरकारची कामगिरी इमानदारीनें केल्याबद्दल आग, आग, नानांनीं आग पाखडली आहे. सरकारचं आणि त्यांच्या आप्ताचं सख्य करून दिल्याबद्दल, नानांनीं निर्दयपणानं आमची तिघांची ताटातुट केली. दोन निरनिराळी असलेलीं कुटुंबं एक करण्याची पागेदारांनीं खटपट केली ह्मणून नानांनीं आमच्या कुटुंबाचा सत्यानास केला. आप्ताआप्तांचं कुशल वर्तमान एकमेकांना कळवून त्यांचे निरोप आणि भेटी परस्परांस सांगून दिल्याबद्दल त्यांच्या पायांत जड बिड्या घालून नानांनीं कैदेंत टाकलं, आणि प्राणांतापर्यंत वेळ आणली, तरी देखील त्यांची इच्छा तृप्त झाली नाहीं व त्यांचं मन व राग शांत झाला नाहीं. आह्मा तिघांना एके जागीं उभं जाळून टाकल्यावर मग नानांचं मन शांत झालं तर कोण जाणें! हें सर्व सरकारच्या कामाबद्दल पागेदाराना आणि त्यांच्या कुटुंबाला बक्षिस मिळालं बरं!

माधव—(आपल्याशीं) ह्या बाईचा प्रत्येक शब्द माझ्या काळजाला घरे पाडीत आहे; त्यामुळें मला अत्यंत वेदना होत आहेत, पण काय करूं?

सत्यभामा—सरकार ज्याअर्थी बोलत नाहींत; त्याअर्थी नानांनीं के-

लेली गोष्ट सरकारास पसंत पडली असं वाटतं. माझ्या गरीब बापडीच्या विनंतीकडे सरकारचं लक्ष कां जात नाहीं? कोणी माझं ह्मणणं ऐकेना, कोणी माझी दाद घेईना, कोणीं माझा न्याय करीना, ह्मणून निर्भीड होऊन मी सरकाराजवळ दाद मागण्यास आलें; पण त्याही ठिकाणीं माझी निराशा झाली. माझ्या येथील प्रयत्नाची आतां इथंच आखेरी झाली. सरकार बोला, माझ्या विनंतीला मान द्या, पागेदारांना आपल्या कामगिरीबद्दल झालेली शिक्षा अगदीं योग्य झालीना? तो अगदीं न्याय झालाना? आपल्या मोठ्यांच्या मुक्याच्या व्रतानं आमची गरीबाची कोण दुर्दशा, कोण दैना होत आहे आणि आमचे प्राण कसे कासाविस होत आहेत, हें सरकार आपल्याला कशानें कळणार?

माधव—(तोंड वळवून आपल्याशीं) बाई, माझे देखील प्राण कसे खालवर होत आहेत हे तुला तरी कसे कळणार! हिची स्थिती माझ्यानें पहावत नाहीं, व हिचे शब्द आतां माझ्या कानांनीं मला ऐकवत नाहींत! (उघड) अरे—

सत्यभामा—(त्रासून आणि निराशेनें) आपल्या पतीनं मारलं, पावसानं झोडपलं, राजानं लुटलं तर तें कोणाजवळ सांगायचं, आणि त्याचं निवारण तरी कोण करणार? सरकारनीं माझ्याकडे पाठ फिरविल्यावर माझी आतां दाद कोण घेणार! सरकार, पागेदारांनीं आपले निरोप बाजीरावास व बाजीरावांचे सरकारास, पोंहचविले हा त्यांनीं राजद्रोहाचा गुन्हा केला असें सरकारास वाटतं, कीं सरकार नानांस भितात? काय होतं तें एकदां स्पष्ट कळलं पाहिजे. एकमेकांचं सख्य करून दिल्याबद्दल कुठं अपराध होत नाहीं, पण पेशवाईत आणि नानांच्या घरीं मात्र तो गुन्हा होतो, व तो गुन्हा करणाऱ्यास जन्मभर कैदेची शिक्षा मिळते. हें, सर्व स्त्रियानों, तुह्मी चांगलं लक्षांत ठेवा आणि आपापल्या पतीस असा गुन्हा त्यांच्या हातून न होईल असा उपदेश करा; नाहींतर, साध्वी स्त्रियांनों, तुमची स्थिती माझ्यासारखीच होईल. बाजीरावसाहेबाना आपला बेत कसा फसला ह्मणून, आणि आपण या कामांत पडलों ह्मणून आपली ही अशी दशा झाली, असें

समजण्याकरितां पागेदाराच्या हातापायांत वजनदार बिड्या ठोकून पिंजऱ्यांत त्यांच्या समोर ठेवून एकमेकांच्या दुःखावर डाग देणारे कसाईपेक्षां कसाई आणि निर्दय एक नानाच! आणि त्यांचं करणं तें योग्य आहे, असं समजून आपल्या कामाकरितां दुसरा बळी पडला असतां त्याची कांहीं तजवीज न करणारे असें मायाळू व थोर प्रभू एक श्रीमंत पंतप्रधान पेशवे सरकारच! पागेदार जात्या अशक्त, त्यांत त्या वजनदार बिड्यांचं ओझं, ती कैदेंतील हाल अपेष्टा त्यांच्यानं सहन होईनात, एवढी निकराची वेळ आली ह्मणून मी निर्भीड होऊन सरकाराजवळ दाद मागण्यास आलें, तों मला पेशव्यांच्या न्यायी दरबारीं, आणि श्रीमंताजवळ मज्जाव. माझ्या सौभाग्याकरितां मी निर्भीडतेनं वाटेल तें करीन, वाटेल तेथें जाईन, कधींही भिणार नाहीं. माझ्या सौभाग्य दागिन्याकरितां माझी धनदौलत, माझं पोटचं मूल, माझे प्राण वाटेल त्या क्षणीं मी देण्यास आणि त्याचं रक्षण करण्यास तयार आहे. पेशव्यांच्या दरबारीं, खुद्द पेशव्याजवळ, आणि जगांत कुठेंही जर माझी दाद लागत नाहीं तर ज्या प्रभूजवळ नानासारख्या निर्दय मांगाची, पेशव्यांच्या दरबारची, खुद्द पेशव्यांची आणि माझीं एकेच वेळीं दाद लागेल आणि सर्वांचा सारखा न्याय होईल त्याच ठिकाणीं मीं आतां जाईन, आणि देवापाशीं दाद मागेन. त्याच्या दरबारीं तर मला मज्जाव होणार नाहीं! प्रत्येक ठिकाणीं निराशा झाल्यावर मग तसं केल्याशिवाय गत्यंतरच नाहीं. चहूंकडे माझी निराशा व्हावी, अशी मी फुटक्या नशिबाची कशी झालें? बाळा, तूं देखील आमच्याच सारखा दुर्दैवी झालासना! आह्मी उत्तम कामगिरी केल्याबद्दल आह्माला देहान्त शासन, हा पेशवाईतला न्याय सर्व लोकांनीं ध्यानांत ठेवा बरें!

माधव—(आपल्याशीं) तुझ्यापेक्षां हा पोरका माधव किती दुर्दैवी आहे, हें बाई तुला कशानें समजणार?

सत्यभामा—श्रीमंत सरकार, पागेदारांनीं आपली कामगीरी आपल्या मर्जीप्रमाणें केली ह्मणून ते कैदेंत पडले. ते कैदेंत पडले ह्मणून त्यांची हीं दोन माणसें दाहीं दिशेला लागली. श्रीमंत बाजीरावसाहेब यांनीं श्रीमंत

आपले आप्त समजून त्यांच्याशीं आप्तपणा जोडण्याची खटपट केली, ह्मणून त्यांना पूर्वींपेक्षां जास्त बंदीवास झाला, व दुःख सोसावं लागलं. श्रीमंतांनीं आपल्या आप्ताचं, आपल्या मित्राचं, जो इमानदार चाकर आपल्याकरितां मनोभावानं झटला त्या चाकराचं, व त्याच्या गरीब कुटुंबाचं हातीं सत्ता असून दुःख कमी केलं नाहीं व त्याची दाद घेतली नाहीं; त्यामुळें श्रीमंतांची आपल्या आप्ताबद्दलची आस्था, आपल्या मित्राबद्दलची कळकळ, माया, दया, न्यायीपणा वगैरे सर्व श्रीमंतांचे अमोल्य गुण आतां सगळ्या जगाला दिसले. श्रीमंताच्या कामगिरींत जर पागेदार आणि बाजीरावसाहेब न पडते तर आह्मी सर्वजण आपापल्याजागीं मोठे सुखी असतो. पण श्रीमंतांकरितां आह्मी सर्वजण दुःखांत पडलों. श्रीमंताची कामगिरी हें सर्व दुःखाचं मूळ आहे. अंगीं सामर्थ्य असून ज्याच्या हातून आपल्या आप्ताचं बरं होत नाहीं, त्यांचं संकट व दुःख दूर होत नाहीं; गरीबावर, निदान आपल्या कामाकरितां दुसऱ्याकडून जुलूम झाला असतां ज्याच्या हातून त्याची दाद घेतली जात नाहीं, उलट त्यांच्या दुःखाला मात्र जो मूळ होतो, तो असा आप्त, असा मालक, आणि असा राजा तरी होतो कशाला? बाजीरावाचा बंदीवास, पागेदाराच्या कैदेंतील हाल अपेष्टा, आणि निराशा झाल्यामुळें माझ्या मनाला होणाऱ्या दुःसह यातना; श्रीमंतांनीं आमची दाद न घेतल्यामुळें जरी अगदीं कळसास जाऊन पोंहचल्या आहेत, तरी त्यांचं मृत्यूपुढें कांहीं चालणार नाहीं. या जगांतील संकटांनीं मनाला झालेला त्रास घालविण्याला मृत्य शिवाय दुसरा उपाय नाहीं. पागेदार थोडक्याच दिवसाचे सोबती असल्यामुळें त्यांचा कैदेंतील त्रास लवकरच नाहींसा होईल; पुण्याला पावन करणाऱ्या नदी देवीनं मला आपल्या पोटांत घेतलं ह्मणजे माझ्याही यातना संपतील; पण श्रीमंताच्या न्यायीपणाचा, ममताळुपणाचा आणि थोरपणाचा, पागेदाराच्या कुटुंबाच्या नाशामुळें वाजलेला डंका मात्र सर्व काळ सारखा वाजत राहील. (मुलाकडे पाहून) बाळा, माझ्याकडे आतां कशाला पहातोस? तुझा माझा संबंध आतां फार थोडा आहे. आमच्या मागं तूं पोरका होशील; त्या तुझ्या पोरक्याचं शकुंत पक्षाकडून, देवानं जसं शकुंतलेचं राना-

वनांत रक्षण केलं तसंच तो तुझंही करील. तूं दैवयोगानं जगून जर मोठा
झालास तर रानांत राहून फळावर आपलं पोट भर, अगर भीक मागून आ-
पला जीव जतन कर, पण तूं आपल्या पोटाकरितां, पेशव्याचा इमानदार
चाकर होऊन, तूं आपल्या वडिलाप्रमाणें मात्र इमानदारीनं चाकरी करूं न-
कोस बरं ? नाहींतर तुझ्या वडिलाप्रमाणें तूंही राजद्रोही ठरून फुकट फुकटरे
पेशव्यांच्या कैदखान्यांत पडून मरशील. (रागानें) ज्या माझ्या दुष्ट कपा-
ळानं माझी चहूंकडे निराशा करून मला यमयातना इथेंच भोगायला लाव-
ल्या, तें हें माझं कपाळ या ठिकाणीं असें आपटून त्याच्या चिंधड्या
करून टाकल्या ह्मणजे माझं दुःख संपलंच; पण श्रीमंत, आपल्या आणि त्या
मांगल्हृदयीं नानाच्या मनाचं एका गरीबाच्या कुटुंबाची वाताहात करून तरी
समाधान होऊंद्या. ह्मणजे झालं! (डोकें ताडताड भूमीवर आपटते आणि पडते.)

माधव—(घाबरून आणि त्रासानें) अरेरे, काय करूं! नाहीं हें मा-
झ्यानं पहावत. यांच्या मस्तकाच्या घावाबरोबर वज्रघाताप्रमाणें माझ्या अंतः-
करणावर घाव पडून त्याचे तुकडे तुकडे होत आहेत. त्यांच्या प्रत्येक शब्दा-
नं, तापवून लाल लाल सांडशीनं माझ्या काळजाला चराचर चरके बसल्याप्र-
माणें होऊन मला यमयातनापेक्षांही दुःसह यातना होत आहेत. त्यांचा दुः-
खितार्त स्वर, कडकडीत तापलेलं तेल कानांत ओतल्याप्रमाणें होऊन माझं
सर्व डोकं भाजून टाकल्यासारखें करीत आहे. त्यांच्या क्रोधयुक्त दृष्टीनें वि-
स्तव लावून दिल्याप्रमाणें माझ्या अंगाचा भडका करून दिला आहे. इतका
ताप मी कसा सहन करूं! (थांबून इकडे तिकडे फिरून) हा ताप नाहीं-
सा होण्याला त्यांनीं सांगितलेल्या मृत्यूशिवाय आतां दुसरा उपायच राहिला
नाहीं! बाबासाहेब, आप्पासाहेब, यशोदे, बलवंतराव, तुमच्या सर्वांच्या
आणि तुमच्या कुटुंबाच्या दुःखाला हा अभागी माधव सर्व प्रकारानं कारण
झाला. ज्याला स्वतांला कांहीं करतां येत नाहीं, ज्याचा स्वताचा स्वतांला
कांहीं उपयोग नाहीं, सर्व गोष्टींत दुसऱ्याच्या तंत्रानें पशुप्रमाणें चालणारा,
स्वार्थ आणि परमार्थ कांहींएक न साधणारा आणि उलट आपल्या आप्त-
स्वकीयांच्या दुःखाचं मूळ होऊन बसणारा; असा अजागळा माधवा, तूं कसा

झालास ? मजसारख्या मतिमंदाचा या जगांत कांहीं उपयोग झाला नाहीं तरी यमाच्या घरीं माझा कांहीं उपयोग होईल खास! निदान मी त्याच्या घरीं गेलों तर माझ्या मनाला होणाऱ्या वेदना तरी तो खास कमी करील! बलवंतराव, अहो बाई, काय तुह्मी माझ्या आधीं त्या मृत्यूच्या घरीं जाऊन स्वस्थ विश्रांति घेणार ? छे, ती गोष्ट कधीं होणार नाहीं, मी ती तुह्माला कधीं क-करू देणार नाहीं. तुह्माला माझा माधवराव पेशव्यांचा हुकूम ऐकलाच पाहिजे. चला फिरा मागें! काय तुह्मी मागं फिरत नाहीं? तसेंच तुह्मी पुढें चाललात! अशी वस्तादगिरी पेशव्याशीं! मी असा वस्ताद आणि आपस्वार्थी आहे कीं, त्यापुढें तुमची वस्तादगिरी कांहींच चालणार नाहीं. थांबा, थांबा, जर तुह्मी न थांबून माझ्या आधीं जाल. तर मी धांवत धांवत येऊन तुमच्यापुढें जाईन; पाहूं बरें आधीं त्या विरामस्थानीं कोण जाऊन पोंहचतों. हा पहा तुमच्यापुढें, हा असा मी जाणार! आतां बसा खुशाल रडत. (एकदम जाऊन उडी टाकतो; इतक्यांत मोरोपंत भावे व कोंडाजी ओरडत येतात.)

दोघे—(मोठ्यानें) घात, घात, श्रीमंत पडले. धांवा, धांवा.

(दोघे जातात.)

प्रवेश १० वा.

स्थळ—शनवारचा वाडा.

पात्रें—बाबूराव फडके येतो.

बाबूराव—(दुःखानें) आजचा आह्मा महाराष्ट्रीयांना हा असा दुर्दिन उगवेल, असं कधीं स्वप्नांत सुद्धां आमच्या आलं नाहीं. आज सूर्यनारायणानं आपल्या बरोबर आमचा महाराष्ट्राचा वैभवरवी अस्तास नेऊन आह्मा सर्वांना गाढ अंधारांत लोटून दिलं! हे नारायणा, तुझी चार प्रहर रात्र सरल्यानंतर तूं उद्यां सकाळीं पुन्हां उदयाला येऊन सर्व जगाला अंधाऱ्या रात्रीमुळें झालेला ताप नाहींसा करून आनंदीत करशील, पण आह्मां महाराष्ट्रीयांचा वैभवरवी पुन्हां केव्हां उदयाला येऊन आह्मा सर्वांना आनंदीत करील तो करो! सध्यां मात्र आमच्या दुर्दैवाच्या गाढ अंधाऱ्या रात्रीला आरंभ झाला.

नशीब, आमचं सर्वांचें नशीब मुळीं खोटं त्याला दुसरा काय करणार! हे दुर्दैवा—(कपाळावर हात मारतो.) (इतक्यांत नाना फडणवीस घाईनें येतात, बाबूराव त्यांस पाहून मोठ्यानें ओरडून रुदन स्वरानें) नाना, नाना, घातहो घात, त्या निर्दय कालानं सर्वस्वी घात केला. श्रीमंतांनीं आह्मा सर्वांना मागें टाकून, अनाथ करून आपण एकट्यांनीं कैलासवास केला.

नाना—(दुःखानें) हाय, हाय, काय हा अकल्पित घाला! [मूर्च्छित पडतात.]

बाबूराव—श्रीमंत, मैत्रीची अखेर अशा रितीनं केलीत अं:! बाजीरावाचं आपल्याला स्मरण झालं, त्यांची व्यवस्था आपण सांगितलीत, पण आमची व्यवस्था आपण कोणाला सांगितलीत? आह्मा सर्वांना कोणाच्या स्वाधीन केलंत?

नाना—(अंमळ सावध होऊन दुःखानें) हे अभाग्या थेरड्या, तूं अजाप जगलास कसा! आणि आतां तुझ्या जगण्याचा उपयोग तो काय? जगून तूं आणखी काय करणार? मी आज असं करीन, उद्यां तसं करीन, असें नानातऱ्हेचे मनांत बेत करणं किती मूर्खपणा आहे. नानातऱ्हेचे खेळ खेळून जो अखेरी चांगली साधतो तोच खरा शहाणा, आणि तोच खरा भाग्यवान. नानासाहेबांच्या वंशवृक्षाच्या फांद्या दुर्दैवाच्या झंझावातानें एकामागून एक कडाकड मोडून तो वृक्षही मुळासकट उलथून पडला. सुदैवानं एका मुळाला पाणी घालून, कोंब आणून त्याचा पूर्वीप्रमाणें प्रचंड, घनदाट असा; सर्व महाराष्ट्रीयांना त्याच्या सावलींत बसून विश्रांति आणि सुखोपभोग घेण्याकरितां, वृक्ष बनविण्याची खटपट करीत होतो, पण तें आमच्या दुर्दैवाला सहन झालं नाहीं. दादासाहेब, हैदरनाईक, टिपूसुलतान, वस्ताद फिरंगी, कावेबाज मोंगल वगैरे लोकांच्या खोडी मोडून, खर्ड्याच्यावेळीं सर्व महाराष्ट्रवीराना एका छत्राखालीं आणून महाराष्ट्रांतील एकीचा प्रभाव, व श्रीमंत छत्रपती आणि पेशवे यांचा दरारा दाखवून मराठ्यांचा ध्वज उभारला व सर्वांना स्वराज्याचें सुख लागावं ह्मणून पुष्कळ खटपटी केल्या, पण त्यांचा कांहीं उपयोग झाला नाहीं. आमच्या नशिबीं दुःखच भोगायचं आहे. श्रीमंत सवाई माधवराव पेशव्याची अंमलदारी सर्वांपेक्षां सवाई करून दाखवीन अशी मला

मोठी उमेद होती, पण ती पार खचून गेली. रघुनाथराव, आनंदीबाई, आणि त्यांच्या पुढील वंश याबद्दल माझी जी कल्पना होती ती खरी ठरूं नये, त्या विषवल्लीचा नुसता संसर्ग देखील होऊं नये, या नवीन लावलेल्या रोप्याला कीड लागूं नये एवढ्याचकरितां मोठ्या दक्षतेनें त्याच्यावर नजर ठेविली असतां, अखेरीस त्या विषारी किडीनं तो रोपा पार खाऊन टाकला. माझे हेतू त्यांना कळाले नाहींत. निव्वळ गैरसमजुतीचा हा दुर्धर पारिणाम होऊन या वृद्धावस्थेंत माझ्या तोंडाला काळं लागलं. बापू तुमची केवढी पुण्याई, तात्या तुह्मी केवढे भाग्यवान, पाटीलबोवा तुमचें नशीब केवढं थोर, सुभेदार तुह्मी दैववान ह्मणून तुह्मा सर्वांना हा आजचा दुर्दिन पाहण्याची पाळी आली नाहीं! बापू ऐन आणिबाणीच्या प्रसंगीं मला धैर्य देऊन तुह्मी चांगली मसलत दिलीत, तात्या, पाटीलबोवा, सुभेदार, तुह्मी सर्वांनीं मोठमोठ्या प्रसंगीं मराठी राज्याकरितां जिवापाड श्रम केलेत आणि माझी प्रत्येक वेळीं पाठ राखलीत, पण आतां असल्या भयंकर प्रसंगीं मला योग्य सल्लामसलत कोण देईल, आणि माझी पाठ तरी आतां कोण राखील. तुमचे सर्वांचे देह मराठी राज्याच्या वृद्धीकरितां खर्च झाले, तुह्मी सर्वजण अखेरी उत्तम साधून अक्षय्य स्वर्गसुख भोगण्यास चालते झालांत आणि मला पाप्याला हा दिवस पाहण्याकरितां मागें टाकलेंतना? अहो माझी सर्व धनदौलत, माझे प्राण, सर्व महाराष्ट्रांतील संपत्ती, सर्व मराठी राज्य वाटेल तें घ्याहो, पण माझे श्रीमंत, माझे यजमान मला कोणी परत द्या, निदान त्यांचें मला एकदां हास्यमुख तरी पाहूं द्या. त्यांच्या चरण प्रतापानें सर्व मराठी राज्य जरी गेलें असलें तरी त्याच्या दसपट राज्य थोडक्याच वेळांत पुन्हां जिंकण्याची या म्हाताऱ्याच्या अंगांत अजून धमक आहे; पण त्या माधव राजाखेरीज सर्व व्यर्थ हो व्यर्थ! हे पाप्या, चांडाळा, अधमाधमा, घातारड्या, ज्या हातांनीं ' माधव राज्यारोहणाचा ' समारंभ केला, त्या हातांनीं 'माधव निधना' नंतरची तयारी करण्याला अद्याप जेव्हां कायम राहिले, तेव्हां ते गळून तुटून जळून कां नाहीं गेले. ज्या डोळ्यांनीं ' माधवराज्यारोहण ' पाहिलं त्या डोळ्याला ' माधवनिधन ' पहाण्याची पाळी आली असतां, ते अद्याप फुटून कसे गेले नाहींत.

जीं हाडें ' माधवाच्या व मराठी राज्याच्या ' रक्षणाकरितां आजपर्यंत झि-जलीं, तीं थेरड्या तुझीं जीर्ण हाडें मोडून त्यांचे पीठ अद्याप कसें झालें नाहीं? हे निर्दया यमा, ज्याअर्थीं तूं मराठीराज्याचा प्राण घेऊन गेलास, त्याअर्थीं त्या बरोबर हें निर्जीव झालेलें शरीर लागलेंच घेऊन जा. आतां त्याचा कांहींएक उपयोग नाहीं. नको, नको, ' माधवनिधन ' आणि त्याबरोबर मराठीराज्या-चेंही ' निधन ' पहाणें, ऐकणें आणि आतां जगणें, यापेक्षां हे डोळे फुटले, हे कान बहिरे झाले, आणि या देहांतील हाडें कोल्ह्याकुत्रचांच्या भक्ष्यस्थानीं पडलीं तर फार फार बरें होईल. हे काळा, या म्हाताऱ्या नानाचा हा आ-तां गुटमुकु लागलेला प्राण लवकर लवकर माधवाजवळ घेऊन जा. हे हिंस्त्र पशूनों, या म्हाताऱ्याचं हें जीर्ण शरीर फाडून टाकून याला माधवनिधना-मुळें होत असलेल्या यातनापासून सोडवा. (अंगातील कपडे फाडूं लाग-तात) हे अभाग्या नाना, तूं खरोखर अभागीरे अभागी, नशीब, नशीब, आमचं सर्वांचेंच नशीब खडतर! हाय हाय!!

बाबूराव—खडतर, फारच खडतर, हो नाना!

[दोघे दुःख करीत निघून जातात.]

अंक ५ समाप्त.